
गवकारा
नलिनी महाडीक

# रानवारा

(ग्रामीण कथासंग्रह)

सौ. नलिनी महाडीक
एम्. ए.

रवींद्र प्रकाशन

# रानवारा

(ग्रामीण कथासंग्रह)

**सौ. नलिनी महाडीक**

एम्. ए.

प्रो.डॉ.नलिनी महाडिक
१४ यशवंत कॉलनी,बुलंद बंगला
गोडोली.सातारा.
मो. ९४२२४०[illegible]

रवींद्र प्रकाशन

प्रकाशक :
श्री. आबासाहेब महाडीक
रवींद्र प्रकाशन
३८१ सोमवार पेठ,
(न्यू इंग्लिश स्कूल शेजारी)
सातारा शहर.

□

(C) सौ. नलिनी महाडीक

□

पहिली आवृत्ती फेब्रुवारी १९८३

□

मुद्रक ;
जयश्री प्रिंटिंग प्रेस,
७०० शनिवार पेठ,
सातारा शहर.

□

मुखपृष्ठ : के. डी. कुंभार

□

मूल्य : २५ रुपये

शेतात राबताना, रानवाऱ्याच्या संगतीत दुःख-कष्ट विसरणाऱ्या माझ्या पवित्र माता-पित्यास [ती. अण्णा व ती. सौ. ताईस]

# ऋणनिर्देश

पुस्तक रूपाने जेव्हा एखादी साहित्य कलाकृती आकाराला येते तेव्हा तिचे श्रेय लेखकाशिवाय त्याला ज्यांनी प्रेरणा दिली, सहकार्य दिले व आशीर्वाद दिले त्या स्नेहांकितांना, आप्तेष्टांना व हितचिंतकांना असते.

आभार मानणं हा तसा तुटक व्यवहार. जन्मत:च माता–पित्याचं ऋण घेऊन येणारं बालक दिसामासी वाढत जातं ते अनेकांचं अनेक प्रकारचं ऋण घेऊन. हे ऋण फिटणारे नसतात. तद्वतच कमी–अधिक आयुष्याचा वसा घेऊन आकाराला आलेली कोणतीही चांगली कृती असंच ऋण भाळी घेऊन आलेली असते. माझं हे पुस्तक आकाराला आलं ते असाच ऋणभार घेऊन. माझ्या हस्तलिखिताच्या वाचकांनी मला दिलेल्या प्रेरणेमुळं. प्रेरणा हे एक भाग्यचं व ही प्रेरणा मला देणाऱ्यात माझे आप्तेष्ट, हितचिंतक व स्नेहांकित मंडळी आहेत. प्रेरणा आणि सहकार्य म्हणजे आशीर्वादाचं सत्यस्वरूपच !

अभिमानानं सांगावी अशी बाब म्हणजे या कथासंग्रहाच्या प्रसिद्धीपूर्वी माझ्या गुरूवर्यांच्या मार्गदर्शनामुळे एम्. ए. (मराठी) परीक्षेत मी शिवाजी विद्यापिठात प्रथम श्रेणीत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होऊन, मला माधव ज्युलीयन आणि उमागिरीश या पारितोषिकाचा मान मिळाला. या कथासंग्रहाला सहकार्य देण्यातही माझ्या गुरूवर्यांचा हातभार मोलाचा आहे. त्यामध्ये आदरणीय गुरूवर्य प्रा. शं. ना. पाटील यांनी आपले सहकार्य पित्याच्या मायेने मला दिले. गुरूवर्य प्रा. बापूसाहेब कुंभोजकर, डॉ. सुमन पाटील, प्राचार्य अरविंद साळुंखे आणि प्रा. आ. ह. साळुंखे यांच्या चोखंदळ साहित्यिक मार्गदर्शनामुळे माझ्या लिखाणाचा विशिष्ट दिशेने प्रवास सुरू झाला. लावलेल्या रोपट्यास फूल केव्हा येतेय ही जशी बालसुलभ उतावीळ उत्सुकता असते, तशी उत्सुकता या माझ्या आदरणीय गुरूवर्यांना माझ्या या पुस्तकाविषयी लागून राहिलेली होती. अशा पवित्र-प्रेमळ ऋणात राहण्यात, नव्हे, ते वाढवून घेण्यातही मला आनंदच वाटेल.

ज्यांचा मी हितचिंतक मंडळी व आप्तेष्ट म्हणून उल्लेख केला हा परिवार खूपच मोठा आहे. ते सर्वजण माझ्या हस्तलिखिताचे वाचक

आहेत. हस्तलिखित वाचणे हे एक प्रकारचे प्रयास. त्यातून माझ्यासारख्या नवोदिताचे हस्तलिखित वाचणे म्हणजे शिक्षाच; पण ती त्यांनी माझ्यावरील मायेपोटी स्वीकारली, एवढेच नव्हे तर मला प्रेरणा व सहकार्य दिले. केवळ प्रेरणे अभावी काहींची कार्ये राहून जातात. पण मी या बाबतीत भाग्यवान ठरलेय. माझे मलाच वाटू लागते, की देणाराचे हात हजारो आहेत पण माझी दुबळी झोळी टिकेल का ? ही साशंकताही ते टिकू देत नाहीत. तरीही मला माझ्या या स्फूर्तिचैतन्याचे नम्रपणे मान्य करायलाच हवेत.

या पुस्तकाचे मुखपृष्ठावरील वेधक चित्र रेखाटणारे मा. गुरूवर्य के. डी. कुंभार, तसेच जयश्री प्रेसचा कामगारवर्ग यांचे सहकार्य या पुस्तकास लाभले, त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

मी ' एक संसारी स्त्री ' म्हणून माझ्यावर काही जबाबदाऱ्या आहेत. त्या पार पाडताना स्वाभाविकच माझ्या संसाराव्यतिरिक्त धडपडीस मर्यादा पडतात. तरीही माझे पती श्री. आबासाहेब महाडीक यांनी मला माझ्या लिखाणापासून पुस्तकाच्या पूर्णत्वापर्यंत मनःपूर्वकतेने प्रेरणेपासून श्रमापर्यंत सर्वप्रकारे सहकार्य दिले. हे भाग्याचे सांगातीपण आयुष्यभराचे म्हणून विशेष उल्लेखनीय.

हे पुस्तक वर उल्लेखिलेल्या सर्वांच्या सहकार्याने आकाराला आले; जसे मोठ्या कुटुंबातील एखादे कार्य त्या कुटुंबियांच्या सहकार्याने पूर्णत्वास येते, की जेथे आभार–उपकाराचे पापुद्रे नसतात.

त्या ऋणाला साक्षी ठेवून मी माझ्या हितचिंतकांना विनम्र अभिवादन करते.

— सौ. नलिनी महाडीक

## मनोगत

रसिक बंधु-भगिनींनो,

रानवारा हा कथासंग्रह पुस्तकरूपानं आकाराला येईपर्यंतच्या साऱ्या घटना आज माझ्या नजरेपुढं उभ्या आहेत आणि आता हे पुस्तक आपल्या हाती देऊन मी त्याचं भविष्य आपल्यावर सोपवत आहे.

ज्या ग्रामीण भागात मी वाढले-वावरले, तिथल्या जाणिवांनी, संस्कारांनी माझं छोटसं विचार-विश्व पोसलं गेलं. रानमातीचा रांगडा रंग असलेल्या भाषेत पात्रंही रांगडी-राकट आणि प्रसंगही. ज्या मानवी जीवनाला कसलीही चकाकी नाही, अनुकरण नाही, अशा स्वाभाविक जीवनाचं प्रामाणिक चित्रण करण्याचा हा प्रयत्न आहे. या ग्रामीण लोकांची श्रद्धा सांभाळून जगण्याची व प्रसंगी उधळून लावण्याचीही मनस्वी धडपड मला भावलेली आहे. पूर्वीसारखी आता खेड्यात चंद्रमौळी घरकुल राहिली नाहींत, पण या खेडुतांची आयुष्यं मात्र आजही चंद्रमौळीच दिसतात. एकमेकांच्या आयुष्याचं पाढं एकमेकांना पाठ न करताच पाठ असतात. अशाच ग्रामीण जगात मीही ' कुणी एक ' म्हणून वावरले. जे अनुभूतीला आलं ते शब्दात आकारू लागलं. हे साहित्यात पडणारं माझं पहिलं पाऊलं !

लेखक त्याचं लेखन पूर्ण करीपर्यंत ते त्याच्या आनंदासाठी असलं तरी त्याची पुस्तकरूपी कलाकृती रसिकांसाठीच असते. श्रोत्यांशिवाय वक्ता नाही. तद्वतच रसिक वाचकांशिवाय लेखकही मानला जात नाही. मला तुमच्या रसिकतेची दाद अपेक्षित आहे.

रसिकहो ! हे माझ्या हातचं पहिलं रानफूल. माझ्या रांगड्या मराठी भाषेतलं. कदाचित पूर्ण फुललं नसेल, कदाचित सुगंध पुरेसा भरला नसेल, पाकळ्याही कदाचित वेड्यावाकड्या उमलल्या असतील; पण हे पहिलं-वहिलं म्हणून त्यातील रंजकताही पहिली-वहिली समजून अनुभवावी.

वहायाची राहून गेली
रानफुले ओंजळीत
ओला गंध उधळीत
ओला गंध उधळीत !

— ती आता आपण स्वीकारावीत, मराठी मातीच्या आपलेपणानं !

सौ. नलिनी महाडीक

# रानवारा

| क्रम | कथा | पृष्ठ |
| --- | --- | --- |
| १ | खंडचा | १ |
| २ | रानवारा | ११ |
| ३ | डाव | ३३ |
| ४ | आक्रोश | ३९ |
| ५ | दुबळा | ५४ |
| ६ | निवेद | ७० |
| ७ | ओली जखम | ८० |

# 9 खंड्या

त्या सालाला पालीची जत्रा मायंदाळी भरलीं होती. ती माघारी फिरत होती. देवाचं दर्शन झाल्यावर, भांड्यातलं दूध ऊतू जावं तसं पालीतून माणसं भराभर पांगत होती. मी नि आबा गावाकडं निघालो त्या टायमाला ऊन्हं कलली होती. पायी चालणारं जत्रंकरी, बैलगाड्या, फटफटी, जीपा, टुरिंगा, सारी आपल्या घराचा रस्ता जवळ करीत होती.

दरसालावाणी औंदा जत्रला आमची बैलगाडी काढली नव्हती. आई बाजंवर होती. छोटं बाळ होतं नि आजीला सारं घरकाम बघावं लागत होतं, नाय तर दरसाल आम्ही सारी बैलगाडीनं भंडारा उधळीत यायचो. सारी कापडं पिवळी चिटूक झाल्याली पण मनात हुरुप मायाचा नाय, पण त्या साली आई नुकतीच मामाच्या गावास्न आली होती. जालिंदर संग नेला होता पण त्याच्या बरोबर येताना छोट बाळबी आणलं होतं. गोरं–गोबरं बाळ मला आवडलं होतं. पण जाल्या त्याच्याबद्दल भाव खायाचा. टेचात असायचा. मामाकडं जाऊन बाळ आणलं म्हणून टेंबा मिरवायचा. मी खवळलो होतो. पालीच्या जत्रंला हटून आबा बरोबर निघालो. जाल्या झोपत असतानाच आम्ही जत्रंच्या वाटंला लागलो होतो.

जत्रंत मी मागेल ते आबा घेत होतं. येताना आमच्या संग मोठं वझ झालं होतं पण मी छाती फुगवून चाललो होतो. आज जाल्यापुढं मीच भाव मारणार होतो.

जत्रंकरी मुंगीवाणी होतं. गाडीवाटनं–पायवाटनं भरभरून चाललं होतं. फटफटी, टुरिंगा, टॅक्स्या आसल्या वाहनास्नी रिघावा नव्हता. ज्याला त्याला आपलंच घोडं पुढं दामटायची घाई झाली होती. त्यामुळं पायी चालणारास्नी मजा वाटत होती. त्या चढाओढींना रंगत आली होती. अशीच एक तपकिरी वाणाची टुरिंग पाठीमागनं आली नि वाकड्या भार्गानं पुढं जाऊन मूळ रस्त्याला मिळाली. त्याच टायमाला बोरीखाली कुत्रं केकाटलं. त्याच्या अंगावरन टुरिंगीचं चाक गेलं होतं. आबांचा हात ओढत त्यांना घेऊनच मी तिथं गेलो. तिथला पसंग पाहून माझा जीव गलवलला. एका कुत्रीच्या पेकाटावरन चाक गेलं होतं नि तिचं आचकं देणं चाललं होतं. तिचं पिलू तिला कुईकुई करीत लुचत होतं. माझ्या जिव्हारी घाव बसला. मला रडू फुटत होतं. जणू बाजेवरील आईला पिणार बाळ डोळ्यापुढं येऊन पोटात भडभडत होतं. पुन्हा पुन्हा डोळं पाण्यानं भरत होतं. पण डोळ्यातलं पाणी आटत नव्हतं. हुंदका फुटत होता. आबा मला म्हणालं. " नामा, आता निघू या. घर गाठायला रात हुईल. ती कुत्री मेलीया, भडवं मोटरवालं मुक्या जनावराची पर्वा करत न्हाईत. "

" पण आबा . . . आबा हे पिलू आता कसं जगंल ? कोण त्याला दूध देणार ? . . . आई मेलीया पण तेबी त्याला कळत नाय ?"

'मुकं जनावर हाय बच्चा हाय. काय कळणार त्याला दुनियेची रीत !'

' आबा, त्याला आपल्यासंग घ्यावं का ?'

' आसं म्हणतोस ? आवडलं तुला पिलू ? . . . चलातर घेवू या ' आसं म्हणून आबानी हलक्या हातानी पिलू उचलून माझ्या हातात दिलं. त्यानं वाईच कुईकुई केलं नि लगोलग माझा हात चाटू लागलं. आता माझ्याजवळ जत्रंतल्या गमतीपरास दुसरी अपूर्वाई आली होती. मला जाल्यापुढं भाव मारायला मिळणार होता. मला हक्काचा दोस्त मिळाला

होता. आबा चालता चालता म्हणालं, 'नामा, ह्याला खंड्या' म्हणायचं खंडुबानं पालीच्या वाटंवर दिला म्हणून. मला नाव आवडलं होतं.

जाल्या झोपायच्या आधी घरं गाठलं पाहिजे म्हणून मी घाईनं चालला होतो. खंड्या मला बिलगला होता.

घरी आल्यावर साऱ्यांना 'खंड्याची' अपूर्वाई त्याची कथा ऐकून प्रत्येकजण चुकचुकत होता. खंड्याचं स्वागत झालं होतं. तो घरभर फिरून पुन्हा माझ्याजवळ येऊन बसला तेव्हा माझा रुबाब और होता. जाल्या सशाच्या कानानं सारं ऐकत होता नि सशाच्या डोळ्यानी 'खंड्याकडं' बघत होता. बर झालं, आता जाल्या मला रोजच्यासारखा पिटींपिटी मारणार नव्हता. खंड्याला माझ्याजवळ बघून तो लांब लांबनच फिरणार हे मी हेरलं होतं. खंड्या मला पहिल्या दिवसापासून जीव की प्राण वाटायला लागला.

दुसऱ्या दिवशी शाळंत जाताना माझ्या मानंवर जणू गाडीचं जू ठेवलं होतं. इतकं वंगाळ वाटत होतं. मी दप्तर घेऊन उभा राहिलो त्या यळंला माझ्यासंग जायाला खंड्या तयार होता. ते बघून आबाच आलं, मला शाळंत पोचवायला नि खंड्या पण. त्याला माझी शाळा ठाऊक झाली शाळा सुटण्याचा वकुत कळायला लागला नि खंड्या मला घरी न्याला शाळंत येऊ लागला. दिवसेदिवस आमच्या दोस्तीला रंग भरत गेला.

घंटा झाली. मी फाटकाकडं बघितलं. खंड्या आला. मेंढराच्या कळपावाणी आम्ही पोरं वर्गाबाहेर पडलो. फाटकात मला खंड्यानं गाठलं आनंदानं उड्या मारत तो माझं पाय चाटत होता. मी त्याला 'चल' म्हटलं आणि आमची शर्यत सुरू झाली.

घरी पोचलो. आई म्हणाली, 'आला मुराळी. मुराळकी घेऊन,' खंड्याबद्दल ती असं कौतुकानं बोलायची. मी हायपाय धुऊन घोंगडीवर बसेपर्यंत आईनं माझं ताट वाढलेलं असायचं. खंड्यापुढंही भाकरी पडलेली असायची पण मी जेवायला सुरूवात करीपर्यंत तो भाकरीला तोंड लावायचा नाही. माझं मन भरून यायचं. ती मेलेली कुत्री . . . व लुचणारं पिलू आठवायचं नि मी खंड्याला मायेनं आणखी खायला घालायचो.

मला शाळंला आणायला खंड्या ठरल्या वक्ताला येत होता.

माझ्यासंग भाकरी खात होता. मी अभ्यास करताना शांत बसत होता. माझ्या आंथरूणाच्या पायथ्याशी झोपत होता.

थंडीचं दिवस होतं. चावऱ्या थंडीनं अंग गोठलं होतं. अंगावरती चादर पांघरून मी बसलो होतो. माझं ध्यान पायशाच्या खंड्याकडं गेलं. तो अंगाचं मुटकुळं करून बसला होता. केविलवाणा दिसला. मी आईला म्हणालो, ' खंड्याच्या अंगावर चादर घाल.'

' ह्य रंकाय आणखी नवंच ! कुत्र्याला चादर घालू व्हय ?' आईचं एवढं ऐकलं नि मी अंगावरची चादर काढून फेकली. म्हटलं, ' मलाबी नको चादर.'

खंड्याला आईनं ' कुत्रं ' म्हटलं त्याचा बी मला राग आला होता. त्याला नाव होतं की, उगीच कुत्रं म्हणाली. मी रागानं लाल झालो होतो. माझी चादर पुन्हा अंगावर घालत ती माझी समजूत घालू लागली. मला कुरवाळणारा तिचा हात मी झटकला. तिचं मला काही पटत नव्हतं. मी पांघरून घेऊन झोपणार नि खंड्या ? मला आई होती पण त्याला नव्हती म्हणून ? माझा गळा दाटून आला. आईनं मला जवळ ओढून घेतलं. म्हणाली.

' आरं कुत्र्याला कुठं पांघरून आसतं का ? ऐकलंस का कुठं ? बघितलंस का कुठं ?'

' पण माझ्या खंड्याला पायजे. दुसऱ्या कुत्र्याचं मला नग सांगूस.' असं म्हणत मी नाकाचं पाणी वर ओढलं. आई गालात हासत म्हणाली,

' बरं, उद्या तयार करीन पांघरून तुझ्या खंड्याला.'

' .. पण आज ?

' हे बघ नामा, आजची रात त्याला काढू दे तशीच.'

' आजची रात त्याला कायतरी देकी पांघरायला.'

' आता ह्या लाडाला काय म्हणू ? ऐकावं ते इपरीतच एक-एक, आजच्या रातीनं काय हुणार हाय ? काल कुठं काय हुतं त्याच्या अंगावर ?'

' काल ? . . . काल कसं नाय आल आपल्या ध्यानात ?'

मी मनातच म्हटलं नि स्वतःलाच दोष दिला. त्या रात्री मला झोप

येत नव्हती, सारी गडद झोपली. मी हळूच उठलो. माझी चादर खंड्याच्या अंगावर घातली. एका गोधडीत माझी थंडी कशीतरी हाटणार होती. पण खंड्या गारठणार नव्हता, याच विचारानं मला ऊब आली होती. मी सकाळी लवकर उठून चादर काढून माझ्या अंगावर घेणार होतो. पण –

' आत्ता ग बया, ही चादर कुणी कुत्र्याला घातली ग यस्वदे ? आजीच्या या आवाजानं मला जाग आली. मी तोंडावर पांघरून ओढलं. पण माझं मन सर्वांपुढं उघडं पडलं होतं. त्याच दिवशी खंड्यासाठी पांघरून तयार केलं गेलं.

खंड्याची पांघरूनाची सोय झाली नि माझ्या खंड्याबद्दलच्या मागण्या वाढू लागल्या, पट्टा, घुंगरू, माळा, गोंडे, साखळी, थाळी, वाडगा सारं काही जमलं. त्याच्या वाडग्यावर त्याचं नावसुद्धा मी घालून घेतलं.

एक दिवस आई म्हणाली,

' नामा, आता जत्रंला तुझ्यासंगट खंड्यालाबी कापडं शिवू या.'

ही अशी आई. तिला गंमत वाटायची. मला तिचाच नव्हं तर साऱ्या जगाचा राग आला. जगानं जर कुत्र्याला कापडं शिवायची पद्धत केली असती तर मी खंड्याला कापडं शिवलीच असती. माणसाची जातच हरामी. अगदी आप्पलपोटी.

. . . . आंब्याच्या सुगीत शिवारात पाडाच्या आंब्याची उतरण चालली होती. आमची आंब्याची झाडं आम्ही उताऱ्याकडून उतरून घेत होतो. झाडं ओढ्याच्या काठावर होती. ओढ्याचं पाणी आटलं होतं. उतारीचं आंबं अधून–मधून घरंगळत ओढ्यात जात होतं. ते मी वर आणून ढिगात ठेवत होतो. एक–दोन वेळा खंड्यानं ते बघितलं नि तो ते काम चलाखीनं करू लागला. दातात अलगद आंबा धरून आणून तो ढिगात ठेवू लागला. लागला. अशाच त्याच्या कित्येक आठवणी

. . . . आमचा एक गरीब बैल बांधाला मोकळा चरायचा. पण कधी–मधी पिकातबी शिरायचा. त्याची दोरी धरून त्याला पुन्हा बांधाला आणलं की काम संपायचं पण ते कामही खंड्या मला करू देत नव्हता.

. . . . भर दुपारी विहिरीत पोहत होतो. खंड्या धावंवर बसला होता. डुबक्या मारण्यात बराच टाइम गेला. खंड्या भुंकू लागला. सुरुवातीला मी ध्यान

दिलं नाय पण त्याच्या भुकण्याचा जोर वाढला. खंड्या आता विहिरीच्या काठावर आला होता; मी सजागती वर बघितलं. खंड्या विहिरीच्या पायऱ्याकडं रोख लावून भुंकत होता. मी पायरीकडं पाह्यलं, पायरीवर फणा काढून बसलेला नाग मला दिसला. माझ्या घशाला कोरड पडली. ओरडायचं अवसान संपलं. एका चिऱ्याला धरून मी पाण्यावर तरंगत होतो. मला रडू येत होतं.

खंड्याच्या भुकण्याच्या आवाजावर पाचटीला आलेला वाटंकरी तिथं आला. त्याच्या पायाच्या आवाजानं नाग सळसळ करीत निघून गेला. माझी सुटका झाली. खंड्यानं मला वाचवलं होतं. मन मोहरून आलं होतं. जीव भरून पावला होता. मी खंड्याच्या गळ्यात गळा घातला. किती आंजारलं-गोंजारलं पण जीव भरत नव्हता.

माळानं खंड्या माझ्याबरोबर पळत होता. म्होरनं एक बांड कुत्रं आलं. लई चोरटं होतं. भाकरीच्या टोपल्याच पळवायचं. वाटलं जराकरावी गंमत या चोरट्याची. मी खंड्याला " छू ऽऽ " म्हटलं.

खंड्या धावला पण ते कुत्रं खंड्याला चावलं. मी रागानं त्या कुत्र्याच्या पेकटात दगडच घातला. ते कानं झिंझाडत ' क्यँव क्यँव ' करीत पळालं पण त्याचं ते रूप बघून मी मनात चरकलो. मला ते पिसाळल्यावाणी दिसलं.

गावात मी पोरा-पोरात चौकशी केली. ते कुत्रं खऱ्यानंच पिसाळलं होतं. माझा जीव गांहिवरला घाबरला. पण खंड्याला ते कुत्रं चावल्यालं मी घरात कुणाला सांगितलं नाय, गुपचूप त्याच्या जखमेवर हळद लावत राहिलो जखम बरी झाली. माझा जीव भांड्यात पडला.

त्या दिवशीं रोजच्यासारखा खंड्या फाटकात आला नव्हता. तो का आला नसावा ? त्याला कोणी सोडलं नसंल ? की पुन्हा एखादं कुत्रं वाटंत चावलं ? अिचाराच्या वावटळीत मी घरी आलो. खंड्याला साखळीनं बांधला होता त्याला कुणी सोडलं नव्हतंच तर ! पण रोजच्या सारखी त्यानं शेपटी हालवली नाय. तो इव्हळत होता. दप्तर गळ्यात अडकवून मी तसाच त्याच्याकडं निघालो तर आई जवळजवळ ओरडलीच.

' आरं बाबा, त्याच्याजवळ जाऊ नगस, पिसाळलंय त्ये.'

माझ्या हातापायतलं जणू आवसान गेलं. मी खंड्याकडं पाहिलं. त्याच्या तोंडातून लाळ गळत होती. त्याच्या–माझ्या बदनशीबाची खात्री पटली होती. "खंड्या ऽऽ !" माझा गळा दाटून आला. खांबाला पाठ टेकून मी तसाच बसकन मारून खाली बसलो. गुडघ्यात मान घातली पण वाटलं, परवा खंड्या आभाळाकडं तोंड करून रडला तसं रडावं-बेसूर, पण ते जमणार नव्हतं.

जवणासाठी आई मला उठवायला आली. मला बसली जागा उठवंना. माझी अन्नावरचीच नाय तर साऱ्या जगावरची वासना जणू उडाली होती. आबा घरी आलं तरी मी जेवायला उठलो नाय. वाटलं आबाना सारं–सारं सांगावं. त्यांनी मला पाठ फुटेस्तोवर मारावं. मग पाप फिटलं माझं. मीच त्याला 'छू' म्हटलं. त्यातून त्याच्या जन्माचा खेळ झाला. मन शरीराला गदगदून काढीत होतं. डोळं टिपं गाळीत होतं. आबा जवळ येऊन म्हणाल, 'तुझा दोस्त मरणाच्या वाटवर हाय. पण तू उपाशी राहिलास तर त्याला जाताना लई वंगाळ वाटंल. त्याच्यासाठी दोन घास खा.'

मी हमसून हमसून रडलो. जेवलो नाय. पण आबाना 'ते' काय सांगायचं जमलं नाय. त्यांच्या त्या मायेचा मला नको इतका राग आला होता; पण मी काईच बोललो नाय.

त्या राती माझ्यासाठी साऱ्यांनीच जेवणाला हात आखडलं. नाइलाजानं जेवायला बसलो. डोळ्यापुढं मेल्या आईचं दूध पिणारं कुत्रं दिसू लागलं. गळा दाटून आला. ताटात चपाती होती. माझ्या आवडीचं कालवण होतं. मी भारावल्यासारखा ताटातली चपाती घेऊन उठलो यंत्रासारखा गेलो. त्याच्या पुढ्यात चपाती टाकली. त्यानं माझ्याकडं अनोळखी भयानक नजरेनं पाह्यलं. चपाती हुंगली. थोडी चावली नि तशीच पडू दिली. भरल्या आसवातून त्याला पाहण्यात माझी नजर जगाला विसरली होती.

'आत ये की नामा. माणसं ताटकाळल्याती.' आईच्या आवाजानं मन थाऱ्यावर आलं. पुन्हा मी पाटावर जाऊन बसलो. किती आप्पलपोटचा होतो मी ? खंड्या काही खात नव्हता तरी मी जेवत होतो. सगळी माणसं

मला आग्रह करून जेऊ घालत होती. पण खंड्या मरणार होता, म्हणून कोणी दुःखी झालं नव्हतं. ताटावरचा हात कोणी आखडला नव्हता. ज्यानं आखडला त्याला आग्रह चालला होता.. .. आणि मी सुद्धा जेवत होतोच की, खंड्यानं मला सोडून कधी भाकरी खाल्ली का ? .... मी पाण्याचा तांब्या उचलला नि हातावर बदाबदा पाणी ओतलं. सारं जेवण पाण्यात मिसळून गेलं. मी पुन्हा झपाटल्यासारखा खांबाला टेकून बसलो . .. खंड्याच्यासमोर ! खंड्याकडं एकटक पहात डोळ्यातून आसवं ओघळत राहिली .. .. मेणबत्तीच्या आसवांसारखी.

आबा केव्हा आलं कळलंच नाही. म्हणालं, 'चल, आज तू माझ्याजवळ झोपायचं.' माझी आज्ञाधारक पावलं त्यांच्या पाठोपाठ जिना चढून गेली. आबांच्या पुढ्यात मला झोप लागली नाय. पण त्यांच्या पुढ्यात्न उठायचं धाडसपण मला झालं नाय. किती तरी उशीरानं मला थोडी झोप लागली होती. मी स्वप्न पाह्यलं होतं स्वप्नात मी खंड्याबरोबर डोंगरावर उंच उंच गेलो. एका उंच कड्यावर दोघं उभं होतो पण काय झालं कुणास ठाऊक एकाएकी खंड्या उंचावरून .. . त्या उंच भयावह कड्यावरून खोल खोल अंधारात कोसळला मी खाली वाकून पाह्यलं पण तो कोठेच दिसला नाही मला मात्र भीती वाटली. घाम आला. रडू आलं. घशात अगदी दुखायला लागलं नि मला जाग आली. पहाट झाली होती. कोंबडा आरवल्याचा आवाज आला. घरामागच्या चिंचेवर कावळ्यांचीं कावकाव ऐकू येत होती अंथरूणातून हळूच उठलो. पावलं न वाजवता जिन्यापर्यंत आलो मग मात्र दोन दोन पायऱ्या उतरत खाली आलो. तडक खंड्याकडं गेलो. त्याला झोप लागली होती, मी हाक मारली – ' खंड्या ऽऽ'

पण तो हाललासुद्धा नाही. त्याचे चारी पाय ताठ झाले होते. मनात काहीतरी विखारी वळवळ झाली. खंड्या कधी असा झोपत नसे. मी घायाळ नजरेनं त्याला न्याहाळलं . .. माझा खंचा मला सोडून गेला होता. छे ! तो कुठं गेला मला सोडून ? मीच तर त्याला सोडून माडीवर गेलो होतो. दुष्ट मी. माझ्या खंड्याचा जीव जाताना मी माडीवर आबांच्या कुशीत सुखरूप .. जागा किंवा झोपलेला. वाटलं माझा कोणीतरी गळा दाबावा . . . कोणी नाही तरी माझा मीच. छे ! असं कुठं घडतं ?

नुस्तं वाटतं. कंठ दाटून आला. भुई चाचपीत मी तसाच खाली बसलो. आई पडवीत येऊन मऊ आवाजात म्हणाली ' नामा, राजा तू कुठंवर तिथं बसणार ? ती कुत्र्याची जात. आसंच मराण आसतं त्या जातीला. वंगाळ वाटून घेऊ नगस.'

कुत्र्याची जात म्हणून आसं मरण, मग माणसाच्या जातीला कसं ? मला कसं ? मन सैरभैर झालं होतं. मला सुचेना, समजेना. मरण म्हणजे काय ? जीव जातो म्हणजे काय ? तो कुठं जातो ?

खंड्याला पुरायला न्यायला तराळ आला. रडून रडून मी थकलो होतो. माझी आसवं आटून गेली होती. मन टाहो फोडत होतं. तराळानं खंड्याचं पाय सुतळीनं बांधलं. मला माझंच पाय कुणी सुतळीनं बांधतंय असं वाटलं. खंड्याला तराळ आता ओढीत नेणार ही कल्पना मला सहनच झाली नाही. मी उसळून म्हणालो, 'तसं ओढतं त्याला न्यायचं नाय.'

आबांनी ऐकलं. नवं गोणपाट तराळाला दिलं. म्हणालं, ' यात घालून खांद्यावरून ने. दोन रुपयं जादा ने. पोराचं मन दुखवायचं नाय.'

खंड्याला तराळ घेऊन निघाला. त्याच्यामागं मी चाललो. जाताना आबा काही बोलले नाहीत, म्हणून आई गप्प होती. सदा बडबडणारी आजी वाकड्या मेढीसारखी उभी होती. खंड्याच्या प्रेतामागं माझं मन धाय मोकलीत चाललं होतं.

नागपंचमीचा सण होता. आजोबांच्या थडग्यास निवेद घेऊन आईनं मला रानात धाडलं होतं. आजोबाना मी पाह्यलं नव्हतं. थडगंच पहात आलो. आंब्याच्या झाडाखाली छानसं थडगं. कळू लागल्यापासून मी थडग्याला निवेद घेऊन जायचा. अशा टायमाला खंड्या संगती असायचा. पण आज नाय. थडग्याच्या पायशाला दाट, गार, सावलीत खंड्या कधी कधी पाय पसरून, डोळे उघडे ठेवून पडून ऱ्हायचा. मी कुठं निघालेला दिसलो की चटकन उठायचा. खंड्याला मी माया लावून मोठा केला. त्यानं त्या बदल्यात मला खूप खूप दिलं. उदंड माया केली. शेवटी माझ्या शब्दाखातरं कुर्बान झाला जणू. मी त्याच्यासाठी आज काय करतो ? न पाह्यलेल्या माझ्या आजोबांच्या थडग्याला रानात निवेद आणतो नि खंड्याला ? आई म्हणते आजोबांना पुरणपोळी आवडत नव्हती; पण

पुरणपोळीच निवेद ती थडग्याला देत होतीं. खरं तर खंड्याला पुरणपोळी आवडत होती; पण माझ्याशिवाय तो कधीच पुरणपोळी खात नव्हता. हा पुरणपोळीचा निवेद त्याला न्यावा का? का नेवू नाय? माझीं मळ्याच्या वाटेवरील पाऊलं माळाच्या वाटेनं पडू लागली. अधिक वेगानं.

हिरवंगार जित्राब वाऱ्यानं डुलत होतं. उभ्या पिकाला वाकवीत वारा रानभर हुंदाडत होता. आपण भवऱ्यासारखा गिरकी घेत होता नि जित्राबाचा भवरा करीत होता माझ्यासंगती खंड्यापण असाच हुंदाडायचा माझ्याभवती फिरून माझ्या अंगाचा भवरा करायचा. वाटलं हलणाऱ्या डुलणाऱ्या जित्राबात खंड्या कुठंतरीं आसंल. आत्ता हाक मारली की धावत येईल. . . . चिलया बाळागत ! नि मीं कसनुसा हसलो. माळावरच्या खड्ड्यात, जिथं खंड्याला पुरला होता, तिथं पुन्हा एकदा मन घायाळ होऊन घिरट्या घालू लागलं.

तिथं डोळ्यांना फक्त खड्डा दिसला. सुन्न उभाच ऱ्हायलो. तो खड्डा माझ्या छातीत पडलाय. तिथं खंड्याच्या आठवणी पुरल्यात. न उकरता त्या झऱ्याच्या पाण्यासारख्या वर येतात, आसं मनापासून वाटलं, तिथल्या उंच दगडावर बसून ऱ्हायलो. वाटलं, खंड्या गेल्यापासून मी पोरका झालो. माझ्याशी खेळणारं, मला समजून घेणारं, माझंच ऐकणारं या जगात कोणीच नाय. खंड्यासारखा जीव लावावा आसंही कुणी नाय. खंड्याची आठवण काळीज पोखरू लागली कढ कंठात दाटून आलं. मनात मनांनात म्हणून बोलू लागलो ' खंड्या ऽऽ. खंड्या. ही आईनं दिलेली पुरणपोळी मी तुझ्याकडं घेऊन आलो रं. थडग्याला नाय दिली. मला ठावं हाय, तुला आवडती म्हणून. खंड्या. तू माझ्यावर रागावलास ? मग तू मला माया का लावून गेलास ? मी तुला कसा विसरू सांग ? माझ्याच चुकीमुळं तुला मरावं लागलं म्हणून रागावून गेलास ? . . . पण . . . पण तू तर मला सोडून कुठंच जात नव्हतास, मग का गेलास ? . . . . खंड्या मला तुझा विसर पडत नाय रं मी जवळ नसताना तू गेलास . . . खंड्या मी तुला नकोसा झालो होतो का रं ?

पायाला गार–गार लागलं. दचकून गुडघ्यातली मान काढली. बघितलं-कुठलं तरी कुत्र्याचं पिलू माझं पाय चाटीत होतं.

( शिवाजी विद्यापीठ – पारितोषिक विजेती कथा १९८० ) ० ० ०

वस्तीच्या थांब्यावर गाडी थांबली. खाली उतरताना शिवरामानं राजा गुरवाला आपलं सामान गावात परसूच्या हॉटेलात ठेवायला बजावून सांगितलं. खाली उतरून त्यानं सभोवती पाहिलं. खाटकन् दरवाजा बंद केल्यावर गाडी धूळ उडवीत निघून गेली, तेव्हा रूमालानं तोंड पुसून शिवराम माळचाच्या विहिरीकडं वळला.

त्यानं विहिरीत डोकावून पाहिलं. चवथ्या पायरीपर्यंत तुडुंब पाणी होतं. निवळशंक, स्वच्छ अगदी तळ दिसत होता. नजरेलाच पाण्याचा थंडगारपणा जाणवत होता. एक लहानगा निळा पक्षी हलकीशी शीळ मारीत विहिरीच्या चिरेतून भरारला, उंच हवेत झेपावला आणि शिवराम उगाचच निळ्या आकाशात उंच उंच नजर पोहचते, तिथंपर्यंत पहात राहिला. त्याच्याही ओठावर हलकीशी शीळ आली. एका भयानक स्वप्नातून जाग येऊन वाटावं, असा त्याच्या मनाला आल्हाद वाटला

विहिरीच्या कमानीतून पायऱ्या उतरत पाण्यात दोन पायऱ्या उतरून तो उभा राहिला. काठाशी आलेलं कासव हलकेच खाली झेपावलं. मंद मंद, शिवरामच्या मनात आलं, या कासवाला मुंबईच्या मरीन लाईनवर

नेऊन सोडावं आणि त्या कल्पनेनं त्याच्या ओठावर हसू फुटलं.

तो पाण्यावर वाकला. गळ्यातल्या गोफातला मारूती लटकू लागला. सहजच त्याची नजर पाण्यातल्या प्रतिबिंबावर गेली. नाक जास्तच वरती आल्यासारखं, डोळं खोल गेलेलं आणि खांद्याजवळचं हाड नजरंत भरण्याइतकं वरती आलेलं. एक सुस्कारा टाकून त्यानं चेहऱ्यावर पाण्याचं तीन-चार हबकं मारलं; पण तेवढ्यानं त्याच समाधान होईना. पाण्यात मनसोक्त डुंबावं असा विचार करून त्यानं कपडे काढून पायरीवर ठेवलं. पाण्यात सूर मारला. तरंगणारा माशांचा थवा दोन्ही बाजूला विभागला गेला.

ओल्या अंगानं तो धावंवर आला, तेव्हा त्याचं डोळं पोहण्याच्या अतिरेकानं लालसर झालं होतं. हौदाच्या दगडावर अंगावर ऊन घेत तो उभा राहिला. अंगावरच पाणी निथळत होतं. डोक्याचं ओलं केस तो हातानं निरपून कोरडं करीत होता. मनात म्हणत होता, ' बरं झालं अंग धुतलं. बाप्पाच्या नजरंला माझा दमदारपणा नाय दिसला तरी ताजापणा दिसलं. तेवढंच त्यांना समाधान.'

वाऱ्याची गार झुळुक अंगावरून गेली. अंगावर हलकाच काटा फुलला. गोड शिरशिरी. रोमरोम मोहरलं. शहारलं.

हा अनुभव गेल्या दोन महिन्यात त्याला मिळाला नव्हता. दोन खणाच्या खोलीत ते सहाजण रहात होतं; नव्हे थोडा वेळ अंग टाकायला येत होतं. रात्रपाळी–दिवसपाळीनं त्यांची थोडी सोय होत होती. मुंबापुरी न्हवे बजबजपुरी. दिवसभर अंगाला घामाचा पाझर फुटलेला. त्याची चिकट–घामट जाणीव मनात बाळगून दिवसभर वावरायचं. सारा हुरूप जणू घामात भिजत ठेवलेला. आंघोळ, जेवण, नोकरीसाठी वणवण आणि झोप या कशातच घामट जाणीव पाठ सोडत नव्हती. एका बादलीत आंघोळ उरकायची. लोकल पकडायची, कारखाना, गिरणी जो पत्ता दिला असेल तो धुंडायचा. तेथील ऑफीस शोधायचं. तीच तीच माहिती–चौकशी आणि निराशेचा खड्डा आणखी खोल खणणारा तोच तोच नकार.

खानावळ चा अनुभव तसाच. माणसाच्या आयुष्याचा एक वखवखलेला कोपरा. अपरिहार्य. अटळ. दिवसातून दोनदा शरीरातील पोटाचं अस्तित्व तिव्रतेनं जाणवायचं. खानावळीत शिरताना उगीच

अपराधल्यासारखं व्हायचं. मान खाली जायची. आपोआप. एखादं टेबलंही कधी रिकामं नसायचं. बऱ्याचजणांच्या खुर्चीमागं मेंबर नंबर लावून उभा असायचा. तोही एका खुर्चीमागं नंबर लावून उभा रहायचा. आपण पोट भरायला इथं आलो. पोटाच्या मागं लागून इथं आलो; म्हणून जेवणाराच्या खुर्चीमागं उभं राहून नंबर लावून जेवतो. असलं दरिद्री विचार मनात कावकाव करायचं. पोटातली कावकाव थंड व्हायची. खुर्चीवरचा माणूस उठून हात धुवायला गेला. तरी त्याला भान नसायचं. बरोबर आलेला संभा त्याला धक्का मारायचा. तो ओशाळवाणं हसायचा. झोपेतून जाग आल्यासारखा इकडं तिकडं पहायचा. मलूल चेहऱ्यानं खुर्चीवर बसायचा. भात चिवडत रहायचा. कधी कधी खुर्चीमागचा मेंबर खोकून आपल्या नंबराची जाणीव द्यायचा. मग तो घासामागून घास भराभर घ्यायचा. जेवण संपवून उठताना त्या मेंबराकडं चोरट्यासारखं पाह्यचा. नजरानजर झालीच तर आणखी अपराधी भावना. खानावळीतून बाहेर पडताना पोट भरल्याच्या जाणीवेपेक्षा सुटकेची जाणीव अधिक खोलवर उमटायची.

हे सारं त्याच्याच हट्टामुळं घडलं. सारं सुरळीत चाललं होतं. पाटानं पाणी जितक्या सहजतेनं जावं तितक्या सहजतेनं. तो रोज भल्या पहाटं तालमीत व्यायाम करायचा गावच्या विहिरीवर आंघोळ करायचा. तिथून पुढं त्याचं मळ्यातलं काम सुरू व्हायचं. शाळा सोडल्यापासून यात खंड नव्हता. बाप्पांच्या बरोबर तो सारं शेतीचं व्यवहार बघायचा. शेतीचं सामान, बी-बियाणं आणायला बाप्पांच्या बरोबर त्याच्या अधूनमधून सातारला चकरा व्हायच्या. आसपासच्या गावची जत्रा आली की तो तयारीनं तिथं हजर रहायचा. कुस्तीच्या फडात उतरायचा. फड जिंकून ढोल-लेझीमाच्या गजरात गावात यायचा. त्याची आक्का किंवा आई त्याला ओवाळून घरात घ्यायची. कधी कुस्ती हारायचाही. अशावेळी बाप्पांचा पाठीवरून हात फिरायचा. तोच कसा चपळाईनं खेळतो हे सांगून व्हायचं. पुढच्या फडासाठी चांगली तयारी करावी म्हणून भरीस घातलं जायचं. आणि अनुभव असा की, पुढच्या फडात तो हमखास कुस्ती जिंकायचा. मोटंत पाणी मावत नाही, असा अंगात हुरूप असायचा. दावनीला दोन जातीवंत, दमदार बैल होती गाडीवान म्हणून शिवराम

असला की, बाप्पा सारी कामं सोडून गाडीत बसायचं. कौतुकानं म्हणायचं, ' गाडी धावायला लागली की मला काय समजतच नाय की, बैलास्नी आवरावं की गाडीवानाला ? गाडी वाऱ्यासंग धावती निस्ती.'

पण बैलगाडीच्या शर्यतीत ते कधीच शिवरामाला भाग घेऊ देत नसत. ते असं कळवळून त्याची समजूत घालत की त्याला त्यांचं मन मोडणं जमतच नसे. ' तुझ्या शर्यतीतल्या पैल्या नंबरापेक्षा मला तुझा जीव लई मोलाचा वाटतो. शिवराम येळकाळ सांगून येत नाय. माझं ऐक. माझ्यासाठी येवढंच कर बाबा.' त्यांच्या अशा मायेच्या लोटात शिवराम अवाक् व्हायचा. बाप्पांचा शब्द तो मोडायचा नाही.

ते दिवस मध भरलेल्या मोहळाच्या पोळीसारखं गोड. मधुर कुठंच कडवटपणा नव्हता; पण त्याच्या धाकट्या भावाच्या-जयरामच्या परीक्षेचा निकाल लागला आणि घरात कधी नव्हता इतका उत्साह आला. जो तो जयरामच्या मार्कांची वाहवा करू लागला चोहोबाजूनी कौतुकाचा वर्षाव त्याच उत्साहाच्या भरात बाप्पांनी शिवरामला पाठवून आक्काला माहेरी आणली सारी जयरामच्या पुढच्या शिक्षणाचं बोलत असायची. पहिल्या-पहिल्यांदा शिवरामही त्या चर्चेत भाग घेत होता; पण नंतर त्याला कुठंतरी खटकू लागल. जयराम बक्कळ मार्कांनी पास झाला होता त्याला इंजिनियर करायचा होता. पुढच्या शिक्षणासाठी त्याला मुंबईला ठेवायचा होता. इथपर्यंत त्याला सारं ठिक वाटलं; पण जयरामच्या बुद्धीचं कौतुक करताना कळत-नकळत घरच्यांनी व बाहेरच्यांनीही तुलना सुरू केली. गप्पा रंगायच्या, वाढायच्या कौतुकानं जयरामचं पारडं जड व्हायचं, शिवरामचं पारडं हलकं होऊन हेलकावं खायचं. शिवरामचं मन वैशाखातल्या उन्हानं शेत भेगाळतं तसं भेगाळलं. मायेच्या ओलाव्याला आतुरलं तो उदास राहू लागला. बाप्पा जयरामच्या पुढच्या शिक्षणाच्या तजविजीत होत. जयराम अर्ज, प्रवेश, पत्रव्यवहार, फी सवलती वगैरेच्या व्यापात दंग झालेला होता. त्यालाही आपल्या मोठ्या भावाजळ बसून मनमोकळ्या गप्पा माराव्यात असं वाटलं नाही. घरात आई आणि आजीपण जयरामच्या शिक्षणाच्या गप्पांकडं कान लावून असायच्या. त्याच्या खाण्यापिण्याची चौकशी अधिकच केली जायची. या साऱ्यात शिवरामची खास दाद

कोणीच घेईनासं झालं. गाईच्या कळपात वासराची दाद घेऊ नये तसं झालं. शिवराम दुखावला. त्याचं मन नको इतकं हळवं झालं. रानात झाडावर बसलेलं एखादं एकटंच रानपाखरू दिसलं की त्याला आपली व त्याची स्थिती एकच वाटे. पाखरू झाडावरून उडून जाईपर्यंत तो त्याला विव्हळ होऊन उदासपणे पहात राही.

रोज रात्री अंगणात शेजारी–पाजारी गोळा होत. बाप्पाचं दोस्त येत. तोच जयरामचा विषय चर्चेला असे. जयरामचं कौतुक. शब्द वेगळं पण आशय तोच जयरामचा माथा उजळला होता. मळलेल्या नितळ पायवाटसारखं त्याचं नांव आणि आपण दोन्ही बाजूच्या खुरटया गवतासारखं सगळी त्याचं कौतुक करताना त्याची तुलना शिवरामशी करीत त्यामुळं त्याचा विचार असा उलट वळण घेऊन वेगानं धावू लागला याचा कुणालाच थांग नव्हता. वावटळीत सापडलेला पाचोळा आकाशास भिडावा, तसं त्याचं मन सैरभैर झालं होतं. जयरामच्या पुढच्या आयुष्याचं चित्र इंद्रधनुष्यासारखं अनेकांनी रंगवलं पण शांत जलाशयासारखं शिवरामचं मन तळापासून ढवळून निघालं.

' आपलं शिक्षणाकडं ध्यान लागलं नाय. आज हे आसं होऊन बसलं याला कोण जबाबदार ?' तो गढूळलेल्या मनान चाचपडून उत्तर शोधू लागला. त्यानं खूप विचार केला. पण त्याला त्यात घरच्यांचा काहीच दोष दिसून आला नाही. नकळत तो स्वतःचाच शोध घेत होता. त्याला त्याच्या मनाच्या एका नव्याच पैलूचा शोध लागला आपल्याच गावातल्या जागृत देवस्थानाची नव्यानेच माहिती मिळावी तसं त्याला वाटलं.

तो शाळा शिकत होता. पण शाळेच्या आवारापेक्षा मोकळ्या शिवारातच अधिक फुलून यायचा. प्राथमिक शिक्षण असंच खेळता–खेळता पार पडलं माध्यमिक शिक्षणाच्या वाकड्यावर त्याला अवघडल्यासारखं वाटू लागलं. शिक्षक शिकवत असलं तरी त्याचं लक्ष खिडकीबाहेर असायचं गाई-गुरं शेताकडं चाललेली असायची, त्यांच्या गळ्यातल्या घंटा निनादत असायच्या त्या आवाजाच्या सोबतीनं त्याचं मन शिवारात पोचायचं ज्याऱ्या पिकात उंडारायचं विहिरीवरून ऊसात. ऊसातून पेरूच्या बागेत, तेथून कांद्या-लसणाच्या वाफ्यात, रानमेव्याच्या मस्त गंधात मुक्त भटकायचं.

पाटाच्या पाण्याबरोबर दुडदुडत रांगायचं. विहिरीच्या बगाडावर उभं राहून सारं शिवार न्याहाळायचं. साऱ्या शिवाराला साद घालायचं. उभ्या पिकाला अलिंगन द्यायचं. सासुरवाशीण रूणझुण पाखराच्या सोबतीनं माहेराला जाते त्याप्रमाणं बसल्या बाकावर शिवराम शिवाराच्या स्वप्नात रंगून जाई, जेव्हा शिक्षक त्याला काही विचारतील किंवा शेजारचा विद्यार्थी त्याला धक्का देईल तेव्हा त्याची तंद्री भंग पावायची. शिवारात चौफेर मुक्त भटकून प्रफुल्ल झालेलं मन ठेच लागल्याप्रमाणं अडखळून स्थीर व्हायचं. रानपाखरासारखं वाऱ्याबरोबर भराऱ्या मारणारं मुक्त मन इतरांच्यामुळं तेव्हा थाऱ्यावर यायचं. परीक्षा जवळ आल्यावर तो धास्तावल्या मनानं अभ्यास करू लागायचा. जेमतेम पास व्हायचा. बाप्पा कान उघाडणी करायचं. 'तुझं ध्यान अभ्यासाकडं नसतं. इथून पुढं आज्याबात शिवारात फिरकायचं नाय. ऊसात, इंजनाजवळ अन् इहिरीकडं तुझं काय गठळ असतं ? तूझा तू अभ्यास बघ. जमिन जुमला जागा सोडून जाणार न्हाईत. पण हे वय पुन्हा येणार नाय. शिकून घे. नाय तर एक येळ आशी येईल की पस्तावा करत बसशील पण उपेग व्हणार नाय.'

आणि तसंच झालं. दहावीचा अभ्यास करताना वांड मनाची कुतरओढ झाली. मळ्यात काय चालल असंल, खळ्यात काय पडलं असंल, डोंगराकडच्या शेताकडं मोर नाचत असतील, इंजिनाचा पट्टा ढिला झालाय, बाप्पांनी आवळला असंल का, शेरीतली ज्वारी जोसात आलीय, पण पाखरं काय करत्यात कुणास ठाऊक, असल्या असंख्य विचाराने तो अस्वस्थ होई. विचाराच्या मुंग्या डोक्याचं वारूळ करीत. हातातलं पुस्तक हातातच राही. भिरभिरणारं मन वास्तवात आल्यावर पंखात चोच खूपसून बसणाऱ्या पाखरासारखं उदास होई. काय करायचं शिकून ? नोकरी करायची तर गाव सोडून जावं लागंल. कुठल्यातरी ऑफिसात फायलीत तोंड खुपसून बसावं लागलं. आता जाता येतय तेवढंही शिवारात जायला मिळायचं नाही. हिरवं हिरवं रान, पाखरांची गाणी, झुळझुळणारा ओढा, तुडुंब विहिर, बहरलेली पेरू–आंब्याची झाडं, रसाळ–मांसल ऊस, गिरक्या घेऊन सारं शिवार डोलायला लावणारा वारा आणि या समग्र वातावरणाला व्यापून राहिलेला विशिष्ट गंध, यातलं काहीच मिळणार नाही. अशा

विचाराने तो अधिकच उदास होत असे. त्यानं दहावीची परीक्षा कशीतरी आटोपली.

इतर पोरांसारखा तो निकालाकडं डोळं लावून बसला नव्हता. शेतात रमून गेला होता. तो जेमतेम पास झाला. पण त्याबद्दल कसलंच सुखदु:ख त्याच्याजवळ नव्हतं. पुढील शिक्षणाबद्दल गावातली इतर मुलं साताला चकरा मारू लागली. त्यानी कॉलेजात प्रवेश घेतले तरी याची काही हालचाल दिसेना, तेव्हा बाप्पांनीच त्याला म्हटलं, ' शिवराम तूबी सातारला जाऊन येकी.'

' कशाला ?'

' कालीजात नाव दाखल करायला नको का ?' जागा भरल्यम्हंजी कोण घेणार ?

' ना घेऊद्यात '

' ह्येला काय म्हंत्याती ? कुठल्या कालीजात जाणार तू ?'

' मला नाय जायचं कुठं.'

' म्होरं शिकायचं नाय का तुला ?'

' नाय शिकायचं.'

' का ?'

' शेती करणार मीं.'

' मी करतूयाच की '

' पण यापुढं मी करणार.'

' का? माझं हातपाय गळ्यात आलं व्हय ? मला शेती जमंना व्हय?'

' तसं मला म्हणायचं नाय, बाप्पा

' मग काय म्हंतोस ?'

' बाप्पा, मला पुढचं शिक्षण झेपायचं नाय.'

' पैसा कमी पडलं आसं वाटतं का ? आरं तुला कोण बालीस्टर हुयाचंय तर हो की. घरदार, जमीन जुमला कशाची पर्वा करणार नाय. तुला पायजे तेवढा पुरवीन . . .'

' ते खरंय. पण मला . . . म . . . माझं डोक चालत नाय. अभ्यासात ध्यान लागत नाय. म्हणून तर कमी मार्क पडली. कसातरी

काठावर पास झालो.'

'त्या गोष्टीचं येवढं मनावर घेऊन शाळाच सोडून देणार का? कुस्तीत हारलास म्हणून कुस्ती सोडलीस का कधी? एकांद्या साली कमी पिकलं तर तुझ्या बानं शेती सोडून दिलीय का? अं?

'शेतीची गोष्ट निराळी. शिक्षणाची निराळी. मी लई विचार केलाय. बाप्पा, मला यापुढं शिक्षण जमणार नाय. तुम्हाला शिकायची हौस हाय तर जयरामला लई शिकवा.'

'आता मातूर कमाल झाली तुझी. तू एकाएकी घाव घातलास बघ. माझ्या ध्यानी मनीबी न्हवतं आन् तुला ही काय बुद्धी आली रं? गावात म्हारा–टोराची पोरं शाळा-कालीज शिकून हापीसर–सायेब बनत्याती नि तू धावीच्या उंबऱ्यावर थांबून शेती करायची म्हंतोस?'

खाली मान घालून शिवराम ऐकत होता. बराच वेळ दोघं काही न बोलता बसून राहिलं, सुन्न होऊन बाप्पा गवताच्या काडीचं तुकडं करीत राहिलं. त्या तुकड्यांकड बघत शिवराम बसून होता. बाप्पांचं बोलणं ऐकून त्याला वाईट वाटलं पण तो आपल्या निर्णयाशी ठाम होता. आपलं म्हणणंच बाप्पाना चांगल्याप्रकारे कसं पटवून द्यावं याबद्दल तो मनात शब्दाची जुळवा–जुळव करीत होता. त्याची आई जेवण घेऊन आली तेव्हा दोघं उठलं. पाय धुवायला ओढ्यात उतरताना बाप्पा म्हणालं 'चार दिवस नीट विचार कर. म्होरचं आयुष्य डोळयापुढं आण. तू शिकला न्हाईस नि जयराम शिकला तर दोघांच्या न्हाणीमानात आंतर पडंल. तुला मानहावी वाटलं. पस्तावा हुईल ही येळ पुन्हा येणार न्हाय. बाण सुटला की की परत हातात येत न्हाय. तू विचार कर. साताऱ्यात खोली घे. आमची काळजी करू नकोस. शिकवण्या लाव. लागत्याली तेवढी बुकं घे. घराकडं ध्यान न देता अभ्यासात डोकं घाल. पैशाची काळजी करू नको ... काय म्हणतो मी?'

'मला जमणार नाय.'

'तुला काय जमंल?'

'शेती करीन मी.'

'शिक्षणासाठी अभ्यास करावा लागतो तसं शेतीसाठी कष्ट.. ..'

' करीन मी.'

' इतकं सोपं नाय ते. चार दिवस डोकं शांत ठिऊन विचार कर. तुझ्या मैतरास्नी विचार. मग मला सांग.'

चार दिवसांनीही शिवरामनं आपलं उत्तर दिलं होतं. मित्रांचा विचार घ्यावा असं त्याला अजिबात वाटलं नाही. वासरानं गाईकडं ओढ घ्यावी तसं त्याचं मन शेतीकडं ओढ घेत होतं. ते त्यालाही आवरता येत नव्हतं. इतराचा विचार घेण्याची जरूरी नव्हती. त्याच्या ठाम निर्णयानं बाप्पा मनात हळहळलं. चुटपुटलं; पण प्रत्यक्षात शिवरामाकडं त्यांनी असं पाहिलं की ते जणू त्याचा अंदाज घेत होतं, हिंमत मोजीत होतं. त्याच्या नजरेच्या प्रश्नाला शिवरामानं विश्वास दिला होता आणि दोन हाता ऐवजी चार हातांनी शेतीची मशागत सुरू झाली. दुपटीनं धान्य पिकू लागलं. आधुनिक शेतीचं आराखडं आखलं जावू लागलं. द्राक्ष-नारळीच्या लागवडीचा विचार होऊ लागला. शेती–विज्ञानाची पुस्तकं घरात येऊ लागली. बाप–लेकात दोस्तांसारखी चर्चा रंगू लागली. शिवरामाच्या शिक्षणाची खंत बाप्पा विसरून गेलं. खंत कधी आठवलं तर ' झालं हेही काही वाईट नाही,' असे ते म्हणायचं; इतकं समाधान त्यांना लाभलं होतं.

. . . . पण आता वारा फिरला होता. जयरामच्या परीक्षेचा निकाल लागला आणि सारे कुटुंबच जणू शिवरामचं अस्तित्व विसरलं. मेरीट, ॲडमिशन, फी, होस्टेल आणि जयरामची बुद्धिमत्ता याच विषयावर घरात चर्चा चालू असायची. जयरामचं कौतुक. त्याच्या शांतपणाचं. त्याच्या चिकाटीचं, त्याच्या बुद्धीचं. 'इंजिनियर. इंजिनियर.' घरात या एकाच शब्दाभोवती सारं कुटुंब गिरक्या घेत होतं. त्याचं चटकं फक्त शिवरामला बसत. जयरामचं कौतुक करताना शिवरामशी तुलना होते याचं कुणाला सोयरसुतक नव्हतं. त्याचं अस्तित्व फक्त तुलनेसाठी जमेस घेतलं जात होतं. इतर वेळी त्याच्या जेवणाखाण्याकडेही कोणाचं लक्ष दिसत नव्हतं. तो घरात आला. गेला कोणी जमेस धरेना. शिवराम विलक्षण बेचैन झाला. यांच्या लेखी आपण शेतात राबणारं जनावर. हू ऽऽ !

बाप्पा शेती करीत; पण त्यांची गोष्ट निराळी. ते त्यांच्या आई-बापास एकुलते होते. त्याच्या काळात शिक्षणाचा एवढा गहजब नव्हताही.

म्हणून त्यांच्या फायनलच्या शिक्षणालाही मान मिळाला. पण आपण? अगदीच पायथ्याशी राहिल्याची बोच त्याचं काळीज पोखरू लागली.

त्याची आई-आजी तशा अडाणी बायका पण त्याही 'इंजनेर व्हणार जयराम' म्हणून याच्या–त्याच्यापाशी बढाया मारत होत्या. जयराम पुण्या–मुंबईच्या कॉलेजाकडे पत्रव्यवहार करण्यात गुंतून गेला होता. बाप्पांनी तर कमालच केली. जयरामचा निकाल लागल्यापासून सारा शेत च्या कामाचा भार शिवरामवर टाकून ते जयरामभोवती घोटाळू लागलं. गावात याच्या-त्याच्यापाशी जयरामच्या हुशारीच्या फुशारक्या मारू लागल्या खरं तर मळ्यात इरिगेशन करायचं किती जरूरीचं होतं पण त्यासाठी तलाठ्यापासून मामलेदारापर्यंत शिवरामच हेलपाटे घालत होता. ऊसाला पाणी पाजायचं तर इंजिन बिघडलेलं. स्टार्टर सातार्‍याला जाऊन आणावा लागला. हरण्या बैल आजरला तर गुराच्या दवाखान्यात न्यायला शिवरामशिवाय कोणी नव्हतं. गाय व्याली, तिला खोंड झाला. कौतुक कोणाला नव्हतं. सारीजण जयरामच्याच कौतुकात गुंतलेली. आजारलेल्या बैलाचं आणि व्यालेल्या गायचं बघता बघता शिवराम वैतागून गेला. आपल्याकड कोणाचं लक्ष नाही. आपली कोणाला किंमत नाही, याच जाणीवेनं घराकडं वळताना त्याचं डोकं ठणकू लागलं. कपाळावर अठी चढू लागली. यातून विरंगूळा म्हणून शेजारच्या गावच्या यात्रेला जायचं त्यानं मित्रांजवळ ठरवलं. कुस्तीच्या फडात उतरायचं म्हणून तो खुशीत होता. त्यानं आपला बेत बाप्पाना सांगितला मात्र .. .. आणि कधीं नव्हे असा कोरडा नकार त्यांनी दिला. उलट त्याला मात्र वाटलं होतं सारं नेटाचं काम त्यानं स्वतःच्या हिमतीवर रेटलं म्हणून बाप्पा त्याचं कौतुक करतील हुरुपानं कुस्तीला पाठवतील. पण चालता–चालता गचकन् खड्यात पाय जावा तसा बाप्पांनी त्याला धक्का दिला होता.

आणि धुमसत असलेलं लाकूड राख बाजूला होताच वारा लागून धडाडून पेटावं, तसा तो मनात पेटून उठला. आपला राग शब्दात न दाखवता, कोणासही न सांगता तो यात्रेला निघून गेला. अस्वस्थ मनस्थितीत खेळलेल्या कुस्तीत तो हरला आणि जणू आगीत तेल पडलं. परत आल्यावर त्यानं सर्वांशी अबोला धरला. जयराम मुंबईला गेला. पण

जाताना त्याच्याशी बोलणं नको म्हणून शिवराम न सांगता बाहेर निघून गेला तो जयराम गेल्यानंतरच परतला.

त्याला समजलं जयरामला बराच पैसा खर्च केला होता. म्हणून घरातली माणसं खर्चाची आकडेवारी खुशीत येऊन सांगत होती. पण तो कुस्तीत कधी हरल्याचं कुणाच्या गावी नव्हतं. नेहमीसारखी बाप्पांनी साधी चौकशी तरी करायची होती. पण इंजिनियर पुढं शिवराम कचराचं वाटत असावा. त्यांनी चौकशी केली नाही आणि शिवरामला वाटू लागलं जयरामचं आणि आपलं अंतर असंच वाढत जाणार, ते संपवायचं असेल तर नोकरी पाहिजे. जगू मोकाशी म्हणत होता. ' मुंबईत पैसा मोजला की पाहिजे एवढ्या पगाराची नोकरी मिळंल.' पैसा ! जयरामला इंजिनियर करायला पैसा ओतला जातो. मग आपणास नोकरी मिळवायला पैसा मागितला तर काय चूक ? पाच हजार रुपये मोजून द्यायचं आन् मुंबईत नोकरी मिळवायची. जयराम इंजिनियर होईल तेव्हा आपणही लाख कमावलेलं असंल. त्याच्या इतकाच मला मान मिळंल. त्याच्यासारखं माझं कौतुक होईल. त्याच्यासाठी फक्त निकराचा हट्ट करायचा, बस्स !

शिवरामनं सकाळपासून काही खाल्लं नाही. आईनं–आजीनं चौकशी केली. ऊन्हं डोक्यावर आली आणि आई धास्तावली. त्याच्या अंगाला हात लावून पाह्यला. तोंडावरून–पाठीवरून हात फिरवला. भिजल्या आवाजात ' काय दुकतं–खुपतं का ' म्हणून चौकशी केली. तिला चिन्हं बरं दिसेना बोलभांड पोरानं अगदीच बोलणं टाकलं होतं. आणि आज तर काही न खाता मिठाची गुळणी घेऊन बसलं होतं. शेतात दशम्याबरोबर घरचा निरोप गेला आणि काही न खाता उसाला पाणी पाजायचं निम्म्यातच बंद करून बाप्पा काळजीनं घरी आलं. माचावर पडलेल्या शिवरामचं सारं अंग त्यानी चाचपून पाह्यलं. ढंकळ पाण्यात विरघळावा तसं बोलत होतं. पण शिवराम तोंड उघडून घडाघडा बोलत नव्हता. बाप्पांच्या मनात चलबिचल झाली. दुखऱ्या आवाजात त्यांनी विचारलं.

' शिवराम, परवाच्या कुस्तीचं मी विचारलंच नाय बघ. आवलगामी लागलं तर नाय ना ?'

' उहुं '

' काय दुकत-खुपत आसलं तर सांग. मला सांगायला काय अडचण हाय ?'

' तसं काय नाय.'

' मग आसं का ? जेवण घेत न्हाईस, बोलत न्हाईस, शेतावर फिरकत न्हाईस. मला वाटलं कामाच्या ताणानं कंटाळला आसशील, तर तुझं न्यारचं दिसू लागलंय. तुला कोण काय वावगं बोललं का ?'

' उहुं '

' मग काय ?'

' . . . . . '

' शिवराम . . . तुला एक विचारू ? . . . . तुला म्होरं शिकावं वाटतय ?

' अहं, मला नाय शिकायचं.'

' मग आसा तरास का करून घेतूयास ? तुझी काय तगमग हायती मला कळू दे. सांग. . . . . आरं मी तुझा वैरी हाय का रं ? तुझा बाप हाय मी. जसा जयराम तसा तू. दोघात मला कायबी फरक नाय. काल जयराम गेला तर मन सैरभैर झालंय, अन् तुझा जीवाला इसावा हाय म्हणलं तर तू आसा घोर लावतूयास. त्याला शिकायला जाया मिळालं. तू शिकला न्हाईस त्यो माझा दोष हाय का ? तू काय मनाला लावून घेतलंयस मला उलगडा होऊ दे. माझ्या परीनं मी बघतो म्होरलं. अं ?

' म . . . मला . . . मी मुंबईला जाणार.'

' क . . . कशाला . . . म्होर शिकतोस ?'

' नाय, नोकरीसाठी जाणार म्हणतो.'

' शिवराम, खुळा का काय तू ? कसली नोकरी ? कोण देणार तुला नोकरी ? तसं शिक्षण तरी . . .'

' हां ऽऽ मला माहिती आहे. तुम्ही पुढं काय म्हणणार ते. माझं शिक्षण तुम्हाला पाचुळा वाटतय, पण मी मला मिळलं ती नोकरी करणार.'

' कमाल झाली बाबा. हात टेकलं तुझ्यापुढं. शेतीत काय कमी हाय म्हणून चाललास तिकडं. आता इरिगेशन चाललंय. दराक्षाची लागवड करायची आणि मधीच तुला भिकंचं ढवाळं लागलं का ?

' असू द्या भिकंच. पण मला मातीत राबायची मालकशाही नको.'

' शिवराम .. .. तुझी कशी समजूत काढावी कळत नाय मला. तू शांत हो. खवळलास की अविचार करतोस. मी तुझा वैरी नाय. माझं ऐक. तिथली हवा, खाणंपिण तुला सोसायचं नाय. अंगी लागायचं नाय. नोकरीबी आरामाची नाय . . ..'

' त्या साऱ्याचा मी विचार केलाय. मला ते काही सांगू नका.'

' मग म्हणणं काय तुझं ? मी काय करू तेवढं सांग.'

' तुम्ही मला पैसे द्या. जयरामला दिलं तेवढंच. त्याच्यात माझ्यात तुम्हाला फरक वाटत नाही ना ? मग द्या तेवढीच रक्कम. त्या शिवाय मी अन्नपाणी घेणार नाय. मेलो तरी .. .'

' शिवराम ! . . . . काय खुळ भरलंय तुझ्या डोस्क्यात ? आसं वाईट वंगाळ बोलण्या इतकं तुझं आई–बाप कसाब हाईत असं वाटतं तुला ? नोकरीचं खूळ तुझं तूच भरवून घेतलं असशील मर्दा ., . . पण जाऊ दे. तू तुझ्या लहरीनं वागणार. आमचा इलाज नाय. देतो पैसे. त्याच्या इतकंच तुलाबी देतो. तुझं चुकीचं नाय. हिशोबाला सरळ. कामाला सरळ–इमानी पण एकांदी गोष्ट तुझ्या डोस्क्यातच तिरकी शिरती. इलाज नाय. कायबी जीवाला तकलीब देऊ नगस. दिस मावळायच्या आत पैसे देतो. तुझ्या बापाचा हा शब्द हाय. इश्वास ठेव. चल. जेव माझ्याबराबर. मी बी जेवलो नाय रं.'

आणि बाप्पांनी आपल्या हातानी त्याला वाढलं आपण जेवलं. तो पोटभर जेवलेला पाह्यला, तेव्हा त्यांनी पायात वाहना चढवल्या. दरवाज्यातून बाहेर पडताना धोतराच्या सोग्यानं पापण्याच्या कडा हळूच कोरड्या करून ते झपाट्यानं मळ्याकडं गेलं.

बाप्पांनी संध्याकाळी शिवरामच्या पुढ्यात नोटांची चळत ठेवली. आई-आजी कानकोंड्या होऊन बघत होत्या. कोणीच काही बोलत नव्हतं. यांना बाप्पांनी शेतावरच ताकीद दिली होती.

दुसऱ्या दिवशी जयरामसारखीच त्याची निघण्याची तयारी झाली. फराळाचे पदार्थ, इतर सामान व्यवस्थित बांधून झालं. घरात उदास वातावरण पसरलं. त्याला निरोप कोणीच देत नव्हतं. कोपऱ्यात बसून

आजी उसासं टाकीत होती. सामान बांधता बांधता आई डोळ्याला पदर लावीत होती. आत बाहेर करणारं बाप्पा भिंतीवरल्या तसबिरी उगीचच न्याहाळत होतं. पायाच्या अंगठ्यानं भुई टोकरीत शिवराम वेळ काढीत होता.

सामानाचं ओझं घेऊन बाप्पा स्टँडवर शिवरामला पोहचवायला आलं. तेव्हा त्याच्या मनाचा कोपरा कुठंतरी ओलावला होता. आता परत फिरावं, माघार घ्यावी, चुकलं म्हणावं, असा बाळविचार त्याच्या मनात रांगू लागला पण पुन्हा तो सावरला. ताठरला. आपण असं विरघळायचं नाही. वाकायचं नाही. साऱ्यांना धडा शिकवायचा. आपलं नशीब शोधायचं.

तो मुंबईला येऊन दिड महिना झाला होता. दहा बाय दहाच्या खोलीत ते सहाजण नांदत होते. नोकरीच्या शोधात शिवराम अनेक ठिकाणी चकरा मारत होता. कुठेतरी गिरणीत, कोणत्या तरी कारखान्यात त्याला नोकरी हवी होती. कामगार म्हणून घेतलं तरी बस् होतं. पण एवढी नोकरीही अजून त्याच्या हाताशी आली नव्हती. टांकसाळीत कामगाराला पगार चांगला होता. तिथला एक अधिकारी खोलीतल्या एकाचा गाववाला होता. त्याला शिवरामच्या नोकरी विषयी खटपट करायला सांगितलं होतं. त्याला हजार रुपये आगाऊ रक्कम म्हणून दिलंही होतं. नोकरी लागल्यावर बाकीचा आकडा पूर्ण करू म्हणून सांगितलं होतं. तोही तेवढ्यावर राजी होता. पण काम लागण्याचं अजून लक्षण दिसत नव्हतं. रोज नवीन-नवीन कारण पुढं येत होतं. इतर ठिकाणीही हेलपाटं चाललं होतं. कुठच डाळ शिजत नव्हती.

साऱ्याच गोष्टीला तो उबगला होता. नोकरीसाठी या ऑफीसातून त्या ऑफीसात, मॅनेजर–मालक–अधिकारी यांच्यापुढे लाचारीनं उभं रहावं लागत होतं, आणि शिवरामला हटकून अशावेळी मंगलकार्याची जेवणावळ चालू असता बाजूला उभे राहणाऱ्या लाचार गरीबांची आठवण यायची. अशा वेळी तेथून वाट फुटेल तिकडं धावत सुटावं आणि मळ्यात जाऊनच थांबावं असं क्षणभर त्याला वाटायचं.

बाप्पांची चार–सहा पत्रं आली होती पण मुंबईला पोहचल्याचं एक पत्र पाठवल्यानंतर त्यानं नंतर पत्रच पाठवलं नव्हतं. त्यांच्या प्रत्येक पत्रात

जयरामला भेटण्याविषयी लिहिलं होतं, पण त्याला भेटणं शिवरामला रूचत नव्हतं. जयराम धाकटा भाऊ, त्यानंच आपल्याला भेटावं. आपण काय म्हणून त्याच्याकडं भेटायला जायचं ? बाप्पा त्याला कां सांगत नाहीत शिवरामला भेट म्हणून ? आणि सांगितलं नसेल कशावरून पण तोच घमेंडीनं येत नसावा. नोकरीसाठी रोज आपण अनेक ठिकाणी जातो. नकार घेऊन येतो. तसंच एकदा जयरामकडं जावं, पहावं काय ऐट आहे ती तरी. अशा विचारानं एकदा उचल खाल्ली, आणि तो लोकलनं जयरामचं होस्टेल होतं त्या भागात गेला. चौकशी करीत करीत होस्टेलच्या फाटकाशी पोहचला. रखवालदारानं त्याला विचारलं.

'किसको मिलना है ?'

'मी .. मैं मेरे भाईको मिलने आया हूँ ।'

'कल सबेरे आवो । रातको मिलना मना है ।'

'म .. मैं तो गाँवसे आया हूँ । कल मुझे वापीस जाना है ।'

रखवालदारानं त्याला जवळ येऊन न्याहाळलं आणि म्हणाला.

'भाई जरा सम्हालके जावो । जमाना बदल गया है, नही बिगड गया है, भैय्या ।'

'अंदर जावो । मालूम पडेगा । अपनेको जल्दी है इसलिए मैं रोक नही सकता ।'

शिवराम बिचकत–बिचकत आत गेला. खांबाला टेकून दोन मुलं सिगारेट ओढत गप्पा मारीत होती. एकमेकांना टाळ्या देत होती. त्यांच्याकडं त्यानं जयरामची चौकशी केली तेव्हा त्यातील एकजण म्हणाला,

'रूम नंबर आकरा. ती समोरची रूम.'

त्या खोलीच्या दारात जाऊन तो उभा राहिला एकजण खुर्चीवर पाठमोरा बसून डोक्यावर ताट घेऊन चाचपडत घास घेत होता. त्याच्या समोर रंगीबेरंगी कपड्यात चार–पाचजण त्याला सूचना देऊन फिसफिस हसत होते. त्याचा हात भाजीच्या वाटीत गेला तेव्हा रसा सांडला. त्याच्या डोक्यावरून कपड्यावर ओघळ आले आणि त्या टोळक्याला मोठ्यांदा हासू आलं. त्याचवेळी त्यांचं लक्ष समोर–शिवरामकडं गेलं ते टोळकं एकदम हसायचं थांबलं. संशयानं पहात दरवाज्यापर्यंत पुढं सरकलं.

एका म्होरक्यानं त्याला विचारलं– ' काय पैलवान, कोण पाहिजे ?'

' जयराम, इथंच असतो ना ?'

या प्रश्नासरशी त्यानं आत वळून आवाज दिला.

' अबे ए जयरामजीके बच्चे, हो गया तेरा खाना ?
कोई मिलने आया है । जल्दी कर !'

आणि तो मघाचा डोक्यावर थाळी घेऊन जेवणारा, थाळी खाली घेऊन हात धुऊन वळला. जयराम ! शिवरामच्या काळजात चर्र् झालं.

जयराम कपड्यावरचं रस्याचं डाग गडबडीनं धुऊन ओशाळ्या नजरेनं शिवरामपुढे येऊन उभा राहिला.

' क्यो जयरामजी ये कौन है साला ?'

' म .. माझे वडिल, यांच्या शेतात काम करतात.'

' याद रख, कुछ गडबड करेगा तो सामना हमारे साथ है ।' जयरामनं भीत भीत मान डोलावली.

जयरामबरोबर बोलण्यासाठी म्हणून शिवराम त्याच्याबरोबर व्हरांड्यातून पटांगणाकडे जात होता. त्याला तिथं दोघेजण एकाला दमदाटी करीत असल्याचं दिसलं. दाढीचा एक एक केस उपटून तो विव्हळत होता आणि ते दोघे हसत होते. त्यातला एक म्हणाला. ' आज तारीख पाच. पाच केस उपटलेस. तारीखवार केस उपटायचे आमच्या समोर.'

नाहीतर दुसरीकडचे उपटून देशील.'

या विनोदावर ते घोड्यासारखे खिकाळले.

' चल भाऊ ' जयरामनं शिवरामला पुढं ढकललं. तो काही बोलणार तोच त्यानं त्याचा खांदा दाबला. या दोघांना पाहताच त्यांनी धमकावलं ' ए जयरामजीके बच्चे त्या पैलवानाला सांग नाकासमोर जा नाहीतर गुढग्यातला मेंदूपण बाहेर निघेल.'

साऱ्या प्रकारानं शिवराम भयभित झाला होता. आपण काय पहातोय हे त्याला समजेनासं झालं होतं. जयरामला डोक्यावर थाळी घेऊन जेवण का घ्यायला लावलं होतं ? त्या मुलाच्या दाढीचं केस का उपटायला लावलं होतं ? ही मुलं निष्कारण एखाद्याला का छळत होती ? यांच्यावर

देखरेख कोण करतं ? पुराचं गढूळ, गदळ पाणी नाकातोंडात जाऊन जीव गुदमरावा अशी त्याच्या मनाची स्थिती झाली होती.

फाटकाच्या अलिकडंच एका झाडाच्या आडोशाला जयरामनं त्याला थांबवलं. दबक्या आवाजात तो त्याला म्हणाला,

' भाऊ, तू आता जे काही पाहिलंस ते रँगिंग. बाहेर हे कोणाला सांगू नकोस. त्याचा काही उपयोग होत नाही. काही प्रयत्न झालाच तर आमचा छळ वाढेल.'

' पण काय म्हणून हे सहन करायचं ?'

' शिकायचं म्हटल्यावर हे आलंच . . .'

' आग लाव त्या शिकण्याला . . .'

' शु ऽऽ हळू बोल हे फक्त अजून महिनाभर चालेल.'

' पण तोवर हे का सहन करायचं ? तक्रार करता येत नाय ?'

' त्याचा उपयोग होत नाही. तो शिक्षणाचाच एक भाग म्हणून सहन करायचं. आता तू माझा भाऊ म्हणून सांगितलं असतं, तर तुझ्याशी एवढंही भेटायला मिळालं नसतं. शिवाय आणखी काही दिव्यातून जावं लागलं असतं.'

' जया, काय रं बला आलीय तुझ्यावर, या शिक्षणाच्यापायी ? वाळून चिप्पाड झालास रं, जया, सोडून दे असलं शिक्षण, मी परत जाणाराय. तू पण चल, दुसरं कुठलं तरी शिक्षण घे. मला फार मोठा धक्का बसलाय इथं येऊन. आपण उद्याच जाऊ.'

' तू जा भाऊ. मला नाही येता येणार. मी रात्रंदिवस अभ्यास केला. बाप्पांनी एवढा पैसा खर्च केला. त्यासाठी शेतात राबतात ते. तू पण जाऊन पुन्हा तिथं राबणार आहेस. हाताशी आलेल्या स्वप्नावर थोड्यासाठी पाणी ओतायचं नाही मला. दीड महिना हा छळ सोसल्याशिवाय काहीतरी लाभत नसतं.'

' जया . . तू . . . हे सोसत राहणार ? येणार नाहीस ?'

' नाही, मी इंजिनियर होण्यासाठी इथं आलोय. मला ऑफिसर व्हायचं. अभ्यासाबरोबरच समाजानं म्हण, किंवा नियतीनं म्हण लादलेला हा छळही सहन करायला हवा.'

'जया तू एवढा सोशिक कसा बनलास ? काय म्हणून तू एवढी चिकाटी दाखवतोस ? लाचारी पत्करलीस ? काय म्हणून ? का ?

का ? . . .'

'भाऊ . . . भाऊ, तू रडतोस ? रडू नकोस तू. तुझ्या, बाप्पांच्या मातीत राबणाऱ्या हातांनी, ऊन्हात पोळणाऱ्या पाठींनी, थंडीशी झोंबणाऱ्या कष्टाळू वृत्तींनी मला हे सोसण्याचं बळ दिलंय. तुम्ही जे करता ते मला जमण्यासारखं नव्हतं म्हणून मी हे स्वीकारलं. भाऊ बाप्पांना, आईला– कोणालाच यातील अक्षरही सांगू नकोस. माझी शपथ आहे तुला. अरे तुम्ही उजाडल्यापासून अंधार पडेपर्यंत राबत असता. उन्हा-पावसात, थंडी वाऱ्यात, अखंड कष्टत असता मी इथं सावलीत आहे. फक्त दोन अडीच महिने हा राक्षसी छळ सोसायचा बस्स ! त्यानंतर सरळ-लेव्हलमध्ये सारं काही. भाऊ, तू एवढा हळवा कसा होतोस रे ? . . . उलट मला तुझंच फार वाईट वाटतं. मला इथं जेव्हा जेव्हा असह्य झालं तेव्हा तेव्हा मला तू आठवलास. . . . बैलाबरोबर राबणारा, इंजिनाबरोबर धावणारा, आभाळाकडं बघून पावसाला साद घालणारा. मी त्यातून प्रेरणा घेतली भाऊ काहीतरी मनासारखं मिळवायचं असेल, तर काहीतरी मनाविरुद्ध सोसायलाही हवं. हे जीवनाचं तत्त्वच आहे. पण मला ते तुझ्या आठवणीनं समजलं म्हणून भाऊ, तू रडू नकोस नाहीतर माझं आयुष्याशी झुंज द्यायचं बळ गळून जाईल. भाऊ, माझी शपथ आहे तुला. यातील कोणाला काही सांगू नकोस. मी अगदी आनंदात आहे असंच घरी सांग. खरं ते थोडं जरी बाप्पांच्या कानावर गेलं तर ते हाय खातील . . . मला परत यावे लागेल . . . मला परत यायचं नाही. . . . मी विनंती करतो तुला भाऊ, तुझं माझ्यावर प्रेम आहे ना ? मग तू एवढं कर. पाहिलंस ते मनातच ठेव, ठेवशील ? . . . फक्त माझ्यासाठी . . . माझ्या ध्येयासाठी 'जया ऽ' शिवरामला पुढं शब्द फुटेना. अश्रू आवरेनात. आजवर तो काय समजत आला नि आज काय समजला होता ? खऱ्या जगाचे भेसूर भयानक रूप त्यानं पाहिलं होतं. जयरामचं प्रेमळ, सुकुमार मन त्या जगाशी टक्कर द्यायला उभं होतं आणि आपण दोन्ही ठिकाणी माघार घेऊन स्वतःवर प्रेम करीत होतो. त्याची विचारधारा आरपार दुभंगली.

पंधरा–वीस मिनिटात तो पूर्णपणे बदलून गेला. आपला खिसा जयरामच्या हातावर रिकामा करीत तो त्यास म्हणाला, ' मी उद्या गावाकडं जातो. खोलीवर खर्चासाठी पैसे आहेत. ते पुरतील मला. हे पैसे तू तुझ्या खात्यावर टाक. हाडना हाड दिसतंय. तब्येतीला जप. आई-बाप्पांची काळजी करू नकोस. आणि माझी . . . तुझ्या भाऊची काळजी करू नकोस. वाईट वाटूनही घेऊ नकोस. तुझा भाऊ तुझ्याइतका कष्टाळू नाय. सोशिकही नाही. मनाचा मोठा नाय. मी . . मी लई कद्रू मनाचा हाय रं जया, मला विसर. बाप्पांची आठवण ठेवून काय करायचं ते कर. खूप शिक. मोठा हो. तू मनानं मोठाच हाईस. लौकिकानंही हो. आणि हे बघ वाटलं तर कधीही गावाकडं निघून . . मी तुला दुसरीकडं कॉलेजात घालीन. कायबी कमी पडून देणार नाय . . '

कोपऱ्यावरून वळताना त्यानं पुन्हा त्या वसतिगृहाकडं नजर टाकली. रूम नंबर अकरामधे जाणारा पाठमोरा जयराम त्याला दिसत होता.

लोकल पकडून तो खोलीवर आला. आपला परत गावी जाण्याचा बेत त्यानं आपल्या सोबत्यांना बोलून दाखविला. ' अजून वाट बघ. पैसं भरल्यातीस. नोकरी मिळंलच. कुठंतरी मार्ग सापडलं. दम धर दम थोर आसतो समद्यापेक्षा . . . गावी जाऊन काय करणार ? शेतीच ना ? शेतीत काय पाह्यलंस ?'

' सारं जग ' तो मनातच बोलला. दिवसभराच्या झगझगीनं आंबून गेलेली सोबत्यांची शरीरं केव्हाच झोपंच्या स्वाधीन झाली, पण शिवरामला झोप येईना. जयरामच्या आठवणीनं राहून राहून त्याच्या पापण्या ओलावत होत्या. केव्हातरी त्याचा डोळा लागला. पण ती गाढ झोप नव्हतीच. अर्धवट झोपेत त्याला जयरामच्या वसतिगृहातील दृश्य दिसत होती, आणि मनाच्या बेचैनीत तो दचकून जागा होत होता. मधेच गावाकडच स्वप्न पडायचं. गर्भाळल्यालं आभाळ, भुसभुसीत, वापसा आलेलं शेत बी पेरायची घाई. तिपन धरायला बिगीबिगीन पुढं धावायचं आणि . . . अंथरूणावर पाय घसरून जाग यायची.

सकाळी तो उत्साहानं सारी बांधाबांध करून सोबत्यांचा निरोप

घेऊन स्टेशनवर आला. गाडी लागलेली होती. पुढच्याच बाकड्यावर बसून त्यानं पाठीमागं डोकं टेकलं. डोळे गच्च मिटून घेतलं, पण मनावरची चित्र मिटत नव्हती. पुसली जात नव्हती. पापण्याच्या कडा पुन्हा पुन्हा ओलावत होत्या. पुरात बुडता बुडता काठाला लागावं, तसं पोहण्याचा आनंद लाभला नव्हता पण जीव वाचल्याचं त्याला समाधान होतं.

आता तो मळ्यात पोहोचला. गवळ्याच्या डोंगरावरून आभाळानं काळी फळी उभी केली होती. अंगठ्याएवढी पाखरं थव्यानं आभाळात भराऱ्या घेत होती. भरकन खाली येत होती. गर्भाळलेल्या आभाळानं रान धुंदावलं होतं. उभं पिक गप् होतं, पण त्याच्या कानगोष्टी हळुहळ चालल्या होत्या. पायाचा आवाज जवळ येताच एखादं लाव्हार बांधाडातून गप्पकन् उठत होतं. भरला दाणा खावून पाखरं चांगलीच पोटाळली होती. अंगाच्या जडशीळपणानं त्यांची भरारी मंदावली होती. सारं रान तृप्त होतं. ओढ्याचं पाणी झुळझुळत होतं. जण तृप्त शिवारच ढेकर देत होतं. ओढ्याच्या काठाकाठानं तरंगणाऱ्या टिटव्या शिवराम जवळ आला तरी तिथल्या तिथच उडत होत्या पण उडून दुर जात नव्हत्या. लाल शेपटाची लहान लहान पाखरं तरवाडाच्या-निरगुडीच्या फांद्यावर पाठशिवणी खेळत होती. ओढ्याच्या काठावर बिळा-बिळातून खेकडं पुढं सरकलं होतं. शिंगासारखं डोळं काढून चाहूल घेत होतं. शांत डोहात मास्यांचा फेरफटका चालला होता. एक डोकऱ्या डोहातच एका बाजूला स्थीर होऊन त्रयस्थपणे ' चिंगळ्याची ' वळवळ न्याहाळत होता. आपलं कल्ल्याजवळचं लहान लहान पंख तो केव्हातरी मंदसं हालवत होता. सारं वातावरण भरल्या-सारखं स्थीर-गंभीर होतं. त्यात आस होती, ओढ होती, आतुरता होती. सारं शिवार कुणाची तरी वाट पहात होतं. आतुरतेनं. म्हणूनच की काय शिवाराच्या छातीची धडधड थोडावेळ थांबली होती. कोणाची तरी चाहूल घेत होती. कोणाची ? आभाळ भरून आलं होतं. वारा लपून बसला होता. सारं शिवार अबोल झालं होतं. आगमनाच्या आधीचं मूकेपण, बावरलेपण, औसुक्य सारीकडं भरून राहिलं होतं. पाऊस येणार होता. लक्षलक्ष हातांनी साऱ्या रानाला कुरवाळणार होता. त्याच्या आगमनासाठी हे शिवाराचं स्वागत !

फार दूरवरून त्यानं बाप्पांना पाहिलं होतं. ते इंजिनाशी ओणवून उभं होतं. अजूनही ते ओणवेच होते. काही तरी दुरूस्ती चालली होती. त्यांच्या अगदी जवळ जावून उभा राहिला, पण त्यांची एकाग्रता भंगली नाही. बाप्पा कुणासाठी करतात एवढं कष्ट ? कुणाकडंही तक्रार न करता ? त्यांना कधी ह्या साऱ्याचा वैताग येत नसंल ? शीण येत नसंल ? ते कधी सांगतात का ? कोणावर वैतागतात तरी का ? . . . आणि आपण ? . . .

. . . त्याचा कंठ दाटून आला. स्वतःला तो आवरू शकला नाही. एखादा कडा कोसळावा तसा तो बाप्पांच्या पायावर कोसळला. त्यांचं पाय धरून म्हणाला . . . ' बाप्पा . . . बाप्पा मी . . . पुढंच त्याला बोलवेना. दुःख कंठात दाटून आलं होतं. सारं शरीर त्या दुःखानं गदगदू लागलं.

बाप्पांनी खाली बसून त्याला उराशी कवटाळला. त्याचं अचानक येणं आणि घायाळ होऊन कोसळणं त्यांना बुचकळ्यात पाडून गेलं.

' शिवराम . . . शिवा . . . बाळा . . . . काय रं ह्य आसं ? येड्यावाणी रडतूस ? आं ? पत्र नाय. सांगावा नाय. काय ख्याली-खुशाली नाय. काय आवचित आलास नि पोरा रडतूस ? . . . नोकरी मिळाली नाय म्हणून ? ना मिळू दे . . . ही काळी काय आपल्याला कायबी कमी करणार नाय . . . अं ? . . . उगी . . . गप्प . . . मर्दा बायकावाणी आसवं काय म्हणून गाळायची ? मी तुला आंतर दिलं का ? कामधंदा बगायला गाव सोडून जा आसं तरी बोललो का कधी ? तुझं तुलाच काय वाटलं कुणाला ठावं, तुझं मन चकारलं, गेलास. मी तुला नको म्हणलं नाय. तुला रूचलं नसतं म्हणून म्हणलं नाय. तुला जे काय वाटलं ते जयरामइषयी वाटलं आसलं. पण माझा इस्वास हाय पोरा, जयराम म्होरं कितीबी शिकला तरी त्यो तुला आंतर देणार नाय. लई जीव हाय तुझ्यावर त्येचा . . . भेटला आसलं तुला . . .'

' हो . . . भेटला . . . बाप्पा . . .'

काय बोलला ? . . . इथंन जातानाबी तुझी गाठ पडली नाय म्हणून त्याचा जीव किती घोटाळत हुता. त्याच्या मायेचा अंदाज तुला नाय पोरा तुमी दोघं मला राम–लक्ष्मणावाणी. त्यो गेला त्यामागं तूबी गेलास तुमी

वनवासी झाला नि मलाच वनात पडल्याणी झालं. घरदार–शिवार मला खायाला उठलं. म्हणलं आता ह्यं सारं इसरायला हावं. इळभर कामात र्‍हाया लागलो. इसावा म्हणून घेतला नाय. पण मन काळजीनं पोखरून काढल्यानं. तुझं पत्र नाय. त्याचं बी पत्र नाय. वाटलं . . . काय माझ्या राम–लक्ष्मणाचं चाललं आसंल . . .'

'नाय. बाप्पा. मी तुमचा राम नाय आन् लक्ष्मणबी नाय. राम–लक्ष्मण दोन्हीबी आपला जयरामच. त्यो लई मोठ्या मनाचा हाय पण बाप्पा . . . मी . . . मी लई कद्रू मनाचा. बाप्पा तुमचा मुलगा म्हणून माझी लायकी न . . . ना –'

'अं हं. आसं बोलू नाय पोरा. तुला का मी वळखत नाय व्हय ? ल्हानपणापास्न तुला शेत–शिवाराचा वढा हुता. ह्यो रानवारा तुला तुझ्या बाळपणापास्न साद घालीत आला नि तू भुललास पोरा. त्याच्या शुद्ध णाला स्वैरपणा . . . स्वातंत्र्याला. त्यात तुझं चुकलं आसं कसं म्हणू पोरा ? . . . त्यात काय बंगाळ नाय . . . ह्यो रानवारा कधी कुणाला बंगाळ वाट दावणार नाय . . . उणं शिकवणार नाय . . . त्याच्या नादी लागणाराचं कधी वंगाळ व्हणार नाय . . . झालं गेलं इसर पोरा . . . पुन्हा असा आसवं गाळू नकोस . . .'

बाप्पाच्या मांडीवर डोकं ठेवून शिवराम कितीं वेळ उसासं देत होता. गर्भाळल्यालं आभाळ शिवराशी येऊन बिलगलं होतं. वारा घोंघावत होता. सार्‍या शिवाराचं अंग हलवून घुसळून काढीत होता. झाडं झुलत होती. डोलत होती. येणार्‍या पावसाला आधीच चौर्‍या ढाळीत होती. पिकं उभ्या जागी नाचत होती. रानपाखरांनी किलबिलाट मांडला होता. या झाडावरून त्या झाडावर ती भरार्‍या मारीत होती. पावसाचा मारा सुरू होईपर्यंत, त्याचं ठिकाण पक्कं ठरणार नव्हतं. रानवारा. सार्‍यांना हालवीत होता. भिववीत होता. टपोर्‍या बोरासारखं पावसाचं थेंब रानभर आदळू लागलं रानवारा भरारत होता.

. . . अजूनही शिवरामच्या गालावरून एखादा चुकार थेंब ओघळत होता आणि बाप्पांचा हात त्याच्या पाठीवरून फिरत होता. . .

० ० ०

## ३ डाव

मळयाच्या वाटंनं सर्जा नि राजा चाललं होतं. सावज हेरून चाललेल्या लांडग्यासारखं. वाटेनं घराकडं येणारं बायका–माणूस त्यांना पाहून दूरूनच जमिनीला नजर खिळवून येत होतं. त्यामुळं त्यांच्या आशाळभूत नजरा त्या बाईमाणसांच्या अंगावर स्वैर फिरत होत्या. साऱ्या गावावरून ओवाळून टाकलेल्या लिंबाच्या जोड फोडी सारखी ही दुक्कल गावाला भयप्रद होती. शेतातल्या पिकाच्या चोऱ्या गावातल्या भुरटच्या चोऱ्या, हातभट्टीं चालवण आणि गावातल्या पोरीबाळींची छेड काढणं हे त्यांचं रोजचं उद्योग झालं होतं. त्याबाबत कोणी काय म्हणायची चोरी, लागलीच त्याच्या घराला अगर गंजीला आग लागायची. भूत म्हणता भूतबाधा असा प्रकार व्हायचा. शिवाय पोलीस ठाण्यावर तक्रार केली तर उपयोग होत नव्हता. उलट ज्यानं तक्रार केली असंल त्याच्यावर काही छोटी–मोठी संकट अकस्मात येत. हे सारं गाव ओळखून होतं, पण मूग गिळून गप्प होतं. निनावी पत्र तर हवेवर जायचं, काही उपयोग व्हायचा नाही. गावातली हातभट्टी ती दुक्कल चालवत असे. पोलीसांचा हप्ता वेळवर पोहोचत होता. अधून–मधून सर्जाच्या मळयातल्या वस्तीवर

पोलीसासकट फौजदार यजमानासारखा यऊन रहात होता. गावच्या उरूसाच्यावेळी तमाशाचा फड आला होता, तर तो दुसरे दिवशी वस्तीवरसुद्धा रंगला होता. अशा सर्जा-राजाच्या कर्तुकीनं गाव धास्तावला होता. त्यांची बेबंदशाही-दडपशाही आता वाढू लागली होती. बेलगामी घोडी उधळावी तसं ते गावाच्या शिवारात हिंडत होतं. जंगलात वाघ फिरताना हरणा-पाडसांची जी गत होते, तशी गावातल्या पोरीबाळीची या दुक्कलीने केली होती. तरी अजून जाळं कुणावरच पडलं नव्हतं. पण आज नेहमी बडबडणारा सर्जा गप्प होता, म्हणून राजा मनात दुचित झाला होता. त्यानं त्याच्या शब्दाची लई वाट पाहिली पण शिप्याची विहीर आली तरी सर्जाचं तोंड उघडलं नाही, तेव्हा खेळण्याला चावी द्यावी तसा राजा बोलला, "सर्जा, आज का बोलणास रं ?"

" माझा संमदा हुरूप गेलाय आज."

" का रं ? काल जयाकडं गेल हुतास जणू, शिव्या-बिव्या दिल्या का तिनं ?"

" छट् ! ती कशाला मला शिव्या घालील ?"

" मग भेटली नसंल, म्हणून हुरूप गेलाय व्हय ?"

" भेटाय काय झालं ? भेटली की, अक्षी चांऽऽगली भेटली."

" का ? असा चिरडीला आलास ? काय झालं ?"

" झालं संमद कल्याण."

" आरं पर सांगशील का न्हाय ?"

" सांगण्यासारखं काय न्हायलंय त्ये सांगू ?"

" पण काय घडलं त्ये तर सांग. निसता तुना का लावतूस ? ...जया बधली न्हाय तुला ?"

" हुं ऽ. आरं कडू कारलं तुपात तळलं नि साखरत घोळल तरी त्याची चव कडू ती .. "

" का ? न्हाय म्हणाली का तुला ती ?"

" न्हाय कशाला म्हणतीया"

" मग कशात माशी शिकली रं ?" तसं काय यडंवाकडं बोलली आसली तर बाच्या परड्यातल्या चार-सा गंजी . . . ?"

" हॅ, ऽऽ तसलं तिच्याबाबतीत करायचं मनाला रूचणार नाय माज्या."

" आरं, झालंय काय तुला ? मला ह्ये कोडं सुटंना बग."

" तुला न्हायच कळायचं मी सांगतो संमद बयाजवार. ऐक काल आसं झालं मला ती भैरूबाच्या देवळाम्होरं दिसली. मी तिला आडवा होऊन उभा न्हायलो म्हणून ती बाजू देऊन जाया लागली. तसं मी तिला हाटकलं ती भेदरून उभी न्हायली. मी तिला म्हणलं, " मला तुज्यासंगट खाजगीत बोलायचाय ' तर म्हणली, " मग आसं चव्हाटयात कशाला ? घरी ये की,' मी म्हणलो, ' घरी याला तुझ्या बाचं भ्या हाय काय ? कधी येऊ ते साग,' तर खूष होऊन म्हणली, " मग आज दुपारी ये.' त्या परमानं मी दुपारी तिज्या घरी गेलो.'

' बा आसंल तिचा घरात."

" तसं न्हाय रं. तू मधी बोलू नगस . . . तर काय झालं मी तिच्या घरी गेलो तवा ती एकटीच हुती. मला बघून ती खूष झाली तिनं मला माचावर बसायला सांगितलं. मी बसलो. मग ती म्हणली, " दूध आणते गरम करून.' आत गेली ती आलीच नाय लवकर, तेवढयात शेजारची सुभान्याची थेरडी तिथं येऊन बसली. ती गेलीच नाय. तिनंच डाव नासीवला संमदा."

" तिनं काय केलं रं ?"

" गप्प रं तू, मधीच त्वांड खुपसतूस्. ऐकून तर घे पुरतं. तर मी म्हणत हुतो . . हं त्या येळला ती भवानी दूध घेऊन भाईर आली, . . आन् . . आन्. तिनं त्या म्हातारीसमूर माझ्या हातात राखी बांधली. मला वाचा बसल्यावाणीच झालं. माझं डोस्क आगदी औट झालं तिथंन उठताबी येईना चट्शिरी. त्यात त्या थेरडीनं लावलं पुराण. "भनी–भावांडाचं नातं आसं आसतं, अन तसं आसतं." मला आस्सी झीट आली. थोडया टाइम्बानं मी जयाला म्हणलं माझं डोस्क दुखतंय मी जातो. तिच उत्तर ऐकायलाबी थांबलो न्हाय, पर तीच दरवाज्यापातूर आली. म्हणलं बरं झालं चांगली झाडायला ईल. तावातच मी म्हणलं, " ह्ये मला इचारून बांधलंस का ?" तर म्हणाली, " त्यात इचारण्यासारखं काय आवघड हाय ? तुझ्यासारख्या कवळ्या टग्याला ह्ये लई शोभा देतं." सालीनं आजपातूरच्या संमद्या

आटकळीवर पाणी वतलं. आता त्वांड नको त्या भटक भवानीचं आपलं तर डोक्सं एकदम् खलास झालंय . . . राखी तिज्यापुढंच दिली फेकून . . . ए . . . लेका तुला हसायला काय झालं ? का दात काढतूस रं ?"

" हासू नको तर काय करू ? मला हासू येतय्च. राखी तिच्यापुढं फेकली म्हणून काय नातं बनलं त्ये तुटतय व्हय ? आन् खरंच तू कवळा टग्या आसं माझंबी सपस्ट मत झालंय . . . आरं कालची राखीपुनव कशी तुझ्या टकुऱ्यात आली न्हायरं ?"

" मी तसल्या फडतूस गोस्टी कशाला घेतूय टकुऱ्यात ?"

" एकूण तू फसलास तिच्या डावाला मी आसा फसणार न्हाय."

" आरं नको नाकानं वांगी सोलूस, ती माली तर हिच्या सवाई, न्हाय बाधली, आन् न्हाय तू गोता खाल्लास तर इचर मला." पण सर्जीचं शेवटचं वाक्य राजाच्या कानावरूनच गेलं. त्याचं लक्ष डोंगराच्या उतरणीतून खाली येणाऱ्या मोळीवाल्याकडं होतं. तिकडं पहात आपल्याच विचारावर खूष होवुन तो म्हणाला, " आयला आज दिवस चांगला दिसतुया."

" काय दिसलं दिवसाचं चांगुलपण तुला ? का मावाळला एकदाचा म्हणून म्हणतूस ?"

" आरं समूर बघतोस का ? वारनाकाडीनं गवळ्याची पोरं खाली येत्याती, सकाळी चंदनावर गेल्याती तिच झुंड हाय बघ ती.'

" व्हय तिच हायती. काय, त्यांचं लोणचं घालतोस ?"

" माझ्या टकुऱ्यात एक आयडिया हाय."

" आयडिया ? . . . कसली रं ?"

" आरं डाक बंगल्यावर खाकी दरेसमध्ये एकजण हाय नि तिघं-चोघं आणखीबी. त्यो सरपंचाचा शिव्या आसंल. फौजदार झालाय कालच दिमाक दावाय दरेसमध्ये फिरत हुता गावाल्तं. आज रानाची हवा खायला आला जणू. डाक बंगल्यात चौकटीत बसलाय."

" मग त्यात तुझी आयडिया कुठं बसलिया ते सांग की."

" हे बघ त्या पोरास्नी आपून आडवं जाऊन त्यास्नी फारीस्ट आलाय आसं सांगू. समदी मोळ्या टाकून धूम ठोकत्याल घरातल्या चुलीपतूर, नि आपुन संमद चंदन लुटू की, आचुती."

" खरं हाय गड्या. बेस हाय आयडिया."

गवळ्याची पोरं पुढं येताच राजा त्यांना म्हणाला, "ए, लेकान्. खडी फोडाय जाता व्हय रं पुढं ?. . . . ."

" का ? काय झालं ? फ . . . . फारीस्ट आलाय ?"

" व्हय, व्हय. तुमचा बा तिथं डाकबंगल्यावर तुमचं बारसं जिऊन बसलाय, बरी वाघाच्या घरात शीळी पाव्हणी निघालीय."

" म . . . . मग काय करावं म्हंता आमी, राजादादा ?"

" आरं, त्येला काय इचारता खुळ्यावाणी ? मोळ्या हितं फेका नि गाठा घर, खालतीकडनं, परीट वड्याच्या बाजूनं जा." सर्जा म्हणाला.

भेदरून गेलेल्या पोरांनी पटापट मोळ्या टाकल्या. घाईनं कुऱ्हाडीची पाती दांड्यातून काढून डोक्याच्या रुमालात खोवली नि नुसतं दांडं हातात घेऊन ती गावाकडं पळाली.

सर्जा – राजाची दुक्कल कामाला लागली. चार मोळ्यांच्या दोन मोळ्या केल्या; डोक्यावर घेतल्या दूरवरचा कानोसा घेतला. सारं शिवार शांत होतं. शंकर सेक्रेटरीच्या वस्तीवर तेवढी गडीमाणसं राबत होती. त्याचं इकडं लक्ष नव्हतं.

रस्त्याला लागताच सर्जाचं समोर लक्ष गेलं. डोक्यावरची मोळी फेकून द्यावीशी वाटली. पाय अडखळलं. त्यानं रुमालानं आपलं तोंड पुसलं. हाताला दाट दाढीचं खुंट लागलं. सकाळी दाढी केली नाही म्हणून तो स्वत:वरच चिडला. दूर दिसणारी माली बघता बघता जवळ आली होती. गुलाबी नव्या पातळात चालताना ती भलतीच लवचिक दिसत होती. काळ्याभोर केसाचा रेशमी अंबाडा तिच्या मानेला खाली झुकवीत होता. तिच्या केसाचा सुगंध सर्जाच्या नाकात शिरला, तिच्याकडं अधाशी नजरेनं पहात राजाला तो म्हणाला, " मला तुझी लई सई येत हुती. . . काल मी लई वाट पाह्यली तुझी."

" मग याचं हुतं राती. मी एकटाच हुतो. माझ्या फाटक्या चादरीत तुला घेतला असता." राजा डोळा मारून बोलला. पण–

" एऽ, तोंड संभाळून बोल रं भाड्या ! पायात पायतान हाय."

" ए आम्ही एकमेकात बोलतूय. तू जा गुमान सरळ वाटंनं. म्हणं

पायात पायतान हाय ! आमच्याबी हायती. की."

"हायती, तर चांभाराकडनं शिवून आणून दे, आय भनीला घालायला. इथं कुणाला सांगतोस रं भाडू ?"

" ए, गप् बस रं सर्जा, काय लावलाय अगाऊपणा ? तुला बायका माणसाशी कसं बोलावं त्ये कळतं का ? मालू, रागाला येऊ नगस ग. ह्यो आडमुठा हाय निसता. त्याचं काय मनावर घिऊ नगस."

" बरं, बरं. तू नको करूस त्याची वकिली ! जा गुमानं."

" आमी तर चाललोच हाय. पण एक काम करतीस कां ? तुझा राग गेला नसलं, तर सांगतो."

" सांग की. एकच का, धा सांग की."

" एकच सांग, त्या डाकबंगल्यावर कोण माणसं हायती ?"

" ती व्हय ? त्यो . . . त्यो सरपंचाचा शिव्या नि त्याचं दोस्त बसल्याती."

ती गेल्यावर सर्जा म्हणाला, "बघ कशी सटकली धामणीगत. राजंऽऽ, हितं तुमची डाळ शिजायची न्हाय. त्ये रानपाखरू हाती न्हाय लागायचं."

" सर्जा, तू तिला आसं . . . लागाट तमाशातल्यावाणी बोलायला नको होतं."

" का ? सरळ बोललो असतो, तर ती काय तुझ्या गळयात येऊन पडली असती ? आरंऽझाडावरची नागीण ती. जया बरी, निदान डंख तरी मारायची न्हाय; पण ही जात लई इखारी."

" म्हणून तू लांबन दगूड मारलास व्हय तिला ?"

"आरं पर तुला का एवढं झोंबतंय ? छट् ! नाव सोड. इदरकल्याणी हाय ती पोरटी."

डाक बंगला जवळ आला. दोघांची चाल मंदावली होती. पायाखालचा रस्ता अंधुक दिसत होता. पुढं चालणाऱ्या सर्जापुढं अचानक वेताची लांब छडी आडवी झाली. खाकी कपड्यातील जंगल अधिकारी त्याच्याकडं रागीट नजरेनं पहात म्हणाला, "हरामखोरांनो ! जंगलतोड करता, चंदन तोडता?"

खजील होऊन त्यानं मोळी खाली टाकली. राजालाही जंगलखात्यातील चार लोकांनी घेरलं.

– आणि ती इदरकल्याणी माली वस्तीवर त्यांच्या या अवस्थेचं चित्र रंगवून, पदराचा बोळा तोंडावर धरून हासत होती. ० ० ०

सुगीच्या दिवसात भल्या पहाटं घराघरात चिमण्या पेटायच्या. खुराड्यातल्या कोंबड्यांना जाग यायची. कोंबडं चढाओढीनं बांग द्यायचं. ' उजाडलंय तर आम्हाला सोडा ', असाच जणू त्यांच्या ओरडण्याचा हेतु असायचा. बाया झाडलोट करता करताच शिव्यांची पहिली ओंजळ खुराड्यावर वहायच्या. चूल फुंकण्याचा, भाकरी बडवण्याचा, फोडणी टाकण्याचा आणि अशाच घरातल्या ह्रेक हालचालींचा आवाज कानावर येत रहायचा. झोप उडून जायची, पण उठायची घाई नसायची. अंथरूणात पडूनच असं शेजाऱ्या पाजाऱ्यांच्या हालचालीचं वेध घेण्याचं मनाला जणू वळणच पडून गेलं होतं.

घाई – गडबड, मधेच शिवीगाळ अशात सकाळ साजरी होत असायची.

' आरं ये, माझ्या वाद्याऽ! दिस डोस्क्यावर आलाऽतरी वाण्या उदम्यावाणी झोपावं वाटतंय का तुला ? . . . ये काळपड्याऽ, कूस बदलाया नाय सांगितलं म्या. ऊठ, नाय तर फुकणीच घालीन टकुऱ्यात.'

शांतानानी रामप्रमहारात अशा पद्धतीनं तोफ डागायच्या. शेजारच्या

सरूनानीला तर सकाळी-सकाळी सजीव-निर्जिवातला फरकच कळेनासा व्हायचा की काय कोण जाणे. म्हणायची –

'फुकणी कुठं जाऊन बसली ? ह्या चुलीला यॅड आलंया. पेटीवल्यापस्न धूर वकतीया निस्ता. धडाधडा पेटायला काय झालं हिला ? सवतीवाणी मला पिडलंय हिनं.'

समोरचं नाना पहाटंच मोट चालवायला जाण्याच्या घाईत असायचं. बायकोशी बोलताना राग गिळून त्यांच्या तोंडून शब्दाचं गूळ-पेढं पडायचं–

' राणीसाब, बैलाचं दावं कुठल्या महालात ठेवलंय ? .. .. .. .. हं. द्या. . . बरी आठवण झाली. आज तुमी काय अमृत करणार असाल, त्यात चटणी-मीठ ध्यान दिवून फेका, अन् होऽआमची पाठ फिरली की काम उरकायच्या पाठीमागं लागू नका. मघापास्न आमचा बा पाळण्यात का हासतूय त्ये बघा. दूध पाजून शांत करा त्याला- मग बगा बाकीचा उद्योग. '

अशा घाई-गडबडीच्या, राग-लोभाच्या, शब्दाच्या फैरी कानावर पडायच्या. सकाळपासून माणसांचा चाललेला घाई-गोंधळ अकरावाजेपर्यंत निवळायचा. एक-एक करीत सारी आपापल्या उद्योगाला निघून जायची. दिवस सुगीच होतं. ज्यांच्या घरात थांबणारं कोणी नाही, त्यांच्या घरांना कुलुपं लागायची. शेतात न जाणारी, थकलेली बाया-माणसं घरात बसून असायची. मोगणाच्या-भुईमूगाच्या शेंगा तोडण्यात दिवस कारणी लावायची. धना बडवायचा, मका सोलायचा, आणि वाळवण राखायचं असलीही कामं उरकली जायची. दुपारच्या सुट्टीत शाळेतून येणाऱ्या नातवंडाना जेऊ-खाऊ घालणं व्हायचं. कोंबडया-कुत्र्यावर लक्ष रहायचं. घराची राखणं व्हायची. संसाराला आधार असायचा.

घरात बैठी कामं करणाऱ्या म्हाताऱ्या माणसांचा दिवस हां हां म्हणता निघून जायचा. पण माझ्यासारख्या ' मास्तरणीचा ' दिवस कसा जात असेल? कारण मास्तरची बायको 'मास्तरीण' या न्यायानं मला मास्तरणीची पदवी लाभलेली होती. अकरा वाजले, की गावात सामसूम व्हायचं घर एके घर याच क्षेत्रात माझं काम चालू असायचं. वातावरण निरुत्साही वाटायचं. गाव अगदी निर्जन बेटासारखं सुम्म व्हायचं. कुठंतरी गावंदरीला गाढवाची ललकारी, नाहीतर कुत्र्याची एकाकी भूंक ऐकू यायची. पुन्हा शांतता.

पिकलेल्या सुगीच्या ओलाव्याला ऊन्हं तापवायची. गावातल्या शेवग्याची, सीताफळीची पानं सोपटून जायची. वातावरणात सुन्नपणा भरून रहायचा. मन खिन्न व्हायचं. ऊन्हाच्या तावातच एखादी शिरगोळ लालबुंद झालेली कोंबडी, कर्कशपणे लांबरूंद सूर काढून कोकाटत रहायची. तिला साद दिल्यासारखा जोडीचा कोंबडा डगरीवर चढून भर उन्हाचा बांग द्यायचा. सारं विसंगत वाटायचं. ती शांतता आणि तिचा भंग सारं नको वाटायचं.

पुढ्यात दळणासाठी धान्य घेऊन ते निवडीत उगीचच दारात बसायचं. अंगणात कोणाचं काहीतरी वाळवण असायचं. त्या निमित्तानं कोणी अंगणात आलंच तर बोलणं व्हायचं. तेवढंच बरं वाटायचं.

अशीच एकदा मी दारात उभी होते. आणि वाळवणाला हात द्यायला आलेल्या गंगाआजी मला म्हणाल्या,

' अग, ये मास्तरणे, झालं का काम.. ?'

' झालं की.'

' काय झालं म्हणतीस बापडे, ईळभर घरात रुटघुट करीत बसतीस. तुला कसं गमतं ग ?'

त्या प्रश्नावरील माझं निर्जीव हसणं गंगाआजीना समजलं होतं. ओसरीवर बसत त्या मला म्हणाल्या –

' मास्तरणे, नांगऱ्याची मनू अडलीया म्हणं, कालपास्न तुला खबर हाय ? '

' नाही हो तुम्हाला कोण बोललं ?'

' साऱ्या गावभर बोभाटा पसारलाय नि तूला ठावं नाय ?'

' अंहुं.'

' सासू-सूनंचा वाद. घरात वाद वंगाळ आस्तो. आता बग, म्होरं दैवानं काय वाढून ठिवलंय ? पण वंचळी पैल्यापस्न ढानकभवानी. हाताखाली जावा टिकू दिल्या न्हायत्या, टिंगाणीन. आता त्या सूनला खाऊ का ठिऊ करतीया. मनू, गुणाची हाय बग जाता-येता चौकशी करती माझी. तिच्या नशीबाला भोग आलाय

' डॉक्टर नाही का बोलावला ?'

' डाक्तर ? मास्तरणे, तुला त्या वंचळीचा हिसका ठावं नाय ती

डॉक्तर आणील व्हय ? नाव काढू नगस.'

' . . . पण आता तर ती अडलीय म्हणता, मग डॉक्टर आणायला नको ? . नाहीतर तिला तरी दवाखान्यात न्यायला पाहिजे.'

' ह्ये तुला वाटतंय. मला बी पटतंय. पण तिला आसलं समदं नवं थेर वाटतं. तिची तिच्या घरात सत्ता हाय. सत्तम्होरं शानपण चालत नाय, माझे बाय.'

' आता सुईण असंलच . कोण ?'

' हाय की. साऱ्या गावाची तीच की, बनू माळीन.'

' त्यांचं काय मत ?'

' ती मस्त तरबेज हाय. पण सकाळीच तिनं शॉप सांगून टाकलंय की. ' बाईला हत्तं हालवा. मी भरोसा देत नाय. तुमावर समदी जोखीम हाय.'

या बातमीनं काळजात घर केलं. गंगाआजी बराच वेळ गप्पा मारत बसल्या. पूर्वी गावात कोण अडलं होतं, तिची सुटका कशी झाली. कोण काय म्हणलं, कोण नर्स कशी, कुठल्या दवाखान्यात कसा-इलाज करतात, गरोदरपणात काय होतं, बाळंतपणात कोणती काळजी घ्यायची, वगैरे एक ना दोन अनेक गोष्टी चर्चेत आल्या. पण मनाला लागलेली रुखरुख कमी न होता जखमेसारखी ठसठसत राहिली.

नांगऱ्याची मनू माझ्या चांगल्या परिचयाची होती. तिच्या घरी माझं जाणं–येणं कधी नसलं तरी कपडे धुवायला नदीवर गेले की, ती नेहमी भेटायची. कधी शेतावर जाताना दारातच थोडं थांबून बोलायची तिचं दहावीपर्यंत शिक्षण झालं होतं. ती बाळबोध वळणाची होती, तरी तिचे विचार मागसलेले नव्हते. मात्र तिच्या सासूपुढं तिच्या विचारांना थारा नव्हता.

मनू परवाच तर मला नदीवर भेटली होती. गाडघाएवढं पोट वाढलं होतं, तरी बादलीभर कपडे घेऊन ती नदीवर आली होती. एरवी तिचा स्वभाव हसरा. सदा बडबड करणारी. डोळ्यात पाणी येईपर्यंत मनस्वी हसणारी. भेटेल त्याच्या घरा-दाराची ,मुला-बाळाची आपलेपणानं चौकशी करणारी. पण त्यादिवशी फारच कोमेजली होती. बादली खाली ठेवून ती

खडकावर मूक बसून राहिली. सभोवतीचं तिला भानच नसावं. दोन्ही डोळे हातानं झाकून ती थोडा वेळ तशीच बसली तिला भोवळ आली असावी, असा विचार करून मी हातातला कपडा ठेवून तिच्याजवळ गेले.

' मनू, काय झालं ग ?'

तिनं मान वर करून पाहिलं. म्लान हसली. म्हणाली,

' थोडं अंधारल्यासारखं झालं. या खेपेला आसंच होतंय बघा, जीव काढून घेतल्यासारखं. शरीरात त्राणच राहीना.'

तिनं आपल्या तक्रारी सांगायला सुरूवात केली. तिची सासू तिला कशाप्रकारे त्रास देते, हे सुद्धा तिनं वैतागून सांगितलं. ती अशी कधी चिडलेली-वैतागलेली मला आढळली नव्हती. हे सारं सांगताना तिचं हसरं डोळं भरून येत होतं. आपल्या गरोदरपणाच्या तक्रारींना सासू ' ढोंग ' म्हणते हे तिच्या जिव्हारी लागलं होतं. नदीवर कोणी नाही असं पाहून तिनं बसल्या जागी पातळाच्या निऱ्या सोडून आपलं बेढब-सैलसर, पिकल्या फळासारखं, गरगरीत, मोठं पोट मला दाखवलं. तिला वाटत होतं आपल्या तक्रारी ऐकून, आपलं पोट पाहून ही ' मास्तरीण ' काही उपाय सुचवील. जणू मी डॉक्टरीन किंवा सुईण होते. पण मी काय सांगणार होते ? केवळ सहानुभूती दाखावायची. धीर द्यायचा. डॉक्टरचा सल्ला घ्या, म्हणायचे. एवढंच. पण तिच्या नजरेत नितांत विश्वास. आपलेपण वहिणीला विचारावं असं आपलं कोडं विचारायचं. डोळ्यात अशा विश्वासानं पहायचं की हृदयातच उडी घ्यायची. तिच्या त्या तक्रारी ऐकून. ती स्थिती पाहून मीच हळवी झाले होते मी काहीच बोलत नाही, हे पाहून तिनं कातर स्वरात मला विचारलं होतं,

" बाई, तुम्हाला असा त्रास होत होता का अशा दिवसात ?"

तिच्या प्रश्नानं मनात थरकले. पण वरवर काहीच न दाखवता म्हटलं,

' त्रास होतोच ग. मला का चुकला होता ? पण तुझ्या अशक्तपणामुळं तुला अधिक जाणवत असेल एवढंच.'

.. .. पण हे असं सारखं धाप लागल्यासारखं होणं, दमल्यासारखं होणं, हातापायाला गोळं येणं, कधी कधी तर आपण अगदीच निर्जीव

आहोत असं वाटणं, असलं तुम्ही अनुभवलंय ? .. .. थोडया तरी प्रमाणात ?,

'.. .. अग तुझ्या शरीरात रक्तच कमी आहे. म्हणून होतंय असं. चेहरा फटफटीत पडलाय. ओठ पांढरे दिसतायत. रक्तवाढीवर काही औषध नाहीतर इंजिक्शन घ्यावं. काही तरी वेडा–वाकडा विचार का करतेस ? कुणाला न झालेला त्रास तुला होतोय असा कसा विचार करतेस ? असा त्रास सगळयाजणींना या दिवसात कमी-अधिक प्रमाणात होतोच ग.'

.. पण खरं तर तिचा ' तो ' त्रास मला अगदीच अनोळखी होता. तिनं मला त्या तक्रारीवर उपाय विचारला. तेव्हाही मी न डगमगता डॉक्टरचा सल्ला घ्यायला सांगितला. त्यावेळी मात्र तिच्या चेहऱ्यावरील उत्सुकता मावळली. हिरमुसल्या तोंडाने ती म्हणाली,'

' ते काय मला ठावं नाही होय ? इथं या गावात डॉक्टराच्या हाताखाली काम करणारा आठ-पंधरावडयाला एकदा येतो. त्याला डॉक्टर–डॉक्टर म्हणून औषध घ्यायचं. ते सर्दी–पडशाला बरं. अशा दुखण्याला कराड गाठावं लागत, बाई. ते आमच्या घरच्या राजवटीत नाही बसत.'

मी म्हटलं होतं, ' मनू, तुझी पहिली दोन बाळंतपणं झाली त्यावेळी असा त्रास तुला झाला होता ?'

' बाई, पहिल्या दोन्हीही वेळेला एवढं पोट न्हवतं बघा. ह्यावेळेला पोट गाडीवाणी आलंय. वाटतं दोन हायती का तीन कुणालाला ठावं. मालकाची कमाई चिमणीचा चारा. कसं होणार–काय होणार आसं वाटतं. हे पोटुशी रहाणं माझ्या जीवावर बेतणार.'

' मनू, वेडी का तू ? अशा आवघडल्या दिवसात असं बोलू नये.' मी तिच्या बोलण्याने शहारले होते पण ती मनापासून बोलत होती. आपला दुखरा जीव हलका करीत होती. धुणे घेऊन ढेपाळल्यासारखी जाणारी पाठमोरी मनू मी परवाच पाहिली होती. आज ती मरणाच्या उंबरटयावर होती.'

मला काही सुचेनासं झालं होतं. मला तिच्या घराकडं जाण्याचं धाडस होईना. कामात मन रमेना. हातचं काम मधेच सोडून मी

अर्ध्या–अर्ध्या तासाने दारात येऊन उभी रहात होते. माझा जीव जणू टांगणीला लागला होता. मी तीन मुलांना जन्म देणारी एक आई होते; पण मनूचं या वेळचं आई होणं निराळं होतं. यातनांचं होतं. ती अडली होती. कदाचित फारच भयानक यातनांना ती तोंड देत असेल. मी तिच्याकडे जाऊन तिच्या यातना कमी होणार नव्हत्या. फक्त तिच्या यातना मी पाहू शकणार होते; पण त्यातून मनाची आणखी तडफड. नकोच ते रात्री झोपेपर्यंत मी, 'मनूची सुटका झाली की नाही?' या एकाच बातमीच्या मागावर होते; पण तिची सुटका झाली नव्हती. तिच्या यातना प्रहरांचा विचार करतच मी झोपी गेले.

मध्यरात्री एका भीतीदायक स्वप्नातून दचकून जागी झाले. स्वप्नात मनूला एका मोठ्या अजगराने गिळले होते. तिचे डोके फक्त अजगराच्या तोंडाबाहेर होते. जीवाच्या आकांताने ती टाहो फोडत होती; पण कोणीच तिला वाचवू शकत नव्हतं.

जागेपणीही स्वप्नातील तो प्रसंग डोळ्यापुढून हलेना. घशाला कोरड पडलेली, पण उठून पाणी पिण्याचे धैर्य होईना पुन्हा झोपही येईना. कूस बदलता–बदलता रात्र पुढे सरकत होती. अनेक विचाराचे रातकिडे मनाच्या काळोखात कर्कशपणे किरकिरत होते.

पहाटेच्या सुमारास बायकांची कुजबुज कानी आली. दाराजवळ जाऊन कानोसा घेतला. मनूची सुटका अजूनही झाली नव्हती व ती मध्यरात्रीपासून बेशुद्ध होती, एवढंच कळलं.

सकाळी शेजारणीकडं चौकशी केली. तिच्याकडून समजलं की सुईणीनं काल दुपारीच 'आपल्या हाताबाहेरचं काम आहे. दवाखान्यात घेऊन जा.' असं सांगितलं होतं. रात्रीपर्यंत तिनेच प्रयत्न केला पण मनू बेशुद्ध झाल्यावर ती निघून गेली. त्या आधी मनूच्या नवऱ्याला–सासूला ती खूप बोलली. शेजारीण म्हणाली,

'पैशावरून मायलेकराचं बिनासलंय बारमाही आसंच चालतं; पण येळकाळीची वळख ह्यास्नी डोळ्यानं बघावती कशी, त्येच कळंना झालंय बघा.'

'आता काय करणारायत ?'

'देवाला ठावं. मी गेले हुते तवा तिचा नवरा सोप्यात टकुरं धरून बसला हुता. सासू डोळं फिरवीत आत–बाहेर करीत हुती. मग मीबी नाय बोल्ले. जरासं मनूकडं बघितलं, बिनसुदीच हुती. काय थांबून करायचं म्हनलं. आल्ये गेल्यापावली परत.'

आता मी तरी पहायला जाऊन काय निराळं पहाणार होते ? मला घरात थांबवून ठेवणारं मन स्वतः मनूकडं सतरा वेळा जात होतं. चरफडत होतं. अशाच एका व्याकुळ क्षणात मनात विचार आले, 'आम्ही स्त्रिया एकमेकींसाठी काय करू शकतो ? एकमेकींची फाटकी आयुष्य फक्त पहात असतो. लक्तरणाऱ्या, मातीमोल होणाऱ्या, आया–बहिणींच्या आयुष्याला आम्ही फक्त साक्ष असतो आणि त्या आमच्या.. .

एव्हाना ऊन्हं अंगणात आली. मनूची आजची सायंकाळ कशी असेल ? दुपार कशी असेल ? असेल की नसेल ? मनाच्या झऱ्यातून उसळी मारून वर येणाऱ्या प्रश्नाने मीच शहारत होते. मनूबद्दल वाईट कल्पना करणाऱ्या मनास दोष देऊन, त्याच हळव्या मनास मी दिलासा देत होते. वेळ पुढे सरकत होती. अस्वस्थता वाढत होती.

आज मनूच्या घराकडे जाणारी बायका–माणसांची वर्दळ वाढली. जिथं–तिथं तोच विषय कुजबुजला जात होता. भीतीचं सावट बोलणाऱ्याच्या शब्दाशब्दावर दाट होत होतं आया-बाया आपल्या लहान-लहान पोरासहीत मनूला पहायला रीघ लावून होत्या. शेतावर उभं पिक वाट पहात असताना बाया घराघरात रेंगाळत होत्या. बाप्ये शिवारात निघताना जरा नरमाईनंच कारभारणीला शेताकडं लवकर येण्यास सांगून जात होते.

घरात चैन पडेना म्हणून. बाहेर रस्त्यावर येऊन उभी राहिले तेथून मनूचं घर दिसत होते. ते दृश्यच मन सुन्न करणारं, भीवविणारं होतं. जणू एखाद्याच्या शेवटच्या घटका भरत होत्या. पाहून येणाऱ्या दोघी-तिघी आपसात कुजबुजत आपापल्या घराकडं वळत होत्या.

'मनूचा नवरा टॅक्सी आणायलाच गेला आसंल बगा.'

'कुणास ठावं. काल दुपारपास्न माय-लेकराचं तू–मी चालं हुतं. मनूची सासू म्हणाली, 'माझी चौदा बाळातपणं झाली. पण कंदी डाक्तराचं त्वांड पायलं नाय. ही बाईच सोंगाडी, साऱ्या गावाला थेर

दावतीया, तू बाईलयेडा म्हणून तिचं चोज करतूयास . .   . '

' व्हय ? आस्सं म्हणली ती ?'

' मी सोत्ताच्या कानानं ऐकलंया, म्हणलं.'

त्या बाईचं बोलणं संपलं नाही तोच, एक टॅक्सी आमच्या जवळून मनूच्या घराकडं गेली. टॅक्सीत तिचा नवरा होता.

' टॅक्सीं आली ! टॅक्सी आली !! टॅक्सी . . . . टॅक्सी ! मोटार आली . .   टुरींग.'

साऱ्या आळीत एकच गिल्ला झाला. पोरं टॅक्सीमागं पळाली. घरा-घरातून बाया रस्त्यावर येऊन उभ्या राहिल्या. कोणी मनूच्या घराकडं गेल्या. कोणी शेजारणीच्या कानाशी लागल्या.

गर्दीनं आंगण भरलं होतं. मनूला मोठ्या लाकडी फळीवर घालून बाहेर आणली. चार-पाच धीट बायका, चार-दोन गडीमाणसं फळी सावरायला होती. गर्दी मुक्या-मुक्यानंच विभागली. फळीवरचा मनूचा देह अलगद टॅक्सीत ठेवला. शेजारची एक जाणती बाई टॅक्सीत मनू शेजारी बसली. मनूचा नवरा ड्रॉयव्हर शेजारी होताच. वेळ न घालवता टॅक्सी निघून गेली.

मला समाधान वाटलं. म्हटलं, ' आता तरी बिचारीची सुटका होईल. दोन दिवस फार सोसलं बिचारीनं.'

यमू आक्का मनूला टॅक्सीत चढवताना तिथंच होती. ती म्हणाली, " मनूला दवाखान्याला न्हेलंय खरं, पण काय आशा नाय बगा."

' . . . . ?'

' आसं बघू नका माज्याकडं, तुमी तिथं बगायला पायजे हुतं.'

' मला माहिताय ना. बेशुद्धच होती ती. हालच झाले असतील तसे . .

' आवो, बाई हालाचं नाऽय म्हणत मी. मूल पायाळू मानंपातूर बाहेर आल्यालं. काल दुपारपास्नं आऽऽस्सं लोंबकाळतय. माशावाणी वाळून गेलंय. काल मनू गुरावाणी आरडत हुती. लई हाल झालं देहाचं. जीव अजून टिकलाय ह्येच आक्रित हाय. मूल तर जित्तं न्हाईच पण अजूनबी पोट वर दिसतंय. आणिक एक पोर पोटात असणार बगा. मला खात्रीच

वाटतीया."

ते ऐकून माझी छातीच दडपून गेली. पुढं काही बोलावं, विचारावं, असं वाटलंच नाही. कंबरेतून गळून गेल्यासारखं वाटलं. अंगाला बारीक कंप सुटला. घरात येऊन ढसा ढसा पाणी प्याले, धरणीवर अंग टाकलं नि सुन्न पडून राहिले.

' मास्तरणेss ! अग, येss मास्तरणे. झॉप लागली का काय तुझी ? आss ?'

गंगाआजींच्या हाकामागून हाका आल्या. मी दारात पोहचेपर्यंत त्यांनी बरंच बोलून घेतलं होतं. मला दारात बघून नेहमीसारखं ओसरीवर बसून त्यांनी कमरेची तपकिरीची डबी काढली. चिमटभर तपकिर नाकात कोंबली. माझ्याकडं टक लावून पहात, डबी पुढं करून म्हणाल्या,

' तूबी वढ. झोप जाईल. आळूस जाईल... '

' नको मला. मी नाही ओढीत.'

' अग, तू मास्तरीण. तू आमावाणी तपकिर कशी वढशील ? अं ? .. .. पण कोमॅजलीस म्हणून एकांदी बारीला वढलीस तर बाटशील व्हय ? .'

' नकोच पण. मी कधीच नाही ओढत.'

' बssरं बाई, ऱ्हायसलं '

आणखी एक तपकिरीचा बार नाकात भरल्यावर गंगाआजींना थडाथड् शिका आल्या, तेवढ्यात त्यांची नजर वाळत घातलेल्या बाजरीत कोंबड्या शिरल्या होत्या तिकडं गेली.

' थू ss, तुमाला बोक्यानं उच्चली, एकीकीला. रोग आला तुमाला मालकीनीच्या कनगीची लिपणं फोडा की. पसाभर दाण कोंबड्याम्होरं फेकत न्हाय बाई. आन् ती दिसभर वाळवाण खात्याती माझं चैन पडू दिईनाती मला.... अग् खुड एssखुडं. शुकःशुक हांsःहा अग खुडकीss. . .?'

कोंबड्या दूर हकलून पुन्हा गंगाआजी गुडघ्यावर हात देऊन, दमून ओसवीवर बसत म्हणाल्या.

'. . . त्या वंचळीची आन् ह्या कोंबड्यांच्या धन्नीचीं-किस्नीची एक जात हाय बग. रात् न दिस संसाराच्या मागं लागल्याल्या. नका-बोटानं

संसार करत्यात्या कुणाच्या कापल्या करंगळीवर मुतायच्या न्हायत्या, व्हैमाल्या! घरचं मराय लागलंssतरी दारचं सोडायच्या न्हायत्या. मायंदाळा हावरूस. लई हपाप. . . . . ती न्हवं गाढीव ! सून आडली तरी तिच्या संगती जायाचं झालं नाय तिलाss.'

'खरंच मनूची सासू गेली नाही बरोबर. जायला हवं होतं. . . .'

'आसं तू म्हणशील. मी म्हणंन. तिला गतकाळीला तसं वाटायला नग काss ? . . . म्या तिला टोकलं, टॅक्सी चाललो तवाच. बिनआब्रूची म्हंतीया, 'माझी टिक्की म्हस याला झालीयाss. तिला बगाय नग काss?. . .'

'थूss ! तिच्या जिनगानीवर. बाई लई उफराटच्या काळजाची हाय ग. समद्या गावाला आक्रीत दावाय बसलीया . . .'

'दुसरं कोणीतरी बाईमाणूस दिसलं टॅक्सीत. . .'

'ती धूर्पदा हुती. तिचीच चुलत जाव. शेताच्या भांडणात एकमेकी डाय पडल्यात्या ; पण येळपसँग जाणून उभी न्हायली का न्हाय तीच ? वैऱ्याला दया ईल आसा पसँगच हुता. हिचं मातूर काळीज वांडरावाणी. फोडावणी, सूनंला टॅक्सीन घालून न्हिली की, लगूलग म्हशीला धुयाला नदीवर उलातली.'

'मनूचं काय होतंय देव जाणे. मुलाचं काही का होईना पण ती . . .'

'तीच हातीपायी निटनिटकी येऊ देरेss इठुबाराया ! मनू लई गुणाची पोर हाय बग. तिला पयली दोन पोर देवाच्या दयेनं चांगली हायती. लेक हाय, ल्योकबी हाय. करायचा काय आणकी पोरवडा ? . . . 'शॅत खाल्लं पाखरानं आन् आय खाल्ली लेकरांनं' अस्स हुयाला नग. जगली वाचली तर रग्गड झालं.'

मनूच्या सासूला मनापासून शिव्या देणाऱ्या गंगाआजी मनूचं एक एक गुण आठवीत होत्या. तिच्या सुटकेच्या बातमीकडं गावातल्या सगळ्या आयाबायांचं लक्ष लागलं होतं. गवताचं भारं घेऊन येणाऱ्या बाया, भुई-मूगाचं वेल घेऊन येणाऱ्या बाया, ओझं टाकता-टाकता,

'मनूचं काय कळलं का ? -- टॅक्सी आली का ?'

असं विचारत होत्या. दिवसभर रानातल्या कामात गुंतलेल्या हळव्या

स्वभावाला चैनच पडलं नसावं. घराकडं येणारा प्रत्येकजण काळजीनं विचारपूस करीत होता.

दिवेलागणीच्या वेळी टॅक्सीचा आवाज झाला.

'टॅक्सी भरारली बगा. आली वाटतं मनू'

टॅक्सीच्या आवाजाबरोबरच शांतावैनीचं बोलणं कानावर पडलं. मी भाकरी करत होते. तसाच हात धुतला. चुलीतली लाकडं मागं ओढली. त्यावर जाळ विझविण्यापुरतं पाणी टाकलं. हात पदराला पुसतच बाहेर आले.

मी रस्त्यावर आले, तेव्हा ती कातरवेळ उरी फाटली होती. आक्रोशानं सारं वातावरण विच्छिन्न झालं होतं. येथून गेलेल्या स्थितीतच मनूला परत आणलं होतं. शिवाय तिचं प्राणपाखरू उडून गेलं होतं.

मनाचा दगड करून मी मनूला पहायला गेले. तिची दोन मुलं रडून रडून व्याकुळ झाली होती. शेजारच्या आया-बाया त्यांच्या तोंडावरून हात फिरवीत होत्या. पोटाशी धरत होत्या आणि त्याबरोबरच त्यांचेही हुंदके वाढत होते. बायकांची गर्दी पडवीत मावत नव्हती. कोणी मनूचा स्वभाव आठवून डोळ्याला पदर लावत होतं. कोणाचा तिला किती त्रास झाला हे सांगताना कंठ दाटून येत होता. पलिकडं ओसरीवर मनूचा नवरा गुडघ्यात मान घालून बसून होता. दोघं उभं राहून पुढच्या सोपस्काराचं एकमेकात हळुहळु बोलत हातावर तंबाखू मळत होते.

गर्दीतून थोडं आणखी पुढं सरकल्यावर मला मनूचा देह दिसला. भिंतीला टेकवून तिला बसवलं होतं. मळवट भरला होता. दोन दिवस झालेल्या हालअपेष्टात विस्कटलेले, रखरखीत-कोरडे झालेले केस कसेतरी मागे सारून डोक्यावरून नीट पदर घातला होता. नेहमीपेक्षा तो फारच पुढे आला होता. त्यामुळेच की काय पण मनूची निर्जीवता लगेच लक्षात येत होती. मिटल्या डोळ्यांची मनू बसल्या जागी जणू शांत झोपली होती. ते सारं भयानक आणि करूण दिसत होतं.

तिची मुलं,

'आईऽऽ ए आई ग. . . बोल कीऽऽ' असं म्हणून टाहो फोडत होती. आणि ऐकणाऱ्यांच्या डोळ्यांचे झरे झाले होते. बायकांची कुजबुज आपसात

चाललेली होतीच.

'बायकाच्या जातीला बायकाचीच जात वैरी आसती बगा. सोन्यासारखी बाई निम्म्या संसारात उठली का न्हाय ?'

'व्हय बाय. खरं हाय तुझं. कुठल्याबी कामात बायकाचं दुःख वाढवायला बाईच कारण हुती. बायकाच्या जातीनंच बाईचं दुःख जाणलं पायजे तर बाप्ये ध्यान देत्याती . . .'

'अग् येऽऽसुले, त्वांड मिटीव, आली की ती, मनूची सासू.'

बोलणाऱ्या, कुजबुजणाऱ्या बाया गप झाल्या. पोरं रडतच होती. त्यांना समजूत घालणाऱ्यापण त्यांच्याबरोबर आक्रोश करत होत्या.

जोतं चढून येणाऱ्या वंचळाक्काच्या हातातील दुधाची कासंडी एका बाईनं चलाखीन काढून घेतली, आणि एकच आकांत सुरू झाला. मनूचं एक–एक गुण सांगून तिची सासू धाय मोकलून रडू लागली. रडता रडताच तिच्या माहेरी कळवलं पाहिजे म्हणून सांगत होती. लागलीच एक दोघं तिकडे गेले. आंगणात बांबू बांधले जात होते, अहेव लेणी घेऊन बायका मुसमुसत उभ्या होत्या. हिरवं पातळ, ओटीचं सामान, हळद–कुंकू, असं एकेक जमा होत होतं.

रडून रडून धाप लागलेल्या पोरांना कुरवाळीत मनूची सासू देवाला शिव्या-शाप देत होती. मघापासून रडणाऱ्या बायांचे अश्रू थांबले होते. मनूच्या सासूकडे पहाण्यात त्या कठपुसळच्या झाल्या होत्या. माझासुद्धा माझ्या डोळ्यावर विश्वास बसत नव्हता. काय पहात होते मी ? गुरासारखं ओरडणाऱ्या आपल्या सूनेचा कालपर्यंतचा आक्रोश तिच्या सासूला ढोंग वाटत होता. गळ्यापर्यंत बाहेर आलेला, वाळून गेलेला मांसाचा गोळा ती मख्खपणे पाहू शकली होती. मुलाच्या विनवणीलाही ती द्रवली नव्हती, ती मनूची सासू आज घराचं छत फाटून जाईल असा आक्रोश करत होती. जगाला दाखविण्यासाठी तिचा हा आक्रोश होता, की खरोखर तिला पश्चाताप झाला होता ?

ती मनूपुढं दुःखातिशयाने अंग टाकून गडबडा लोळत होती. दोघी–तिघी बाया तिला सावरत होत्या; पण तिला पदराचं भान नव्हतं. पाठीवर केस सुटले होते आणि ती दुःखानं बेभान झाली होती. एका बेसावधक्षणी

बायकाच्या हातून सुटून तिने भिंतीवर जोराची टक्कर घेतली.

'दातखिळ बसली या! वारा सोडा!! वारा घाला!!! वंचाळक्काची दातखिळ बसलीऽऽ या! डाक्तर बोलवाऽऽ! डाक्तर!!

'बिस्तरवार हाय नव्हं का आज. सरपंचाच्यात शामू डाक्तर मुक्कामाला आसलं की.'

'बोलवा त्येला कुणीतरी, पाऽऽक बेसुद झालीया. वारा तरी घाला की, बायानू!'

'बाजूला व्हाऽऽ! हटा बाजूला!! वारा इवुंद्या!!! किस्ने पाणी आण रांजातलं. चमचा नायतर उलातनंबी आण.'

'ए, लई शानी हु नगस. निगाली दातखिळ काढाया. यॅक करता बॅक हुयाचं. डाक्तर आणाय गेलंय नव्हं कोण तरी?'

'तान्या गेला की.'

'सुदीवर आल्यावर म्हातारी तावदरंल बरं का! डाक्तर का आणला म्हणून.'

'ढीगभर तावदरू दे! ह्या घालयेड्चापणानं तर सोन्यासारखी सून..

'ए, गप्प? तुझ्या जीबीला लगाम हाय का?'

'कशासाठी?.. .. मला नगस भ्या घालू'

'ए, बायानूऽऽ! वारा घालायचा सोडला नि काय वातुंग लावलाऽऽ? वारा घाला.'

'आलं! बरं का डाक्तर!

'आलं! आलं! डाक्तर!!

'डाक्तरला आत इवुंद्या! ..रस्ता सोडा!!... बाजूला व्हा!!!

'रस्ता द्या, डाक्तरास्नी.'

'एकच गिल्ला झाला. गर्दीतून वाट काढीत शामू कंपाऊंडर पुढं येत होता.

'तकडं नव्हं डाक्तर,.. .. ती मैत हाय. इकडं या.'

'ही बगा पेशंट! म्हातारी बेसुद झालीया.'

'नळीनं तपसा चांगलं. हाणून-बडवून घेतलंय बगा. लई आक्रूस केलाय.'

आता माझं तिथं उभं रहाण्याचं आवसान संपलं होतं. भांडं ऊतू जाऊन त्यातील रटरट थांबावी, चूल विझून, धुरानं डोळं भरावंत, असंच काहीतरी झाल्यासारखं वाटलं, झपाट्यानं घराकडं निघाले.

घरी पोहल्यावरसुद्धा मनातला आक्रोश थांबला नव्हता. मन सुन्न झालं होतं.

.. त्या दिवशी मध्यरात्रीपर्यंत झोप लागली नाही. बाहेर बायकाही बोलत होत्या. खूप उशीरा झोप लागली.

पहाटे रोजच्यासारखी जाग आली; पण ती पहाट रोजच्यासारखी उमलत नव्हती. शेजाऱ्या–पाजाऱ्यांची मुका–मुकाट्यानं नेहमीची कामं चालली होती. सारीजण अपराध्यासारखी आपापल्या घरात वावरत असावीत, असं वाटत होतं. रोजच्यासारखी शेजाऱ्यांच्या बोलाफुलांनी आज सकाळ शृंगारली नाही, तिच्या मनाच्या खोल गुहेत कालच्या कातरवेळचा आक्रोश अजूनही ऐकू येत असेल; म्हणूनच पहाटही मुक्यानंच आपल्या डोळ्यातील दहिवर सांडून गेली होती. . . . . .'

०००

## दुबळा ५

वैनी सरावणाच्या महिन्यात पाच–सा पोरं माग ठिऊन देवा घरी गेली. आन् दादाचं टकुरंच फिरलं. त्याचा तसा जीव नव्हता वैनीवर; पण सारी परपंचाची जबाबदारी अंगावर पडली. त्यात त्याला बाटलीचा नाद. त्यो कुठला सुटायला! त्याला सार आवघड लागलं. कुणी गरीबनाचार कुळवाडीबी त्याला आपली लेक देऊ धजंना. त्याच्या जीवाची नुसती उलघाल हुयाची. सारा राग पोरांच्यावर नि माझ्यावर निघायचा. तरी बरं, जाताना दोन पोरं येशा नि पारी तेवढी इथं ठिऊन बाकीची चार रापी-टुपी पोरं त्याच्या मावळचानं भनीच्या दिसाला आला त्याच टायमाला आपल्यासंग आजुळाला नेली हुती. तात्याचं दुसरं लगीन झाल्यावर पोर आणायची हुती; पण तात्याचं लगीन जमत नव्हतं. तात्या आपणहून सोताच्या लग्नाचा मुद्दा काढायचा आन् ऐकणारा औशीद घेतल्यावाणी काढता पाय घ्याचा. आसं काही महिनं गेलं. एक दिवस तात्या खुषीत येऊन मला बोलला,

‘ रामा, लगीन ठरलं! ’

‘ ठरलं ? कुठलं जमलं ? ’

' लेका ' हुबलाका ! ' कुणाचं ?' आसं नाय इचारायचंस ?

' आसं ! तुझंच लगीन ठरवुन आलो. माझं राहिलं. तुझं तर तुझं तू कोरा हायस म्हणून तुला लेक द्याला एकजण कबूल झाला .. .. आसं तोंडाकडं काय बघतूस ? पोरगी नव्वी फास हाय. देखणी हाय दैव लेका तुझं.'

मला ह्ये सारं खरं वाटत न्हवतं. गवताचा भारा घेऊन बैलापुढं टाकला. तिथंच बाजंवर आंग टाकलं. तात्याचं भाषाण टकुऱ्यात भिरभिरत हुतं—पाकुळीवाणी. ' पोरगी नव्वी फास—देखणी—दैव लेका तुझं.' खरंच सारं गाव मला ' खुजा रामा ' म्हणतंय. रंगानं काळा उच्चीला खुजा, हातपाय थिटं—आल्या गेल्याची करमणूक—अशी अंगकाठी. हीच शाळंलाबी नडली. शाळंत सारी पोरं चिडवायची. मास्तर मिशीतल्या मिशीत हासायचा. मला घंटा वाजवायला, पाणी आणयला सांगायचा, कधी कधी ' म्हशीचं शेण घरी सारवायला पायजे नेऊन दे. जा.' आसा मलाच हुकुम सोडायचा. वर्गातली संमदी पोरं निराळी नि मी निराळा. मला त्ये सारं नक्को वाटायचं. कसंतरी चौथीपतूर कटलं, त्या साली आई देवाघरी गेली. बा त्याआधीच गेला हुता मग शाळा सोडली. तात्याचा ' व्हय बा ' झालो. मनाची समजूत घातली, ' त्यो आपला पालनकर्ता हाय.' भाऊ हाय. जगाची मुस्काटात खाण्यापरीस ह्याच्या लाता खाल्ल्या तरी परवडत्याल.' तिथून सारं आसच चालत आलं. कधी काळी आपलं लगीन हुईल आसं सपनातबी वाटलं न्हवतं. आन् आज तात्या माझं लगीन ठरवून आला हुता. खुषीत बोलत हुता. रोज राती पिऊन आल्यावर मला इनाकारणी लाता घालणारा तात्या माझ्यासंगट गॉड बोलत हुता. पोरीच्या बाबरोबर त्याची देण्याघेण्याची बोलणी झाली हुती; पण मला त्ये काइ खरं वाटत न्हवतं. नव्वी फास झाल्याली, देखणी पोरगी देणारा बाप माझ्यासारख्या खुज्या, चौथी शिकलेल्याला हुंडा कसा देईल ? तात्या म्हणतो, ' तू कोरा हायस.' ते मातूर खरं हाय. पण तेवढ्यासाठी कोण पैसा मोजील ? ह्ये खरं नसणार.

काय जादू झाली कुणास ठावं; पण लगीन ठरल्यापास्न तात्या लई मऊ बोलायला लागला. माझी खाण्याजेवणाची चौकशी करू लागला.

मलाबी पाठीवर हात फिरल्यावाणी वाटायचं. बरं वाटायचं. आय गेल्यापासन आसी माया कुणी लावली नाय. आता तात्या तसं वागत हुता. माझा जीव सुखावला हुता. आठवड्यात चार-सा दिवस दुसऱ्याच्या शेतावर रोजगार करायला जात हुतो; पण त्येबी तात्यानं बंद केलं. कायमचं नसलं तरी तात्पुरतं बंद केलं हुतं; पण माझा जीव सुपाएवढा झाला हुता. तात्याच्या दगडावाणी काळजातबी पाण्याचा झरा हुता. सारं नवंच बघायला मिळत हुतं. लगीन ठरल्याची गोष्ट मतूर गावात कुणाला बोलायची नाय, आसं तात्यानं मला बजावलं हुतं. तात्याच्या घसटीतली चार-सा माणसं, आया बाया, एवढीच तांदळादिशी कराडला जायाचं, तिथे कार्यालयात लगीन हुणार हुतं. पण कायबी म्हणा आसं मुकाट्यानं, चोरट्यावाणी माझं लगीन लागावं ह्ये मला बरं वाटत न्हवतं. मला वाटायचं माझं आई-बा आसतं तर आसं केलं आसतं का त्येनी ? पण कुणास ठावं माझ्यासारख्या खुज्याचं लगीन कुणी केलं तरी आसतं का ? दुसरी एक पाल मनात कुचकुचायची, पोरीनं पाह्यलं नव्हतं. ऐन तांदळाच्या येळला ह्यो 'बटुचा अवतार' बघितला नि फेकलं बाशिंग तर.. .. ! काय घ्या ? तात्यानं काय ठरवून ठिवलंय कुणास ठावं. त्याच्यापुढं काइच बोलायला जीभ वळत नाय. तोंडात खाडकन् चापट मारील. त्यापरीस काय हुयाचं त्ये हुईल. आपण काईच बोलायचं नाय. इचारायच नाय.

मंगल आष्टका झाल्या. तांदूळ पडलं अंगावर. वाजंत्री वाजवू लागलं. आंतरपाट बाजूला करून बामण नवरीला म्हणला,

'हार घाला आता वराला.'

एकदा सोडून दोनदा आसा बोलला तवा तिनं हार घातला मला. मला वाकायला लागलंच नाय. होम-हीम सारं ना चुकता बामण पटापटा भाताच्या लावणीवाणी उरकीत हुता. नवरी मुलगी बामणानं सांगितल्या परमाणं करीत हुती. मीबी करीत हुतो, पण नवरी खुषीत नव्हती. मग मला तरी त्ये कसं बरं वाटावं ? पण वाटलं, लगीन झाल्यावर आई-बा सोडून जायाचं म्हणल्यावर पोरीच्या जातीला वंगाळ वाटणारच.

नवरीला घेऊन आम्ही गावाकडं आलो. तात्यानं गपचीप पुढची जय्यत तयारी केली हुती. गावाच्या येशीत वाजंत्री आलं. तिथनंच वाजत-

गाजत गावात येणं झालं.वरात लई थाटात काढली.'भावकीचा रूसवा काढीन' म्हणून तात्यानं शब्द दिला हुता. भाऊबंद खूष झालं. राती तीन वाजता नवरी माप वलंडून घरात आणली. बायकानी नाव घ्याला आग्रेव धरला. हो-नाय म्हणता शेवटाला तिनं माझं नाव घेतलं. 'रामचंद्र' एवढंच त्यातलं आठावत मागं पुढं काय संगीत हुतंत्ये लक्षात नाय; पण मला जन्माचं सार्थक झाल्या-सारखं वाटलं. कागदपत्रालाबी माझं नाव ' रामा ' आसंच हाय. मला कुणी 'रामचंद्र' म्हणलं न्हवतं. माझ्या बारश्याला 'रामा' आसंच नाव ठेवलं हुतं की काय कुणास ठावं. पण म्हणूनच माझं नाव 'रामचंद्र' घेतल्यानं मला आप्रूवाई वाटली. मलाबी नाव घ्यायला सांगितलं मीबी नाव घेतलं 'भाजीत भाजी मेथीची ' चंद्रसेना ' माझी पीर्तीची.' तिथं जमल्याली संमदी हासली. म्हणलं, ' हासा, आता मी लाजणार नाय.' हुर्यात मावत नव्हता आसा हुरूप आला होता.

पोरं यदुळाच झोपली हुती. त्याच्या शेजारीच सोप्यात तात्यानं आपली वाकाळ टाकली. घरात नवी गादी टाकली हुती. तात्यानं मला सांगितलं, ' आत झोप तू.' मी आत गेलो. चंदा गादीवर पडून आडचाकडं बघत हुती. मीबी वाईच उभा राहून बघत राहिलो तिच्याकडं, पण तिनं माझ्याकडं बघितलं नाय. मुद्दामच चाललंय आसं वाटलं. काय बोलावं त्ये मलाबी सुचत नव्हतं. मला भ्या वाटतं हुतं. आपल्यासारख्या खुज्यासंगं लगीन लावलं आसलं, तरी ती आपल्यावर राजी नाय. आपुण कुणावर बळजोरी करून फुकट तमाशा करू नाय, आसं मनाला दटावलं. जरा धटपणानंच गादीच्या कोन्यावर बसलो. ती पडचाल सरकली. काय बोलली नाय. बघितलंबी नाय तिनं माझ्याकडं. मन कसनुसं हासलं-माझ्या नशीबाला. दिवसभराचा हुरूप करपून गेला; पण आशा संपली नव्हती गादीवर मोकळंपणानं पाय पसरून झोपलो. तिनं आंग चोरून आंगाचं मुटकुळं केलं आन् माझ्याकडं पाह्यलं. मी हासलो. तिचा हात हातात घेतला. तिनं लागलाच सोडवून घेतला. मग मी भिताडाकडं त्वांड करून पडून न्हायलो. आसा किती येळ गेला कुणास ठावं. माझी झॉप लागली. तिच्याच घाबऱ्या घुबऱ्या आवाजानं जागा झालो.

' आहो, इथं कोणीतरी आलं होतं.'

मी म्हणलं, ' दिवा इझला का काय ?'

काळ्याकुट्ट आंधारात काइच दिसत न्हवतं. चाचपून दिवा लावला दार सताड उघडं हुतं. तात्याला हाका मारल्या, पण त्यो जागा झाला नाय. मग गुमान दाराला कडी घातली. नि तिला बजावून ठिवलं ' नुस्तं दार लोटून झोपायचं नाय.' ती पडल्या आवाजात बोलली, ' तुमचे तात्याच होते. मी ओळखलंय.' तिच्या शब्दानं माझ्या काळजाचं पाणी पाणी झालं. मी ह्याचा जाब कुणाला इचारणार नव्हतो. तात्यापुढं मी -- नागापुढं बेडकीची दशा ! जीभ टाळ्याला चिकटल्यावाणी मी गप्प पडून न्हायलो. तिची झॉप लागली, पण मी आढ्याचं वासं मोजीत राहिलो.

कोंबड्यानं बाग दिली. मी चंदाला जागं केलं. सारं सांगितलं. रोज आसं लौकर उठून साऱ्यांचा सैपाकपाणी धुणं-भांडी करावी लागत्याल, म्हणालो. तिनं ऐकून घेतलं. कामाला लागली. मी उठून रांजणभर पाणी भरलं आन् गवातकाडीसाठी मळ्याकडं गेलो. पण जीव सुचित नव्हता. साऱ्या जल्याचा धसका बसला हुता. मी कुणाला काइच सांगू शकत न्हवतो.

लग्नाला दोन-आडीच महिनं झालं. चंदाचा नि माझा जेवढ्यास तेवढा संबंध. कामापुरतं बोलणं. तिच्या मनाइरूद मी वागणार नव्हतो. ती घरातलं संमदं येवस्थित बवायची. त्यात मला बक्कळ समाधान वाटत हुतं. तात्या त्याचा पाच सहा पोरं अनि आमी दोन येळा सुखानं दोन घास खात हुतो.

एक दिवस सूर्य कलल्यावर लगूलग घराकडं निघालो. डोस्स्यावर गवताचा भारा हुता. साळ्याच्या हियीरीवर हागमा न्हावी मला बघून वाटंवरच आडवा उभा राहून बोलला, ' काय रामा, बायलंसाठी बिगीनं घरी येतुस आताशा.'

' तसं नायबा.'

' मग कसं? '

' आज रोजगारावर गेलो नव्हतो.'

' आरं रामा तुझा भाऊ रोजगार करीना नि तुझी कार्टी-पुर्टी उपासी-मरत्याती व्हयं रं ? एवढं कामामागं कसा हात धुवून लागतूस ? हांऽऽ, एवढंबरीक खरं हाय. पयला पाळणा लवकर हालणारं आसं दिसतंय.'

' कुणाच्या पाळणा ?'

'आरं सुंबाडचा तुझा–तुझ्या बायलंचा ! आसं त्त्रांड आ वासून माझ्या तोंडाकडं का बघतूस, हुबलाका ? बाइल आणली म्हणलं की पोरं हुयाचीच. पैल्यावाणी आता नाय. घोडनवऱ्या आणल्या की वर्साच्या आतच पाळणा हालतुया. त्यात तुझ्यासारख्या येडचा इदऱ्याला आसी हाळदीच्या गाभ्यावाणी बाइल मिळाल्यावर आसं व्हणारच की, अं ? ...तुझा तात्या वाहत्या गंगंत न्हाऊन निघाला बग. तात्याचं डोक्सं मातूर हाय. मानलं आपुन.'

हाणमा न्हावी माझ्या पुढच्यात्न कधी गेला तेबी मला कळलं नाय. जे काय बोलला त्यातलं झुंझुरकात दिसावं तसं थोडं थोडं ध्येनात आलं हुतं. माझी बाइल गरवार हाय, एवढं सांगाय त्यानं किती आडपडद्यानं, खुबीनं बोलण्याचं ढंग केलं. त्यात त्यानं आणिक बरंच कायतरी सुचवून ठिवलं.

माझ्या टकुऱ्यात तर वायटूळ उठलं. हुदर्यात आगीचा डोंब झाला हुता. चंदानं माझा हात तिच्या अंगाला लावूबी दिला नव्हता नि पाळणा हालणार ! आसं इपरीत कसं ? नशीबच माझं इपरीत. या समद्या गोष्टीचा खुलासा झाला पायजे. चंदाला इचाराय पायजे. खरं–खोटं काय हाय त्ये कळलं पायजे. तात्यानं ह्ये काय करून ठिवलंय ? माझ्या जल्माचं मला कोडं सुटत न्हवतं.

इचाराच्या चक्रीतच घराला भिडलो. जडशीळ पावलानं घरात शिरलो. तंवर इजवाणी कानावर बोलणं आलं,

'माझा हात सोड.'

'का ? सती सावित्री हैस जणु. आधी उजवून आलीस माझ्या भावाच्या आड लपवायला आन् माझ्याम्होरं फडी काढतीस व्हय ?

'हे सारं तुम्हापासून लपवलं नव्हतं. त्यासाठी माझ्या वडिलांनी पैसा ओतलाय. असे वागायला तू मला विकत घेतली नाही पाप्या'

'एऽऽ आवदसे ! मला पापी म्हणतीस नि तू कोण ग सटवे ? नाय हात सोडणार बऱ्या बोलानं.. ..'

'तात्याऽऽ' आसं म्हणत मी त्या दोघांच्या मधी जाऊन पडलो. पण चंदाचं दोनी हात धरून तात्या बिनयसनीच्या खोंडावाणी नाक फेंदारून

उभाच हुता. धडपडून मी पुन्हा उभा ऱ्हायलो. तात्यानं इंगळावाणी डोळं रोखून मला एक शिवी हासाडली. पुन्हा आवाज मऊ करून म्हणला, ' रामा मी तुझं कल्याण करायला गेलो पण साला दाम खोटा निघाला ! हिच्या पोटातलं प्वॉर तुझं हाय का ?'

मान हालवूनच, मी ' नाय ' म्हणालो.

' तिला ह्येच म्हणत हुतो की हियनं काळं कर,' तर म्हणती.

' मी वरडून सांगीन, माझी आब्रू घेता म्हणून.'

' काय जीभेला हाड आहे का ?'

' एऽऽ. रांडीचे आत्ताच्या आत्ता भाइर निघ.'

' माझ्या वडिलांकडून पैसे घेतले ते अशी मला रात्रीची बाहेर काढायला काय ? मेले असते तर सुटले असते. हे काय काय भोग आहेत माझ्या मागं कुणास ठाऊक.' आसं म्हणून ती रडू लागली.

' एऽ९. उंडगे भवाने! कायबी बोंबलून गळा काढू नगस,' पाप दडवायला पैसा घ्याला मोंगलाय लागून-हायली नाय. ह्याच्यामहोरं चकार सबूद काढला तोंडातन तर जोडथानं बडवीन, कुत्रीवाणी.' आसं म्हणून तात्यानं तिचं हात सोडलं. पायात पायतान घालून निघून गेला-झुंज आर्धीच सोडून गेल्याल्या रेड्यावाणी !

मी चंदाकडं म्होरा वळीवला म्हणलं, ' का ग बाई, तुला मीच कसा सापाडलो पाप दडवायला ? का गळ्याला फास टाकाया आलीस ? का तुला आवदसा आठावली ? मी आता यंड्रीन पिऊन जीव दिऊ का ?'

' तुम्हाला मी दोष नाही देणार. तुम्ही निष्पाप आहात. जे काही पाप-दोष आहेत ते माझंच. . .लहानपणी आई वारली. मला. . . संभाळत वडिलांनी स्वतःचं तारूण्य वेचलं. मी मोठे झाले पण एका सैतानानं फसवलं मला, . . . .माझ्या बाबांना माझ्या जीवाचं काही बरं वाईट होऊ द्यायचं नव्हतं, . . . .म्हणून तुमच्या भावाशी सौदा केला. सारं आधीच सांगितलं होतं त्यासाठी साठवलेला सारा पैसा ओतला आणि आता हे असं ! . . . मला माहित नव्हतं. तुमचं असं असेल म्हणून ..'

' माझ्या आयुष्याची परवड ठावं झाली ना तुला ? आता म्होरलं माझं आयुष्य कसं चितारणार तू ?'

' मी कशाला चितारू तुमचं आयुष्य ? माझं मी चितारलं तेच निस्तरतेय. मी तुम्हाला त्रास द्यायला थांबणार नाही पण तुम्ही माझ्या–साठी एक .. ..कराल ?'

' काय करू ? मी, कोण बालीस्टर हाय ?'

' नाही, म्हणूनच तर विनंती करतेय. तुमच्यासारख्या अश्राप माणसाचं नाव माझ्या बाळाचा बाप म्हणून द्या. त्याचं सर्व आयुष्य जाणाराय हो. त्या निष्पाप जीवासाठी-माझ्या बाळासाठी, एवढी भीक मला घाला. मी जन्माची ऋणी राहीन. तुमचं नाव बाळाचे वडिल म्हणून लावू ? .. .. सांगा ना .. ?'

' आजपातूर माझ्या नावावर मला बक्कळ शिव्या मिळाल्या. तुझ्या पोराचं त्यात्न हित होत आसलं तर लाव माझं नाव. पर पुन्हा या गावाला फिरकू नगस. ..काय एखाद्याच्या नशीबाची गाठ देव सर्गात बसून आसी घालून देतो की आक्रितच. ह्ये तिथनं बगायला त्याला मज्जा वाटत आसंल नाय ?'

मी आसं बोलली खरा, पण ती गुमान सैपाकास लागली हुती. पुन्हा काय बोलली नाय. मला वाटलं तसं मी बोलली, पण तिला माझं बोलणं रूचलं नसावं.

त्या राती दोघांच्याबी झोपा लागल्या नव्हत्या. रातभर चुळबुळ चालली व्हती. मला सारखा खोकला येत हुता. ती म्हणाली, ' सरकारी हॉस्पिटलमधून उद्या औषध घेऊन या.'

' उद्या तू जाणार.'

' जावंच लागणार. कोणाच्या बळावर रहायचं इथं ?'

मी पुन्हा बोलली नाय. वाटलं हिनं माझ्या दुबळ्यापणावर टोमणा मारला. राग नाय आला मला, पण बोलण्याचा हुरूप गेला. डोक्स्यावरनं वाकाळ घेऊन पडून राहिलो.

झुंजूमुंजूला उठून तिनं सैपाक केला. मला वाटलं, आज ती नाय जाणार; पण तिनं बॅग भरल्याली बघितली मी नि काळजात कालवाकालव झाली. मी तिच्याम्होरं जाऊन मंतीर टाकल्यावाणी उभा ऱ्हायलो ती झट्दिशी माझ्या पाया पडली.

म्हणली, ' तुमची कुवत मी जाणतेय. तुम्ही खंबीर असता तर मी दासी बनून तुमच्याजवळ राहिले असते. इतके देवगुण तुमच्याजवळ आहेत.'

' देव रोजगारानं कामावर जात नसतो. दारूड्या भावाच्या लाथा खात नसतो आनी दुसऱ्याच्या पोराला आपलं नाव . . .'

' म्हणूनच तुम्ही देवापेक्षाही देव आहात. तुमचा मोठेपणा मी पाहिलाय. मोठेपण रूपात नसतं, शिक्षणात नसतं. ते असतं माणसाच्या हृदयात. तुमचं हृदय माणसाचं आहे. कधी भेट झाली तर ओळख द्या. जाते मी. जीवाला जपा. वाईट वाटून घेऊ नका.'

आसं म्हणून ती उठली. वाऱ्याच्या झोतावाणी माझ्या म्होरनं निघून गेली. मी चौकटीला टेकून उभा ऱ्हायलो. कोपऱ्यावर वळताना तिनं माझ्याकडं पायलं. मला उगीचच वाटलं, माझ्यावाणी तिच्याबी डोळ्यात पाणी आसंल. त्या दिसी तात्या-पोरं संमदी जेवली. मला मातूर घास गिळवला नाय. कश्यात मन लागलं नाय. तात्यानंबी मला गाडीभर शिव्या दिल्या; पण माझ्या गावी काइच ऱ्हवतं. दिवस घरात बसून काढला. सांजंचा सैंपाक शेजारच्या नानीनं करून दिला. तात्यानं दुसऱ्या दिसी संमदी पोरं आजुळाला धाडली. मला म्हणला,

' रामा, तुझी बाईल गेली ऱ्हवं ?'

' व्हय.'

' व्हय काय म्हतूस भडव्या? ती तुझी बाईल हुती का? . . . लग्ना-आधीची पोटुशी नि म्हण-बाईल. बरं झालं टळली, आता तिला परत पाय घालू देणार नाय घरात. तुझ्या लग्नाच्या पायात मी कर्जबाजारी झालो. तुझ्या वरातीला, भावकीच्या जेवणावळीला, आनी धडुताला माझा मायंदाळा पैका गेला. तुला आजपतूर बोललो नाय. पर रावताळ्याची मी मोठ्या रकमंची उचल घेतलीया. तू उद्यापास्नं त्येच्या वस्तीवर मळ्यात कामाला जा, तुला ऐकू आलंय नव्हं ?

' व्हय.'

ऐकून मानंवर शिवाळ ठिवल्यावाणी जड वाटलं, पण तात्या मला बसून भाकरी घालणार नव्हता. जगू देणार नव्हता. ' नाय ' म्हणलं तर आसूडानं फोडील-मारील गुरावाणी. त्येचा मूळ सोभावच कसाबावाणी हाय.

रावताळ्याच्या मळ्यात कामाला जात हुतो. त्यो मला गुरावाणी राबवायचा. रंगात येऊन चंदाची चौकशी करायचा. आचकाट–इचकाट बोलून आपुनच हासायचा. माझ्या घशात घास आडकल्यावाणी हुयाचं. रावताळ्या एकदिसी म्हणला,

' रामा, लेका तुला ल्योक झाला. पेढं वाट आता.'

मी काय बोललोच नाय. त्योच पुढं म्हणतो कसा,

' चार महिनं तुझ्याजवळ हुती तवा तरी मज्जा मारून घेतलीस का भडव्या ? का नावाचाच नुसता धनी झालास ?'

मला कधी नव्हता आसा राग आला. मी रागानंच हाटकलं. ' सावकार! तुमच्या कामापुरतं बोला नाय तर तुमचं काम सोडीन.'

' बायकू सोडण्याइतकं सोपं नाय त्ये. कागदावर लिवून दिलंय तुझ्या भावानं.'

' मग त्याचं त्यो येवून करील काम.'

आसं म्हणून झिरडीकीतच हातातलं खोरं तिथंच फेकलं नि घराकडं आलो. तर सोप्यात माणसांचा खांडवा. धा–पंधरा पावणं. जाऊन तिथंच मुकाट्यानं बसलो. थोड्याच येळात उलगडा झाला. तात्याच्या लग्नाची यादी चालली हुती. तात्यानं उलटा पोरीच्या बालाच पैसा देवून लगीन जमीवलं हुतं. त्या धांदलीतबी तात्यानं माझ्याकडं एकदा रागान पाह्यलं. पण काईच बोलला नाय.

त्या राती तात्या आपल्या टगे दोस्तांच्या संगती लई पिऊन झिंगला. मध्यान्हीला सारी लांडग्यावाणी आपापल्या घराकडं पांगली. अवघा तात्या उरला. मी वाकळत मुस्कूटून पडून हुतो. तात्या झोकं खात माझ्या जवळ आल्याची चावल लागली. 'रावताळ्याच्या वस्तीवरनं का आलास?' म्हणून त्यानं मला मारायला सुरूवात केली. आधी–मधी त्याचं झोक जात हुतं, तरी त्यो मला नेटानं ठोकं देत हुता. शेवटाला दमछाक झाला. माझ्या शेजारीच आंग टाकून दिलं. त्याची गडद झॉप लागली. घोरायला लागला, पण माझा जीवमातूर रातभर माशावाणी तडफडला.

त्या रातीपासून रोजची रात तशीच दारूड्याच्या कालव्यात जाऊ लागली. एका रातीला चंदाचा इषय निघाला. हाणमा न्हावी तोंडाला

दारूचा कप लावीत बोलला, ' तात्या, सावध बरं का. पोराला रामाचं नाव लावलंय तिनं. उद्या शेता–घराची वाटणी मागाय हिथं आली तर तुझ्यावर बोंब मारायची पाळी येणार.'

' ह्ये बरीक खरं बरं कां, तात्याराव तजवीज आधीच करा.'

' कसली तजवीज करावी म्हणता ?'

' आवं, तगाईचं रेकार्ड करून रामाच्या वाटणीचं सारं तुमच्या नावावर घ्याकी करून. त्येला एवढा लहानाचा मोठा केला, त्येचं लगीन केलं, त्यो तुमाला ' नाय ' कसा म्हणील ? रांडंच्या पोराचा बा बनून भावाची पोरं बनवासी करतो काय भडवा ?'

इतका येळ लोड पडल्याला तात्या तानात येऊन बोलाय लागला, ' रामा, मला कोणत्याच गोस्टीत ' नाय ' म्हणणार नाय. त्यो एकवचनी हाय. एकपत्नी हाय. रामापर्मानं त्यो मला देणार. रामानं बिभीषणाला लंका दिली. लंका मिळणार, आयोध्याबी मिळणार.'

' मजी रामा परत लगीन करणार नाय व्हय ?'

' त्यो ढिगभर लग्नं करील. त्येच्यासंग लगीन लावाया आधी पोटुशी तर व्हायलं पायजे ना ? बीजवराला आता कोण देणार ?'

' आयला, तुकान्ना तू बोल्लास मातूर झॅक हां–रामा आता बीजवर झाला खरा पण मला वाटतं त्यो कोराच आसंल नाय का ?'

' कुणास ठावं.'

' त्येला उठवून इचारूया का ?'

' त्येला नग. तिलाच इचारू.'

' ती सातान्यात दोन रुपायावर धंदा करती. ती नाय सांगणार.'

' मग तू जा, मीच इचारीन. ती पैसं दिल.'

' ती नाय, मी पैसं देणार. ती इचारील. तू सांग.'

' तसं नग. ती पैसं दिइल. मी सांगीन. तू इचार.'

असा बीन बुडाचा कालवा रातभर चालला हुता. सकाळी पाणी भरायला उठलो तर सान्या पडवीत त्ये दारूडं आडवं–तिडवं पडलं हुतं. मधीच कुणी वकून राडा केला हुता.

आशाच एका राती तात्यानं माणसं जमवून माझ्याकडून लिवून

घेतलं. मी दिलं. सही करताना हुंदका आला, बळीचा बकरा झालो म्हणून; पण रडलो नाय. सारं ' माझं ' त्ये संपलं हुतं. रडायला काईच शिल्लक नव्हतं. मनाची समजूत मनानं घातली.

रावताळचाच्या मळ्यात काम करीतच हुतो. वांड पोराच्या पायातल्या चेंडुवाणी सारी दुनियाच मला जणू लाथा घालायला टपली हुती. रावताळचा आलिकडं लईच चेकाळून बोलायचा. झपाट्यानं काम करून राग आवरायचा परेत्न करायचो. तात्यानं मला खडसावलं हुतं, 'रामा, रावताळचाला उलट बोलू नगस. नाय तर पायतानानं टाळक्याचं कॅस काढीन.' नशीबाला बोल लावून दिवस काढीत हुतो.

तात्यानं संगमावर लगीन लावून बायकू आणली. आजुळास्न पोरं आणली. त्यावर एकादा महिनाच गेला आसंल. एक दिसी तात्या म्हणला, ' रामा, तुझं खोपाट वायलं उभं कर. तिला साऱ्यांचा सैपाक करणं जमत नाय. तिला दिस गेल्याती. तू यगळं करून खा.'

' व्हय.' म्हणलं, गळ्यातला हुंदका गिळला.

दोन दिवस मीच खोपाट उभं करण्याय राबलो. हातानं करून खाऊ लागलो; पण रावताळचाची चाकरी सुटली नाय आन् तात्याचा हुकुमबी चुकला नाय. नशीब ! कोण बदलायचं याला ?

या साली मक्याची कणसं मायंदाळी लागली. वैनी बाळातीण. तात्याला तिच्यामुळं कुठं जाता येत नव्हतं. एक दिशी त्येनं मला साताऱच्या मंडईला धाडलं.

कणसाची इक्री चांगली झाली. ऊन डोक्स्यावर आलं हुतं. गाडीभर कणसातली पाटीभर कणसं उरली हुती. पांढऱ्या पातळातली एक बाई म्होरं येऊन उभी ऱ्हायली. कणसाच्या दराची चौकशी नाय, काइ नाय, नुसती उभी. मी वर पायलं. चंदा हुती. मी वळखलं. ती हासली. मला आपसूक हासू आलं. काळात फूल उमालल्यावाणी हुशारी वाटली.

' ओळख विसरला नाही म्हणायंच.'

' वळख कशी इसरंल ?'

' खोलीवर येता ? .. .. चला की जवळच आहे.'

' माझी कणसं ?'

' घालून टाका व्यापाऱ्याला.'

' घेवारी पैसं कमी देत्याल.'

' गिऱ्हाईकाला विकल्यावर किती मिळतील याचे ?'

' पंधरा–सोळा रूपयंतरी.'

मला तिनं एका घेवाऱ्याला ती कणसं द्या रूपयंला इकायला लावली. आपली एक दहाची नोट त्यावर ठिवली. माझ्याम्होरं इस रूपयं धरलं. मी नको व्हय म्हणत हुतो पण घ्यालाच लावलं, पैसं घेतलं तेच बेस झालं. नाय, म्हणलं तरी तात्याला हिशोब द्याचा हुताच की.

' चला.' तिच्या शब्दानं मी भानावर आलो. बैलगाडीत पाटी ठिवली. बैलांच्या पुढ्यात बाटुक टाकलं. निघालो.

चालता चालता ती म्हणली, ' मी दवाखान्यात नर्सचं काम करते. बाळाला बाबा सांभाळतात.'

तिच्या मागोमाग मी चाल्लो हुतो. चौकात परसू आण्णाचा शामा दिसला. त्वांडतरी कसं दडवू ? अगदी तोंडाम्होरचं उभा. त्येनं टवकारून पायलं. माघारी वळावं वाटलं पण चंदा सारखी मागं वळून बघायची. दाव्याची वढ लावल्यावाणी तिच्यामागं गेलो. दारात गोबरं, गोरपान बाळ उभं हुतं. चंदाकडं झॅप टाकून गेलं. त्ये मला बघून बावारलं हुतं. ती म्हणाली,

' अरे, ते तुझं बाबा आहेत.'

माझ्या नाका–तोंडात पाणी गेल्यावाणी झालं. मी आवती भवती पायलं. खाटंवर तिचा बा हुता. माझ्याकडं बघून हासला. आता लई थकला हुता. हाडं ऱ्हायली हुती नुसती. चंदानं मला बसायला खुर्ची दिली. मला आमच्या लग्नातली सय आली. त्या येळंला दोघं जोडीनं खुर्चीवर बसलो हुतो. आताबी जवळच टूलावर बसून ती बोलत हुती. नोकरी, बाळ, बाचा आजार, लोकांचा तरास आशाच इषयावर बक्कळ बोलत हुती. माझी नजर तिच्या खोलीभर फिरत हुती. बाळावर येऊन ठरत हुती. भित्तीवर बाळकिस्नाच्या फोटूला उदबत्त्या लावल्या हुत्या. चंदाच्या आई–बाचा फोटू हुता. चंदाचा एकबी नव्हता. फोटू काढायजोगती आसू नवी तिनं फोटू काढला नव्हता, आसं मातूर न्हवं. आमच्या लग्नातबी तिच्या

बानं हौसंनं मॉप फोटू काढलं हुतं.

च्या देताना तिनं इचारलं, ' माझंच सांगत बसल्ये. तुमचं कसं चाललंय ?'

मी सारं खरं त्ये सांगून टाकलं. तिला ठावं असावं म्हणलं. मजी म्होरं कधी वढ लागली तरीं गावाकडं फिरकायचीं नाय. सारं ऐकून तिच्या डोळ्यात पाणी दाटून आलं. म्हणली, ' माझ्यामुळं तुम्हाला किती भयानक भोगायला लागलं हो. काहीं-काऽऽही अपराध नसताना. तुमचं असं व्हायला नको होतं. तिथं मी तुमचं जीवन पाह्यलंय. तेव्हा काळीज तिळ तिळ तुटायचं. तुम्ही बाळाला नाव लावायला परवानगीं दिली. दुसऱ्या कुणी दिली नसती. तुमचे हे उपकार मी तुमची सेवा करून फेडीन. तुम्ही इथं माझ्याजवळ रहा. बाळाला सोबत म्हणून. रहाल ?'

'मी ? .. .. मला नाय जमणार. तात्या राहू देणार नाय.'

' तिथं काय आहे तुमचं ? तात्या तुम्हाला काय देतात ?'

' रावताळ्याचं कर्ज फेडायचं हाय. त्येच्याकडं चाकरी हाय मी. आपल्या लग्नातलं कर्ज हाय.'

' आपल्या लग्नातलं कसलं कर्ज ? पैन् पैचा खर्च बाबांनी केलाय. एक पैसासुद्धा तुमच्या भावानं खर्च केला नाही. गावाकडच्या जेवणावळीचा नि वरातीचा खर्चसुद्धा आधीच घेतला होता.'

' त्ये काय का आसंना. मेल्यालं मढं उकरायचं बळ माझ्यात नाय. कुठंतरी कामच करायचं. त्ये रावताळ्याकडं करतो. त्यात दिस सरत्याती.'

' पण एवढा अन्याय का सहन करायचा ? त्यांना एवढं का भ्यायचं ? तुम्ही आता जाऊच नका गावाकडं.'

' तसं कसं ? तसं नाय जमणार. बैलगाडी कणसं भरून आणलीय .. ..'

' नेऊन सोडून या तिथं.'

' नग, नग. मी नाय ऱ्हाणार हिथं. तात्या माझा जीव घिईल. जातो. आता नाय थांबत....'

आसं म्हणत मी बिगीन उठलो. ती माझ्याकडं बघत हुती, पण जणू तिच्या डोळ्यांच्या कवड्या झाल्या हुत्या. साऱ्या जगावरचा इश्वास

गुमावल्यावाणी तिचं डोळं थीर झालं हुतं.

चौकात येस्तोवर मागं पायलं नाय, मग मातुर जीव नाय ऱ्हायला. मागं वळून पायलंच. खोलीच्या दारात चंदा बाळाला घिऊन उभी हुती. तिच्या डोळ्यात पाणी आलं आसावं. तिनं डोळ्याला पदर लावला हुता; पण ती मला दुबळी वाटली नाय.

बिगीन मंडई गाठली. बैल गाडीला जुपलं नि गावाची वाट धरली. तात्या दारातच उभा हुता. जणू माझी वाटत बघत हुता. त्याच्यापुढं सारा गल्ला ठिवला. त्येनं मोजलं. मी त्याच्याम्होरं उभाच हुतो. बारीक डोळं करून त्येनं बिबळ्यावाणी माझ्याकडं पायलं. अंगावर काटा उभा ऱ्हायला. तात्यानं मला इचारलं ' यवढंच ?'

' व्हय.'

' त्या रांडंला भाड किती दिलीस ?'

' कु.. ..कुणाला ?'

' तुझ्या बायलला.'

' तिला मी एक पैसाबी दिला नाय.'

' मग काय तिनं तुला भाड दिली ?'

खरं तर दिली हुती. खोटं नव्हतं. पण आसलं खरं बोलणं तात्याला खरं वाटलंच नसतं, मी काइ बोललो नाय. तसाच उभा.

' आरं, बोल की भडव्या. का गेला हुतास तिच्याकडं ? सारं गाव माझ्या तोंडात शॅण घालील. आई–बाच्या मागं मीच तुला मोठा केला, लगीन केलं, कर्जबाजारी झालो तुझ्या भल्यासाठी. आन् तू त्या येस्वा बाईकडं भेटायला जातूस ? तुला मस्ती आलीय का ? तिचं घा जणाचं प्वॉर तू संबाळायला गडी म्हणून ऱ्हाणार काय तिथं? कुळ नरकात घालणार हैस का? आरं, बोल कीऽऽ.बोल.. थांब नू आसा नाय त्वांड उचकाटायचास.'

त्यानं माझं थिटं हात एका हातात धरलं. खडाखड चापटी दिल्या. खाली कोलमाडलो, त्यो पिसाळला हुता जणू. पेकाटात लाथा घालू लागला. कुत्र्यावाणी माझी दशा झाली. मला आरडावं वाटंना. आरडलो-वराडलो तरी कुणी सोडवत नाय. नुसती दळिद्री नशीबाची झॅयरात हुती. कशाला रडायचं ? कण्हत कुथत आंग चोरून सोसू लागलो. त्वांड मिटवून

डोळं पुसीत न्हायलो. वैनी आत हुती. पोराला आडवं घिऊन नवऱ्याची मर्दुम्की बघत हुती. माझ्या खुज्या बांध्याची हालचाल तिला हासू आणीत हुती. मला माझ्या दुबळ्यापणाचा राग आला. थिटं हात–पाय कापून टाकावंत आसं वाटलं. ह्ये जमणार नव्हतं. तात्यानंच मला लई-लई मारावं आसं वाटलं, मजी सारं संपंल. पुन्हा आसं सोसावं लागणार नाय. सर्गात गेल्यावर देवाला म्हणीन, 'मला पाखराचा जल्म दे. माणूस माणसाला कधी माणसासारखं जगू देत नाय. जग लई वंगाळ हाय. माझं थिटं हात कष्ट करायला खंबीर आसलं तरीबी मला वाचवू शकलं न्हायती. चंदाला-तिच्या बाळाला मी आधार दिऊ शकलो नाय.' आणिक देवाला इचारीन, 'आशा वंगाळ जगात चंदाच्या बाळाला तू का पाठीवलंस ? तुला दुनियेची रीत ठावं आसूनबी तू वंगाळ केलंस. मला थिटं हात–पाय दिलंस म्हणून मीबी दुबळा झालो. आसं करून तुला काय मिळालं ?'

कितीबी आंग चोरलं तरी तात्याच्या लाथा बसत्याती. भुईत शिरता येत नाय. जीवसुदीक जात नाय.

० ० ०

# निवेद ६

घरभर पुरणाचा खमंग वास सुटला होता. शांती पुरण वाटत होती. धुरानं डोळं भरत होतं. केसाच्या बटा कपाळावर रूळत होत्या. त्यातून घाम ओघळत होता. ती पुरणानं भरलेला हात तसाच वर नेऊन बाहीनं घाम पुसायचं नि केस मागं सारायचं काम ती एकाचवेळी करत होती. पोटात भुकेचा डोंब उसळला होता. पुरण वाटायची घाई करत होती. वाटताना तिची आतडी गोळा होऊन येत होती. कांत्या आत बाहेर करीत होता. मधूनच तो शांतीजवळ येऊन, ' झालं का ?' विचारत होता. काही वेळानं त्यानं तसं विचारणं सोडून दिलं. नुसताच येऊन उभा रहायचा. तेही त्याला फार वेळ जमलं नसावं, कारण त्यानं शांतीपुढं पुरणासाठी हात पसरला. तिनं पुरणाच्या हातानं त्याच्या हातावर चापट मारली. त्याच्या डोळ्यात टच्कन पाणी आलं. नाक ओढीत त्यानं तिच्या पाठीत बुक्की घातली नि अंगणात पळाला. शांती पुरण वाटत वाटत मुसमुसत होती.

' शांते, निवेद तयार झालाय. बांधून देत्ये. शेताला बिगीबिगी जाऊन ये.'

' झालंच माझं. तू निवेद बांधायला लाग.'

' कांत्याला संग ने.'

' हुं.'

टोपलीत ' निवेद ', पाण्याचा तांब्या, हळद-कुंकवाच्या पुड्या घेऊन शांती शेतावर निघाली, तेव्हा कांत्या दिडक्या चालीनं तिच्याबरोबर चालू लागला. त्याची ऐट पाहून शांती त्याच्यावर उगीचच खेकसली, ' ह्ये बग, नीट चालायचं आसलं तर संग ये, न्हायतर घरात बस.'

' बसलो असतो ग.. .. पण तू निवेद दिऊन आल्याबिगर आई जेवण देणार नाय ना.'

' बरं बरं कावळ्या, संमद खाण्यावरच ध्यान तुजं.'

शांती मनाशी म्हणाली, ' त्याचंच काय आपुणबी खाण्याचाच इचार करतो की. खरं तर भूकंची येळ होऊन गेलीय. काल राती अर्ध्या पोटानंच उठावं लागलं. करणार काय ? टोपलीतच नव्हतं. आईनं तर आपल्यापरीस थोडं खाल्लं. काम तर किती ढीगभर करती. जेवताना म्हणती ' बास झालं मला. तुमी घ्या खाऊन.' खरंच आईचं तेवढ्यानं पॉट भरत आसंल का ?'

त्या विचारानं तिच्या पोटात कालवाकालव झाली. ती बिगीबिगी पाय उचलू लागली, कांत्या तिच्या चालीनं चालण्याच्या प्रयत्नात उड्या घेत चालला होता. त्याचा ऊर धपापत होता. कपाळावरचा घाम तो मनगटानं पुसत होता. गोऱ्यापान कानशीलावर उन्हानं लाली पसरली होती. क्षणभर तिला वाटलं त्याला जवळ घेऊन कुरवाळावं, पण त्याची ही पायपीट जेवणापर्यंत वेळ काढण्यासाठी चाललेली आहे, हे तिच्या लक्षात येताच तिला हसू फुटलं. चाललेला कांत्या जागेवरच थांबून तिच्याकडं रागानं बघू लागला. त्याच्या चड्डीची मागची बाजू त्यानं एका हातानं झाकून घेतली होती.

' आरं, तुला नाय मी हासत.'

' मग कुणाला ? रस्त्याला का चिचच्या झाडाला हासतीस ?'

' त्यास्नी कशाला हासंन'

असं म्हणून शांती जास्तच घाईनं चालू लागली. कांत्या तिला

फटके मारत चालू लागला.

' ह्ये बग, कांत्या, आसं चालणार नाय. एका वादाड्याचा न्हाइस. धरला हो बघू.'

' मग तू मला का हासलीस ?'

' अं ? .. .. हं, आरं माझ्या मनाला वाटलं, आज निवेद दिऊन आल्यावर भरपेट पोळ्या खायाला मिळणार म्हणून हासले.'

' खऽरं ?'

' व्हय. खरंच.'

कांत्याच्या मनाची समजूत पटली. त्यानं फाटक्या चड्डीवरचा हात सोडला आणि पहिल्या ऐटीत तो नेटाने चालू लागला. शांती ओठ आवळून हसू दाबत होती.

माळाची टेकडी उतरून ती दोघं ओढ्याच्या वाटंला लागली. इतका वेळ शांतीच्या पुढं धावणारा कांत्या आता शांतीचा हात धरून चालत होता, दोघं काहीच बोलत नव्हती. लगालगा चालली होती. आजूबाजूस कावऱ्याबावऱ्या नजरेनं बघत होती. कानोसा घेत होती. एकमेकांनी टाकलेलं उसास त्यांना मोठं वाटत होतं.

' कांत्या, नीट चाल. मांजरावाणी पायात येऊ नगस.'

' .. .. आक्का, तुला उसास ऐकू आला ?'

' भ्या वाटल्यावर उसास वाढतो रं.'

' माझा न्हवंग.'

' मग कुणाचा ?'

' आजगराचा.'

' काय तरी भकू ' नगस.'

' काय तरी नाय. त्या झुडुपात काय हाललं ?'

' कुठं रं ?'. . . .

' त्या तिथं ग वारूळाजवळ.'

' अं.. .. अं . .. मला काय सुदीक दिसत नाय रं.'

' मी झुडुप हालल्यालं बघितलं. नाना सांगत्यात तसा आजगराचा उसासबी मी ऐकलाय.'

' तू आपलाच उसास ऐकला आसशील झुडुप वाऱ्यानंबी हालतं.'

' पण झटका दिल्यावाणी नाय हालत, .. .. आक्का मला इरूळाबी दिसला पाण्यात; म्हणून मी तुझ्या पायात यायला लागलो.'

' कांत्या, खरंच तुला इरूळा दिसला ?'

' होऽऽ. तुला खोटं वाटतं व्हय ?'

' . . . कसंला हुता रं ?'

' इरूळा इरूळ्यावाणीच की.'

' पण रंग कसला हुता ?'

' काळा.'

' काळा ? . . . नि लांबीला किती ?'

' लांबीला . . . वावभर आसंल.'

' आन् झुडपात तुला काय दिसलं का ?'

' आक्का.. . लई भ्या वाटतंय माघारी जाऊया.'

' चल. माझ्याबी काळजात धडकी भरली बग.'

' मलाबी मायंदाळं घाबारायला हुतंय, पण तू चाल्लीस म्हणून मीबी चाललूया.'

' ह्ये आपलं जाणं खरं नाय गड्या. हीरीच्या काठावरनं जायला पायापुरती वाट, एका बाजूला हीर दुसऱ्या बाजूला वढा. पडलं-बिडलं तर मरानच की, शिवारात कोण चिटपाखरू दिसत नाय.'

' आपल्या आईचं उगीचच निवदाचं फॅड. आतापातूर जेवाण झालं आसतं आपलं. शेताला कोणबी निवेद देत नाय.'

' देत नाय कसं ? सारी देत्यात. येरवाळीचं दिऊन गेल्याली सारी. कैक सांचीपाराला देत्यात. आपली आई सगळ्या देवास्नी निवेद पोचल्या-विगर जेवण करीत नाय.'

' नुसत झेंगट हाय.'

टेकडीवर येताच कांत्यानं बसकन मारली.

' आरं ये येड्या कोकरा, बसू नगस. चल मावळतीच्या बाजूनं जाऊ. कसाबसा निवेद पोचवू नि जाऊ झपाझपा घरी.'

' आक्का.. ..'

' हुं. चल. मी वळखलंय. दमलास ना ?'

' अंहुं. पण .. .. आक्का तू ये जाऊन.'

' का ? तुझा जीव हाय नि माझा जीव नाय व्हय ?'

' पण तू कुटं माजं ऐकतीस ? म्हणून म्हंतो. . .'

' काय म्हंतो, ' यकली जा ' आसंच ना ?'

' लिंबाच्या वगळाटातनं जायाचं म्हंतीस तू.'

' व्हय. तेवढीच वाट हाय न्हवं ?'

' तिथं ह्याऽऽ एवढं जनावर गेल्यालं. . . बाजारादिसी.'

' व्हय ? कुणी सांगितलं रं ?'

' खुळ्या किस्यानं.'

' हुं. खुळंच त्ये. ऊगं बोंबलायची सवं हाय त्येला.'

' तू तसंच म्हंणार. चिचच्या तुकड्यात नाना, मी हुतो तिथं बोंब मारीत आला हुता किस्या.'

' आस्सं ?'

' हुंऽऽ.अग, नाना म्हणत हुतं, तिथं मोठ्ठं जनावर हाय. लई वर्साचं पुरानं हाय. त्याच्या अंगावर इत–इत लव हाय. त्ये जनावर चालाय लागलं की लव हालती म्हणं घोड्याच्या केसावाणी.'

' आरं देवाऽऽ.'

' आपलं नाना म्हणीत हुतं, लई वर्सं कोंबडा दिला नाय म्हणून त्ये भ्या दावाय लागलंय. नव्याच्या पुनवंला परडी करायची नि कोंबडाबी कापायचा हाय.'

' मग कांत्या, निवदाचं कसं करायचं रं ?'

' मी येत नाय. लई भ्या वाटतय मला. तू जातीस तर तुझ्या हिमतीवर जा.'

' आता माजी काय हिंमत बगतोस ? माझी धडगत नाय.'

शांतीनं डोक्यावरची टोपली खाली ठेवली. ' निवेद ' बाहेर काढून तिनं शेताकडं तोंड करून तिथूनच पूजा केली.

' देवा, मसुबाराया, तू बगनूसच. आजूबाजूला चिटपाखरू नाय. मला लई भ्या बसलंय. कांत्याबी संग येत नाय. मी तरी काय करू ?

हत्तंच निवेद दावते, त्यो मानून घे. ह्यात आईचा कायबी दोष नाय. आमचाच गुन्हा हाय, त्याबद्दल माफी कर. आमाला सुखी ठेव. शेतं चांगली पिकू दे. हत्तंच निवेद दावते म्हणून पुन्हा एकदा माफी मागते रं मसुबाराया.'

हात जोडून तिनं शेताला मागणं मागितलं. कांत्या हे सारं बारकाईनं बघत होता.

फडक्याची सुटलेली चुंबळ शांतीनं पुन्हा केली नि डोक्यावर ठेवली. टोपली उचलून ती डोक्यावर घेऊ लागली तेव्हा कांत्या बसूनच बोलला.

' आक्का, निवेद घरी न्हेणार ?'

' हो. शेताला पोचला नाय म्हणून काय रस्त्यावर टाकू ?'

' पण आई कावंल तुला. म्हणंल, ' तिथं काय वाघाचं वाडं नि तरसाचं खेडं बांधलं हुतं का ?'

त्यानं केलेल्या आईच्या हुबेहुब नकलेचं शांतीला हसू आलं. त्याच बरोबर त्याचं म्हणणंही तिला पटलं होतं. तिनं डोक्यावरची टोपली खाली ठेवली. शून्य नजरेनं ती दूरवरच्या शेताकडं पहात राहिली. आपणास पंख असते तर असा घोटाळा झाला नसता, यासारख्या विचारात ती रमून गेली.

' आक्का, मला भूक लागलीय.'

' आता घराकडंच जायाचं हाय. एवढ्या निवदाचं कायतरी पाह्यलं पायजेल.'

' आक्का, मी निवेद खाऊ ?'

' अं . . . तू . . . निवेद कसा खाणार ?'

' काय हुइल खाल्ला तर ?'

' पाप हुइल.'

' कुठलं पाप, लक्षुमीच्या देवळातला निवेद ती कुटलीबी पोरं खात्यात की.'

' अं, . . . पण आपलाच निवेद आपुन कसा खायाचा ?'

' जसं जेवतो तसा खायचा. भूक लागली म्हणून खायाचा. नाय तर कोण खाईल ?'

' त्ये खरं; पण ह्यो निवेद हाय. जेवणाची गोष्ट न्यारी.'

' कसली न्यारी ? तू तान लागल्यावर म्हाराच्या–चांबाराच्या हीरीतलं पाणी पितीसकी. म्हंतीस, 'सारी माणसंसारखीच. संमधा आडात पाणी यकच.' मग जेवणापरीस ' निवेद ' वेगळा त्यो कसा ?'

' त्यो देवाचा आसतुया '

' देव खातो का ? गुरवच खातो की. किस्नावरूबर त्याचं मैतर लोणी चोरायचं. भूक लागली की लोण्याचं डेरं चोरून पळवायचं नि हुंऽऽ म्हणून हाणायचं.'

' ह्ये तुला कुणी सांगितलं रं ?'

' तू पोथी ऐकायला येत न्हायीस, बापू बामणाची. बसतीस भांडी घासत, हरीइजय का काय वाचतो बामन. त्यात हाय संमद .. ..'

आणि कांत्याच्या बालमुखातून कृष्णाच्या लीला ऐकण्यात शांती मुग्धराधा झाली. टोपलीतला नैवेद्य तिनं भारल्यासारखा कांत्यापुढं केला. त्याचं डोळं लकाकलं. तो खुशीत येऊन पुढं सरकला आणि आवडीनं खाऊ लागला. आता त्याच्या श्रीकृष्णलीला थांबल्या होत्या. . . .

शांती मावळतीकडं बघत होती. पांढऱ्याशुभ्र ढगांच्या राशी लोण्याच्या पांढऱ्या गोळ्यासारख्या दिसत होत्या. मोठमोठ्या ताटात लोण्याचं गोळं ठेवावंत तसं आकाश नवनीताची ताटं भरभरून क्षितीजाच्या किनाऱ्यावर आणीत होतं. तिला आठवलं परवा ती हौसाकाकींकडं ताकासाठी गेली होती, तेव्हा तिचा दीलू पोळीवर लोण्याचा गोळा घेऊन खात होता. तिची भूकेली नजर तेथून तिला काढवत नव्हती. तिच्या तोंडास पाणी सुटलं होतं. आताही तीच स्वादाची कल्पना तिला अनावर झाली. तिचा हात नैवेद्यात गेला. तिनं नकळत एक घास तोंडात घातला. त्या खमंग चवीनं जीभ खवळली. पुन्हा घास घेण्यासाठी तिनं पुढचात पाहिलं. पण नैवेद्य संपला होता. त्याचवेळी कांत्याचं लक्ष तिच्या हालणाऱ्या तोंडाकडं गेलं. आणि उघड्या माळावर त्याचं रडणं . . ..

' कांत्या, रडू नको रं. चुकून मी घास घेतला. माझ्या वाटणीची पोळी मी तुला दिइन. चल घरी.'

' मला आत्ता पायजे.'

' आत्ता ? इथं कुठली आणू ? घरी गेल्यावर देत्ये.'

' मला लई भूक लागलीय.'

' मलाबी लागली रं, म्हणून तर एक घास घेतला.'

' एक नाय, लई खाल्लंस तू. माझं ध्यान न्हवतं तवर खावून घेतलंस. मी सांगणाराय आईला.'

' एऽआसरं काय. देवाशप्पत मी एकच घास घेतला.'

' मग मला निवडुंगाची बोंडं काढून दे.'

' चल देते.'

शांतीनं सात–आठ लालबुंद बोंडं काढून त्यांची कूस झाडून कांत्याला दिली. ती हपापल्यासारखी त्यानं खाल्ली. शांतीनं वाळूत झरा काढला. त्याचे पाणी दोघं पोटभर प्याली आणि घराच्या वाटेला लागली. शांतीच्या मनाला झाल्या गोष्टीची रुखरुख लागली होती.

' कांत्या आईला निवदाचं सांगू नको हां.'

' मला तू पाठीवर कोकरू घेतलंस तर नाय सांगणार.'

' ह्ये रं काय कांत्या ? आगुदर माजा जीव मला जड झालाय. त्यात तुजं कोकरू. माज्या पायाला गोळं आल्यात, तुज्या पोटात भर तरी गेलीया.'

' मग नको घेऊस. मी सांगणार आईला ' तू पण निवेद ' खाल्लास म्हणून.'

' ए, आसं नाय करायचं. ये मी तुला कोकरू घेते. पण लई लांबपतूर जमायचं नाय मला.'

' बरं थोडं घे.'

कांत्या शांतीच्या पाठकुळी बसला ती चालू लागली तेव्हा तिच्या ऊरात भरून आलं. पण तिच्या डाळ्यापुढं नैवेद्याचा घास फिरत होता. ' कांत्या नकळता हुता, पण शांती काय नकळती हाय का ?' असा आईचा सवाल तिच्या मनात फणा काढून उभा होता.

' कांत्या, मी यकली गेली आसती निवेद घेऊन पण त्या वढयात वाळवीचं झाड हाय ना, मधीच तोडलंय बग, अर्धवट, त्ये मला गोसाव्याच्या तोंडावाणी दिसतं. आज्जीच्या गोष्टीतला गोसावी आठावतो. मग भ्या वाटतं. कापरं सुटतं बग आंगाला.'

'मला त्यो तोडल्याला जागा मोठ्या नागाच्या इटुळ्यावाणी वाटतो.'

'मग तू नाय ना सांगणार आईला ?'

'नाय,.. .. आक्का थांब इथं.'

'का रं ? काय झालं ?'

'मी उतरतो आता.'

'उतर. मला वाटलं आता घरापतूर तुला घ्याला लागणारं.'

'माजं पॉट लई जाम झालंय. पाठीवर बसल्यावर लईच आवळल्यावाणी झालं.'

'.. . मग आता घरी गेल्यावर जेवणार न्हाइस ?'

'नाय.'

'आणलंस का वांद ?'

'का ? काय झालं ?'

'आई संशय घेणार. तू सारंच उघडं पाडशील.'

'काय ? निवदाचं व्हय ? . . . नाय. थोडं खाईन.'

घरच्या ओढीनं दोघांची पाऊलं भरभर पडत होती कांत्या वेशीपर्यंत शांतीबरोबर चालला, पण गावात शिरल्यावर मात्र पोरांच्या टोळक्या-टोळक्यानं चाललेल्या विटी-दांडूच्या खेळाकडं त्याचं लक्ष जावू लागलं. त्याचं बखोटं धरून शांती त्याला ओढत होती.

घराच्या आंगणात येताच कांत्यानं आपला हात शांतीच्या पकडीतून सोडवून घेण्याचा प्रयत्न केला. शांती त्याला दटावून म्हणाली, 'कांत्या, माझ्यासंग थोडं खाल्ल्यासारखं कर नि मग खेळायला ये भाईर.' कांत्या मुकाट्यानं तिच्याबरोबर घरात गेला. तिच्या पुढ्यात एका ताटात जेऊ लागला. मधेच 'मला बास' म्हणून अंगणात पळाला.

शांती जेवता जेवता आठवत राहिली. या कांत्यानं तिला अनेक वेळा अडचणीत आणलं होतं. तिला पेचात आणून मनात येईल ते वसूल केलं होतं. ती मनाशी म्हणाली, उद्या ह्यो कांत्या म्हणील, 'काल मी तुझ्या ताटात कमी जेवलो. कालची माझ्या वाटणीची पोळी दे. नायतर मी संमद आईला सांगणार. पोळी दे नाय तर कोकरू कर मला.'

तिला काहीतरी सुचल्यासारखं झालं आई कामात आहे, असं बघून

तिनं दोन पोळ्या डब्यात घालून ठेवल्या नि मनाला बजावलं, 'उद्या कांत्यानं पोळ्या मागितल्या की त्याला ह्या द्याच्या. पुढच्या सणाला निवदाच्या घासालाबी शिवायचं नाय.' आणि या विचाराबरोबर तिला पाठकुळीचा कांत्या खाली उतरावा असं हलकं हलकं वाटलं.

० ० ०

## ओली जखम ७

सुगी आटोपली होती. शेतकऱ्याचं हात थोडं विसावलं होतं. काही शेतात बागायती पिक होतं; पण त्यासाठी शेतकऱ्याला रात्रंदिवस शेतात खोळंबून रहावं लागत नव्हतं. आसपासच्या गावांच्या जत्रा याच दिवसात मागं–पुढं एक–दोन दिवसाच्या फरकानं भरायच्या. ' देव–देव ' करता येईल आणि ' जीवाची करमणूकबी ' होईल म्हणून शेतकरी जत्रंला जायचे. जत्रंदिवशी ' छबिना ' निघायचा. देवाचं दर्शन घेऊन, गुलाल खोबरं उधळून व्हायचं. दुसऱ्या दिवशी खेळणं. कुस्त्याचा फड भरायचा. रात्री तमाशाचा फड रंगायचा. दोन दिवस जागून घेतलेलं जत्रच ' सुख ' आठवत शेतकरी पहाटं आपल्या गावच्या रस्त्याला लागायचा.

याच दिवसात ' लग्नाला ' आलेल्या पोरा–बाळाची लग्न ' ठरवायची' लाट यायची. भावकीच्या कामात शेतकरी पेरणीच्या कामाइतकाच दक्ष असतो. कधी कोणाच्या पोरासाठी कुण्या गावची ' पोरगी ' ' बघाय ' जायचं. कधी कुणाच्या पोरीसाठी कुण्या गावचं ' स्थळ ' बघून यायचं. बैठकीला हजर व्हायचं. सुपारी फोडायची. कुणाचा ' बस्ता बांधाय ' जायचं. गावात कुणाचं का 'लगीन ' असंना तांदळाला', हजर रहायचंच

हा अगदी अलिखित नियम. निसर्गातील ऋतुपालट जितक्या सहजतेनं होत असतो, तितक्याच सहजतेनं या शेतकरी वर्गाची शेतातील व भावकीची कामं चाललेली असतात. त्या कामाबद्दल त्यांच्यात कधी तेढ यायची नाही, खळखळ व्हायची नाही.

या कष्टकऱ्यांचं विसावलं जीव करमणुकीला आसावलेलं असतात. सुगी विकून थोडा पैसा गाठीशी आलेला असतो. घरात कनगी–टोपली भरल्या पोटानं उभ्या असतात. हाच मोका साधून डोंबारी, मदारी, दरवेशी आणि असेच भटके खेळवाले, खेडोपाडी आपले खेळ करून शेतकऱ्याच्या सुगीनं आपली ओटी भरत असतात. सारा खुशीचा सौदा. धान्य किंवा अन्न देऊन ही करमणूक करून घेणं शेतकऱ्यांना परवडतं.

त्या बदलीच्या गावी अशाच एका रात्री ग्रामपंचायतीच्या पटांगणात माकडवाल्याचं डमरू वाजू लागलं. माकडवाल्याच्या आरोळ्या–डमरूचा आवाज आणि त्याबरोबर खेळ पहायला आलेल्या लोकांचा गोंगाट कानावर पडत होता.

'आवो ! मास्तरीण बाय, झालं जेवण ?'

'हो. झालं की. तुमचं ?'

'व्हय. आटापलं. खेळ बगाय जातूया आमी.'

'रात्रीचा कसला खेळ करतात देव जाणे. दिवसा खेळ करायला.. ..'

'आवो, बाई, ह्ये गाव गाठायला त्येला कडुसं पडलं आसंल .आज हिथं खेळ केला की उद्या त्येला म्होरलं गाव गाठून खेळ दावता येईल. हातावरंच त्याचं प्वॉट. आपल्यावाणी रात आन् दिवस आसं मोजून कसं त्येचं जमंल वो ?'

'हं. खराय.'

'बरं का बाई, रातच्या खेळाला सारी माणसं गावात असत्याती. या भटक्या जातीला पब्लीकनं गर्दी केली की खेळ करायला लई हुरूप येतो बगा.'

'अस्सं. कोण कोण चाललाय खेळ बघायला ?'

'समदी. आमची म्हातारी तेवढी हाय घरात. वातानं गुडगं

घरल्याती, म्हणून पडूनच हाय.'

हिराकाकी एवढं बोलून माकडाचा खेळ बघण्याच्या उत्साहात निघून गेल्या. मी दार लावून घेतलं. रेडिओ लावला. नभोनाटच चालू होतं. अंथरूणावर पडून ऐकत होते. मुलं झोपली होती. बहुतेक सगळे शेजारी खेळ पहायला गेल्याने वाड्यातही शांतता होती. किती वेळ गेला समजले नाही; पण दंगा ऐकू येऊ लागला. प्रथम वाटलं नभोनाट्यातील आवाज आसावा; पण रेडिओचा आवाज कमी केला, तेव्हा ग्रामपंचायतीच्या बाजूने आरडाओरड–किंचाळ्या स्पष्ट ऐकू येऊ लागल्या. मी रेडिओ बंद करून दार उघडले.

' मास्तरीणबाई ! कसला दंगा झालाय वो ?'

शेजारची सुशीला मला विचारत होती. ती बाळंतीण म्हणून घरातच होती.

' मला तरी काय माहिती ? बाहेर जाऊन बघते. फारच दंगा ऐकू येतोय.'

आणि मी वाड्याबाहेर गेले. रस्त्याने माणसांचा लोंढा कलकलाट करीत येत होता. काहीतरी भयानक घडलं होतं. माणसं एकमेकात मोठ–मोठ्यानं बोलत होती.

' देशमुखाची कमा पेटली. तरी बरं चुलता हुता म्हणून वाचली; नायतर वांगं झालं असतं. .. ..'

' .. .. काय बुद्धी फिरली बगा की, लहानग्या भनीला जेवाय बोलवाय आली हुती. .. ..'

' खेळ बघून तीबी गुटमाळली. आताशी पातळं नेसाय शिकल्याली, ती तरी कुठं जाणती हाय ? .. ..'

' कंदील पुढ्यात ठिवून, बघण्याच्या नादात कधी पातळ पेटलं त्ये कळलंच न्हाय.. ..'

' पेटल्यावर खुळीबावरी झाली. वरडत – आरडत पळाय लागली. यकायकी भूत म्होरं नाचाय लागल्यावाणी झालं. समदीच लागली वरडायला. कुणाला काय सुचंना का समजंना.. ..'

'. . . माझी तर बोबडी वळली, कापरंच भरलं अंगाला.'

' आन् कुणाचं मन थाऱ्यावर हुतं ? काय करावं त्येच समजंना. . .'

' तर काय ! तिचा चुलता हुता म्हणून बरं. त्येनं घोंगडं अंगावर टाकून भुईवर आडवी केली तिला. पाताळ वढून-फाडून काढलं. आतला परकरबी पेटला हुता. त्योबी फाडून काढालान्. चुलता हुता, बाकीच्या माणसाकडनं आसलं काम झालं आसतं का ?'

' आन् तिनं अंगाला हात लावू दिला असता म्हंता का ? उभी पेटाय लागली तरी माणसापस्न लांब लांब पळत हुती.'

' घराकडं न्हेताना घोंगडं रूताय लागलं अंगाला, म्हणून मी बाळकूला म्हणलं तुझी चादर टाक बाबा, त्या मायभनीवर. . . '

' चादरीत गुंडळून न्हेतानाबी लई आरडत हुती. काय बाय झालं यकायकी . . . हातातोंडाला आल्याली लेक, वाचली म्हणून बरं, नायतर आयबापानी काय पाह्यलं आसतं आज ?'

' आनसे, तुला ठावं हाय का, नारू अण्णा लेकीसाठी थळं बघतूया म्हणं . . .'

' आसंल बाय. न्हाती धुती लेक झाली, यकदा ज्याच्या त्याच्या ठिकाण्यावर गेलं की, घोर मिटतो.'

' आगदी भैरूबानं बचाव केला बग, कमाचा. आता दोनी पायाच्या मधीच भडका झाला कंदिलाचा, म्हणून नाजूक कातडं भाजून निघालं, पण कपड्याभाईरलं आंग इद्रूप नाय झालं, ह्ये नशीबच.'

' व्हय, बाय. कंबरपातूर मांड्या-पाय यवढंच भाजलं बाकी बचलं. लोकाच्या घरी जायाचं हाय. लेकीची जात. जरा पडाक बाजू आली तर हुंडा वाढवूनबी लगीन ठरता ठरत न्हाय.'

' कमा, मस्त देखणी हाय, केळीच्या कोंबावाणी गोरीपान. आय-बाच्या पुण्याईनं आजचं संकट टळलं. . . .'

' . . . तरीबी राजाक्का, तिला साताऱ्याला दवाखान्यात न्यावं लागणार.'

' व्हय. दवाखान्यात न्हेल्याबिगार सत ना गत. जखमा मिळून याला व्हव्यात.'

' मला बया दवाखाना म्हणलं की भ्याच वाटतं.'

' माणसाला खातो त्यो. . . .'

' तसं न्हवं पण. . .'

' गप दोडा ! तुझं सदा न् कदा भ्याच. जरा काळीज घट कराय शीक.'

मला जाणाऱ्या माणसाच्या प्रवाहातून सारं काही ऐकून समजलं होतं. एक वाईट प्रसंग टळला होता.

' मास्तरीणबाई, तुमी रस्त्यावर येऊन उभं हायसा, समदा गोंधुळ ऐकू आला तुमास्नी ?'

' हो. म्हणूनच बाहेर आले. कमा भाजली वाटतं.'

' व्हय. देवाच्या दयेनं थोड्यात निभावलं म्हणायचं.'

' पाय-मांड्या भाजल्यात न्हणे. औषध-पाणी करावं लागंल.'

' कुणाला ठावं बाय. काय करतात काय की. चार सालं झाली आसत्याली बगा. आमच्या हतं मुंबैवाल्याची फॅसनवाली बायकू-नवी नवरीच, आसी भाजली हुती दारूकामाच्या औशीदानं भाजली हुती बगा. तिच्या वटी पोटाचं भदं झालं हुतं-चार दिवस बाई गुरावाणी आरडत हुती. पाचव्या दिवशी खल्लास झाली. आपलं माणूस मरणार ह्ये दिसत हुतंच; मग दवाखान्यात न्हिऊन, मांस काढून, शिवून त्येंच्या देहाचं हाल नगती, म्हणून रावसाबांनी दवाखान्यात नाय न्हेलं. आयव-सवय गोली बिचारी. आता कमा इतकी भाजली नाय म्हणा, सिरेस केस नाय ती. मग कशाला न्हेत्याल ?... मला खात्रीनं नाय सांगाय येत, पण दवाखान्याला नेत्याल आसं नाय वाटत.'

' तिची परीक्षा जवळ आलीय. मॅट्रीकला आहे ती. दवाखान्यात नेल्याशिवाय का लवकर बरी होणाराय ती ?'

' आवं बाई, आता परक्षा बुडल्यातच जमा हाय बगा. पदरकरीन लेक, आई-बाप लग्नाचं बगत्याली का परक्षा-दवखाना बगीत बसत्याली?. . . आजकाल पोरी-बाळीबी लईच थेर कराय शिकल्यात्या. नायनलचं पातळ निसून कुणी कंदीलाम्होरं उभं न्हाईल का,? मला सांगा.

' झाल्या गोष्टीला इलाज नाही.'

असं म्हणून मी पण घरात आले; नाहीतर आपला हेका चर्चेतसुद्धा

कायम ठेवण्याचा काही माणसांनी जणू वसाच घेतलेला असतो. त्यांच्या तोंडाला कशाला लागा ? तिथंच विषय सोडून दिला.

त्यावर एक–दोन दिवस गेले असतील. कमलच्या वर्गातील तिची मैत्रीण शाळेत निघालेली मला दिसली. तिला हाक मारून मी विचारलं,

'कमलला दवाखान्यात नेलं का ग ?'

'नाही नेलं. घरीच देशी औषध चालू केलंय.'

त्यावरून मला वाटल, बरं होण्यासारखं असेल, म्हणून नसेल नेलं.

दुपारी घर सारवत होते. तेवढ्यात जाधवबाई आल्या म्हणाल्या,

'कुठंपर्यंत आलंय सारवण ?'

'आलंय माझ्या पुढ्यात.'

त्या हसल्या. म्हणाल्या,

'थांबू का ?. . . कमलला बघून यावं म्हणतेय, तुम्ही येताय का ?'

'येते की. बसा थोडं . . . पाट घ्या.'

त्या बसल्या. मीं घाईनं सारवण आटोपलं.

रस्त्यात बाई म्हणाल्या,

'दहा–आकरा दिवस झाले. देशी औषध घेतात म्हणे. म्हटलं बघून तरी यावं.'

'जखमा बऱ्या व्हायला आल्या असतील.'

'तेच तर. पाहिल्याशिवाय काय कळणार ? कोणाला नीट विचारावं, तर सतरा फाटे फोडतात या खेडवळ बायका. कुठून विचारलं असं होतं.'

'नाही तर काय. मलाही समजलं देशी औषध सुरू केलेलं. कमल तुमच्या नीमाच्या वर्गातली, नाही का ?'

'हो ना. यायची मधून–अधून घरी. नीमाची नि तिची चांगलीच मैत्री आहे.'

'हो ना, आमच्याकडे नींमा आली की तिच्या बरोबर ती असायचीच. फारच बडबडी नाही ?'

'तर हो, नीमाच्या मैत्रिणी घरी आल्या म्हटलं की, अगदी चिवचिवाटच. त्यात ही कमल तर विचारूच नका. आमच्या सासूबाई तर

तिला ' भोरडी ' च म्हणतात.'

कमलचं घर जवळं आलं, तेव्हा आम्ही बोलणं थांबवलं होतं.

आम्ही दगडी पायऱ्या चढून गेलो. पहिल्या खोलीच्या दारात जाताच नको वाटणारा, एक विशिष्ट दर्प नाकात शिरला. आत डोकावून पाहिलं. केळीच्या पानावर कमलचा वस्त्रहीन देह पहुडला होता. खोलीत दुसरं कोणी नव्हतं. हलक्या पावलांनी आम्ही आत गेलो पण--

' आईऽऽ ! आईऽऽग, माझ्या अंगावर काहीतरी घाल कीऽऽ! '

आमची चाहूल लागताच ती मोठ्याने ओरडली. त्याबरोबर तिची आई धावतच बाहेर आली. तिच्या अंगावर एक पातळ कपडा टाकून, तिला झाकल्यावर तिच्या आईचं लक्ष आमच्याकडं गेलं.

' तुम्ही व्हय ? या.. ..आसं अडचाल या. हिथं घोंगड्यावर बसा, मी आतलं आवरून आल्येच. बसा तवर.'

कमलची आई स्वैपाक घरात गेली. आम्हाला अगदी अपराधल्या-सारखं झालं. आम्ही एक भाजलेलं शरीर पहायला आलो होतो. पूर्णावस्थेतील त्या विवस्त्र शरीराला वेदनेपेक्षा लाजेचं भान ठेवणारं मन होतं, हेच आम्ही विसरलो होतो. आपलं उघडं शरीर झाकण्यासाठी जीवाच्या आकांतानं कमलनं जेव्हा तिच्या आईला हाक मारली, तेव्हा मात्र आम्हाला आतून अगदी गलबलल्यासारखं झालं होतं.

कमलनं आमच्याकडं एकदा पाहिलं. त्या नजरेत आम्ही काही शोधण्यापूर्वीच ती नजर आढ्याकडं वळली. ती आमच्याशी काही बोलू इच्छीत नव्हती; नव्हे, तिच्या सर्वस्वाबरोबरच आमच्या सारख्यांच्या सामान्य ओळखीही जणू करपून गेल्या होत्या. आमच्या ओळखीचे कोळसे तिने नजर फिरवूनच जणू आमच्यापुढे केले होते. आम्ही तिथं आणखी काय पाहणार होतो ? जाधवबाईकडं मी पाहिलं नजरेनंच एकमेकीस आम्ही म्हणालो, ' उगीच आलो ' पण कमलच्या आईनं बसायला सांगितलं होतं. म्हणून बसायला हवं होतंच. आम्हा दोघींच्या नजरा सहजपणे कमलवर खिळल्या होत्या. ती जाणीवपूर्वक आपलं शरीर अधिकाधिक झाकण्याचा प्रयत्न करीत होती आणि त्यामुळे तिच्या वेदना वाढत असाव्यात असं तिच्या चेहऱ्यावरून-उसास्यांवरून जाणवत होतं.

तिला नुकतंच नहायला घातलेलं दिसत होतं. कसं घातलं असेल ? नुसत्या विचारानंच माझं सारं अंग ल्हसल्यासारखं झालं. तिचं शरीर सुकून गेलं होतं. सुन्न मनानं नुसतं पहात राहण्यापलिकडं आम्ही काही करत नव्हतो. काही बोलावंसं वाटत नव्हतंच. पुढचं दृश्यही पहावत नव्हतं. तेवढ्यात हातात खिचडीचं भांडं घेऊन कमलची आई बाहेर आली. म्हणाली,

'आज कमलची चतुर्थी. मघाशी न्हायाला घातलं तिला.'

तिनं कमलंला खिचडी भरवायला सुरूवात केली. मघापासून माझ्या मनात डोकावणारा प्रश्न मी विचारलाच,

'न्हायला कसं घालता तिला ?'

'न्हायाला व्हय ?... हिथंन आल्लाद दोघी-तिघीनं तिला उचलून खाटंवर ठिवायची. डोक्सं गादीवर ठिवायचं नाय. आतराळी धरायचं. खाली घमॅलं ठिवायचं. एकीनं शिक्काईचं पाणी घालायचं. दुसरीनं चोळायचं. तिसरीनं पाणी घालायचं.'

'च्चऽऽ ! बरंच त्रासाचं आहे हो.'

'व्हय. तरास हुयाचाच. कर्मदशा हाय. भोग हाय. भोगाय पायजे. हंऽऽ ! ..... काय करायचं.'

ती आपल्याशी बोलल्यासारखी बोलून उसासली. तेवढ्यात कमलला ठसका लागला.

तिची असह्य हालचाल. आईच्या मनाची उलघाल तिच्या डोळ्यातल्या पाण्यात. आम्हा दोघींचा जीव उडालेला. काय होतंय कुणास ठाऊक ? उगीच आतून मन कातरल्यासारखं झालं. दोघी बावरलो.

पुन्हा तिच्या आईकडं पाहिलं. ती मनःपूर्वकतेनं-सावधतेनं चमच्यानं कमलला पाणी पाजत होती; पण ते एवढं-एवढं पाणी तिला पुरेसं होत नव्हतं.

'पोटभर पाणी पाजून तरी मार मला.'

असं म्हणताना तिच्या डोळ्यात दाटलेली आसवं आमच्या डोळ्यात करूणा भरत होती.

'शांत हो बाई. तरास करून भोग सरत नाय, माझ्या लेकरा ! ..... मोठ्या भांड्यानं तुला कसं पाणी पाजायचं ? .... अं ? ...

सारं सांडून अंगाखाली जाईल. त्यालं आणिक काय झालं मर्जी ? . . . काय करायचं . . .?'

हुंदका आवरण्यासाठी ती ओठ मिटवू पाहते. ओठांची वेडीं-वाकडी हालचाल. थरथर. केविलवाण्या नजरेनं ती आईकडं पहाते. थोडावेळ स्तब्धता.

पुन्हा खिचडीचा घास पुढे आल्यावर तिने तोंड उघडले. चिमणीचं पिलू आठवलं. पण चिमणीच्या पिलाचे डोळे इतके व्याकुळ–आर्त असतात का ? नसतातच. येथे भुकेशिवाय आणखी एक वेदना . . . . दुसऱ्याकडून न शमणारी. चिमणीच्या पिलाजवळ नसणारी ! . . . . . . चिमणीच्या घरट्यात गेलेल्या माझ्या मनाला चिमणीचं पिलू सुखी वाटलं आणि सुदैवीही. त्याचा हेवा करून मन परत फिरलं . . . . कातर होऊन––––

खिचडी भरवणं संपलं होतं. चमच्यानं पाणी पाजताना तिच्या आईच्या नजरेत ठसक्याची भिती उभी राहिली होती. हाताला कंप सुटला होता. कमलची नजरही घाबरी झालेली दिसत होती.

'बाऽस्स ! . . .'

हात वर करून ती म्हणाली. त्या थांबण्यात–थांबविण्यात तृप्ती नव्हती. अधिक वेदनेतून सुटका मिळविण्याची ती धडपड होती.

तिच्या आईनं तिच्या गळ्यावर, मानेवर, सांडलेलं पाणी फडक्यानं पुसून काढलं. लघवी–शौचाच्या बाबतीत याहूनही अधिक त्रास होत असेल हे उघडच होतं.

कमलच्या उशाशी बसून, तिची आई आमच्याशी बोलायला लागली. म्हणाली,

'आज आकरा दिवस झालं, माझी कमा नुसती माशावाणी तडफाडतीया. नशीबाला भोग आला बगा. वाचली त्येच नशीब म्हणायचं. मायंदाळी जीव खाती, परक्षा बुडणार म्हणून लई वंगाळ वाटतं तिला; पण इलाज हाय का ? . . . . व्हणारी गोष्ट चुकत नाय . . . जेवणाची येळ झाली हुती. पुस्तक वाचीत सोप्यात बसली हुती. मीच म्हणलं चंडाळणीनं, 'कमा, इमलला घिऊन ये जा.' पुस्तक तिथंच ठिवलं नि कंदिल घिऊन लगालगा गेल्याली बगितली मी. म्हणलं, आता इल–मग इल . . . तेवढ्यात

दारात कालवाच. यसवंतानं चादरीत गुंडाळून आडवीच आणली हुती. खिन्‌भर मी भयाकलीच. काय झालं नि काय नाय कळंनाच मला. उभ्या उभ्याच गप झाली मी. मला जावंनं खाली बसीवलं. म्हणली, 'बायसाव घाबरू नका. जरा भाजलंय कमाला. बाकी काळजीचं काय नाय.' तवा मन जरा शांत झालं. आमचं भावसाब म्हणलं, तालुक्यात दवाखान्यात न्ह्याची, पण बाकी सारी नकोच म्हणली. नाय न्हेलं.'

'दवाखान्यात नेलं असतं, तर बरं झालं असतं.'

'कशाचं बरं म्हणता मास्तरीण, सारं बघून बसलीया मी. तुमाला लांबचं नाय सांगत, माझी चुलत भावजच भाजली हुती. शेकत बसती हुती, पाठीमागनं कवा पदूर पेटला, काय कळलंच नाय बगा .. .. तर भाजली, गाडीत घालून न्हिली तालुक्याला. दवाखान्यात आडमिट करून मला तिच्या संगती ठिवलं. माझा चुलत भाऊ रोज भाकरी घिऊन दवाखान्यात येत हुता. काय सांगू त्या दवाखान्याची तऱ्हा .. .. कुत्रं हाल खायचं न्हाय. बाई ! माझी वैनी गुरावाणी आराडायची. दगडाला पाझर फुटला आसता बगा. पण त्या दवाखान्यातल्या नर्सा लई दगडाच्या काळजाच्या. 'भीक नग पण कुत्रं आवर' आसं म्हणायची पाळी येती. लई आबाळ करत्यात बगा. जवातवा अंगावर खेकसत्याती. कुत्र्यावाणी दैना करत्याती, आजाऱ्याची नि संगती जाणाऱ्याचीबी. वाटतं, कशाला दवाखाना गाठला ? .. .. भाजलेल्या माणसाच्या यातना थोडच्या आसत्यात का ? .. .. आवं, बॉट भाजलं तर तासभर आपुन 'फूऽऽफू' करतो. समदं आंग भाजल्यावर काय होत आसलं जीवाचं ? .. .. सोताच्या जीवापास्न दुसऱ्याचा जीव जाणावा. त्या माणसानं काळीज फाटून जायाजोगतं आरडायचं नि ह्या नर्सा वसावसा अंगावर धावत्याती, नायतर आज्याबात बगतच न्हायत्या. औशीदाचं डॉस आपुनच यळंवर पाजायचं, आजाऱ्याची सेवा आपुनच करायची. ह्यांनी काय करायचं तर, 'केस हाताला लागणार नाय.' आसं आगुदरच भाकीत सांगायचं. मग बळी द्याला गेल्यावाणी दवाखान्यात जाच कशाला? .... माझ्या मावळणीचीबी आसीच केस झाली. माणूस जीवानिशी जातंच, पण .. .. डोळ्यानं पायलं त्ये सांगते; आवो बील पदरात आवळायला घेत्याती आन् मेलेला

मुडदाबी धडसा ह्याती लागू देत न्हायती. मास काढून घेत्याती. पोतं शिवल्यावाणी शिवून एवढस्सं लोळागोळा झाल्यालं गठूळं हवाली करत्याती. त्येंचं समदं येवस्थशीर होईपतूर, काळजावर दगूड ठिवल्यावाणी गप न्हायाचं, . . . आपल्या माणसासाठी रडायचीबी तिथं चोरी. मढं घ्याचं नि मुकाट्यानं गाव गाठायचं. ह्यो त्या दवखान्याचा कायदा ! त्या शिवलेल्या मढ्याला आंगूळ घालाय येत नाय का काय नाय. नुसता वनवास. जित्त्यापणी वनवास, मेल्यावरबी वनवास. म्हणून मी शॅप सांगून टाकलं, कितीबी खस्ता खाव्या लागल्या तरी खाईन. रात–रात जागून हाडाची काडं करीन, पण मी माझ्या हातानं माझ्या कमाला दवखान्यात धाडायची नाय. मी सोत्ता पायजे तेवढी सेवा करायला खंबीर हाय म्हणलं . . .'

एवढं सारं बोलताना तिचं डोळं अश्रूंनी सारखं भरून येत होतं.

' आई ! . . . रडू नकोस कीऽऽ'

' नाय, पोरी. मी . . . मी कुठं रडतीया? नाय रडत. तू नको जीवाला लावूस. तू रडायला लागली की तुला सोसत नाय, तरास पडतो. मला काय धाड भरतीया . . .'

असं म्हणत कमलच्या डोक्यावरून तिचा हात पुन्हा मायेनं फिरू लागला; पण बाजूला तोंड फिरवून अश्रू लपवायचा तिचा प्रयत्नही चालू होता.

जाधवबाईंनी विषय बदलून वातावरणातला ताण कमी करण्यासाठी विचारलं,

' आता कुणाचं औषध घेता ?'

'वाडीच्या माणसाचं घेतो. झाडपाल्याचं हाय. एक दिसा आड वाडीला जाऊन आणावं लागतं. गायच्या लोण्यात कालवून लावायचं आसतं. लई शास्तार पाळाय लागतं. इटाळ–चंडाळाचं संबाळाय लागतं. देवीची पूजा चुकवायची नसती. रोज जुडगाभर उदबत्त्या पुरत न्हायत्या.'

' गुण येतोय ना ?'

' व्हय . . . गुण हळुहळु येणार. देशी औशीद हाय. औशीद लावलं की तासाभरानं भाजल्याली जागा तटतटायला लागती. . . . माझी कमा लई

गाजरी, . . . सोसत नाय तिला, . . . आराडती – – – काळीज फाटतं ऐकणाराचं; पण भोग हायती, म्हणून डोळ्यावर कातडं वढायचं, एका दिसा आडानं खपल्या पडत्याती; पण आतलं मास दिसतं, त्येच्यावर कातडं चढंना. जखमा मिळून येईनात अजूनी, भाजल्या वांग्याचा काचुळा सुटावा तसं हुतं.'

' किती दिवस लागतील म्हणून सांगितलं त्या वैदुनं ?'

' . . . तसं काय नाय सांगितलं बगा; पण खस्ता लई घ्याव्या लागत्याल, इटाळ–चंडाळ पाळावा लागंल, आसं सांगितलं. आजाऱ्याच्या किती खस्ता खाव्या लागत्याती, आपुन जाणतोच. त्यात ह्ये भाजल्यालं माणूस. रोज आंग पुसून काढायचं. लोण्यात औशीद खलून लावायचं. रोजच्या रोज केळीची पानं आणून बदलायची. खाणं–पिणं बघायचं परसाकडची-लघवीची येवस्था करायची. पोरं तर काडीची मदत करीत न्हायती. सैपाकपाण्याकडं माझा हात पोचत नाय. हिचंच सारं बगण्यात दिस कधी जातो कळत नाय. खर्चानं तर त्वांड वासलंय. रोजच्या रोज दूध, दराक्षी, मुसुंब्या, डाळींबं, आसलं जिन्नस आणावं लागत्याती. ती एकांदा घास घेती, पण घरातल्या पोरट्यांची मुरकंड पडती त्येच्यावर. काय बोलावं तर त्येंच्या आयास्नी राग येतो. माझं गीरं फिरल्याती, दुसरं काय नाय.'

' इतर गोष्टीकडं तुम्ही लक्ष देऊच नका. हिचं तेवढं व्यवस्थित पहात जा. जमलं तर एखाद्या डॉक्टरचं घरच्या घरी औषध चालू करा. दवाखान्यात नका नेऊ, पण घरात औषध घ्यायला. . .'

' नाय. तसं करता येत नाय. ह्ये औशीद हाय तवर दुसऱ्या कुठंल्याबी औशीदाचा इटाळ करायचा नाय, आसं वाडीच्या बाबानं सांगितलंय. नायतर त्येच्या औशीदाचा गुण जाईल नि देवीचा कोप हुईल. माझ्या म्हायेरची देवी हाय ती. लई कडक हाय. तिचा कोप लई वंगाळ आसतो; म्हणून दम धराय पायजे,. . . .कवा माझ्या या वासराचं वनवास संपत्याती पांडुरंगाला डोळं.'

त्या खोलीतल्या एकेका वस्तूचा संदर्भ आम्हास कमलची आई बोलत असताना लागता होता. एका खुंटीला देवीचा फोटो अडकवला होता.

जवळच्याच देवळीत उदबत्त्याचं पुडकं होतं. दुसऱ्या देवळीत औषधाचं भांडं होतं, पुड्या होत्या, मेणबत्त्या होत्या. कोनाड्यात केळीच्या पानांवर ओलं गोणपाट टाकलं होतं, ती सुकू नये म्हणून असेल. एका खुंटीवर पिशवीत कापूस भरून ठेवला होता. भिंतीवरची एकही खुंटी मोकळी नव्हती; पण त्यावरील वस्तूबद्दल आम्हाला माहिती होती. मात्र कमलच्या बिछान्याभोवतीही तेरा-चौदा खुंट्या होत्या त्या कशासाठी हे समजत नव्हतं. त्यावर काळपट थर साचल्यासारखे दिसत होते. रहावलंच नाही म्हणून शेवटी विचारलं,

' या अंथरूणाभोवती खुंट्या कसल्या हो ?'

' झोपंत कमल हानरूणाभाईर जाऊ नाय म्हणून ठोकल्याती त्या. कधी कधी हालचाल करताना हात-पाय हातरूणाखाली गेला तर भुईचा टणकपणा रूततो, जखम हुती, धूळ-माती लागती, म्हणून खुट्या लावल्याती. सारखं कोण हिथं बसून -हाणार ?'

' खुंट्यांना काय लावलंय का ? . .. काळपट थर दिसतो.. .?'

' त्ये व्हय ? हं, त्ये जखमांस्नी औशीद लावल्यावर, तरास पडतो, हालचाल हुती, त्ये औशीद खुट्यास्नीबी लागतं. त्येचं थर हायती.'

' ते साफ करून टाकत जा.'

' करते की. पण ज्या त्या कामाला माझंच हात कुठंवर पुरणार ? . . -हाऊन जातं काइ येळंला . . . आता तिच्या अंगाखाली घामानं वलं झालं आसलं. जखमास्नीबी पाणी सुटतं पुसाय, पायजे, . . . . कमाऽऽ. एऽ कमल.'

इतका वेळ डोळे मिटून पडलेल्या कमलने डोळे उघडले.

' माझे बाय, पानावरचं पाणी पुसून घिऊ दे . . . बाईंच्याकडं काय बगतीस ? . . . त्यास्नी लाजायचं व्हय ? . . . सारखी बाई-बाई करायचीस. आताच वळख इसरून गेलीस का ? . . . आपली माणसं हायती ती . . . थांब हां. हालू नगस, धडपा काढून घेते. . . अंऽ . . . हं.'

अंगावरचं कापड बाजूला व्हायच्या आधीच तिनं डोळं गच्च मिटून घेतलं होतं; पण मिटल्या पापण्यांवर अश्रू ओथंबलेलं दिसत होतं. तिच्या भाजल्या अंगावरून आमची नजर फिरताना आमच्याही उघड्या डोळ्यांवर

अश्रूंचे दाट–दाट पडदे पडले.

खोलीच्या बाहेर येऊन कमलच्या आईचा निरोप घेतला. नाकावर येणारं आसवांचं ओघळ ती बोटानं पुसत होती. आम्ही दोघीही तिचा हात हातात घेऊन सहानुभूतीने किंचित दाबला. जीभेवर पांगळं शब्द अंग धरीत नव्हतं. मुक्यानंच घराकडं वळलो.

कोपऱ्यावर आल्यावर जाधवबाई त्यांच्या घराकडं वळल्या. आम्ही जे नुकतंच पाहिलं होतं, अनुभवलं होतं, त्यामुळं बेचैन मनःस्थितीतच होतो. काही एक न बोलता नुसत्या नजरेनंच बाई ' जाते ' म्हणाल्या. त्या गेल्या. त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडं मी सुन्न–बधिर नजरेनं पहात मिनिटभर उभीच होते. मनात विचार आला, आपण सारे जीवनयात्रेतील प्रवासी.

दोन दिसांची रंगत संगत ।

दोन दिसांची नाती . . . अशी पाखरे येती ।।

त्यातील एखादा पुढं निघाला तर दुसऱ्यानं फक्त पहात रहायचं. निरोप द्या अगर न द्या, जाणारा तो जाणारच. आपल्या हातात काहीच नसतं. वाटतं मात्र खूप खूप असल्यासारखं. आकाशालाही गवसणी घालण्याइतकं ! कमलच्या आईलाही असंच वाटतं. येईल का तिच्या श्रद्धेला यश ? कष्टाचं आभाळ पेलण्याची हिंमत आणि देवधर्मावरील श्रद्धा तिच्या कमलला बरी करू शकेल ? तिच्या शब्दाशब्दातून ओसंडणारं कातर वात्सल्य विसर पडण्यासारखं नव्हतंच. आमच्या चाहूलीमुळं जीवाच्या आकांतानं कमलनं आईला घातलेली करूण-भयानक साद मनाच्या कडेकपारीत घुमत होती.

त्या दिवसानंतर रोज मी कमलच्या प्रकृतीची न चुकता चौकशी करू लागले. तो माझ्या रिकाम्या मनाचा चाळा नव्हता. ती एक जिव्हारी धास्ती होती -- एका मातेच्या वात्सल्यभरल्या सुश्रुषेच्या यशापयशाची.

दिवसेदिवस कमलच्या ओरडण्याचं प्रमाण वाढतच चाललं होतं. आमच्या घरात ते ऐकू यायचं. फार मोठ्यानं ती किंचाळायची, सकाळी–दुपारी–संध्याकाळी–मध्यरात्री–केव्हाही. कमलच्या दर्दभरल्या किंकाळ्या काळजाचा ठाव घेत असत. खेडेगावच्या शुकशुकाटी वातावरणाला त्या छिन्न–विछिन्न करून टाकत.

कमलची एखादी किंकाळी कानावर आल्यावर तिचा विषय निघे. तिच्या भाजलेल्या जखमा बऱ्या होत नव्हत्या. हे समजे. नुकतंच तिला पाहून आलेली एक शेजारीण सांगत होती,

' जखमा भरून येईनात. औशीदाचा लेप वाळून मासापासून आलग होऊन पडतो. वाळक्या लेपाच्या खपल्या बाजूला काढल्या न्हायत्या; तर त्या मासात घुसून येदना हुत्यात. सोसणारानं तरी किती सोसायचं ? भान इसरून गुरावाणी आरडती, कमा.'

' पहिल्यांदाच दवाखान्यात न्यायला हवं होतं, नाहीतर घरच्या घरी डॉक्टरचं औषध चालू करायला हवं होतं, असं तुम्हाला नाही का वाटत ?'

—— मी न राहवून बोलून गेले. त्यावर ती शेजारीण म्हणाली, ' ती येळ निघून गेली. आता कोण आसली केस दवाखान्यात घेणार ? घरच्या घरी दवा देणारा कुठंला डाक्तर ह्या आडवळणाच्या गावात येणार ?... नि त्यो तरी जीवाची जोखीम घेईल का ?'

' अजूनही त्यानी बघावं चौकशी करून.'

' घरातली माणसबी लई घाईला आल्याती. खचून गेल्याती. पण ती पोरगीच म्हणती. ' माझं उघडंवाकडं शिरॅर कुणा–कुणाम्होरं दावणार ? नि कशासाठी ?'.. .. खेला तिच्या आई–बाजवळं उत्तर हाय का ? ... म्होरं काय व्हणार ' त्ये ' परमेसराला ठावं.'

एकूण गोष्टी या थराला येऊन पोहचल्या होत्या. पंचवीस टक्के भाजलेली पोर हातची गमावणार की काय, ही माणसं ? तिला दवाखान्यात भरती केलं असतं तर आतापर्यंत ती खात्रीनं बरी झाली असती. असं मला मनापासून वाटे.

फाल्गुनाच्या उष्ण झळा माणसांना बेचैन करू लागल्या. शरीरातून घामाच्या पाझर फुटू लागला. कमलच्या किंकाळ्या नित्याच्याच होत्या, पण त्या संख्येनं वाढल्या होत्या. कुणीतरी तिला पाहून आलेली बाई कळवळून सांगायची,

' आवो, यवढ्या यातनातबी पोरीचं उपास–तापास चालू हैत. तिची आई जावा–भावाच्या संसारात पोरीचं करता करता रडकुंडीस आलीय. किती नवस–सायास झालं, निवद–उतारं झालं, पण आजून फेर

पडंना. आता सुगी संपलीया, माणसं मोकळी, तिला बगाय जाणारच की, पण न्हातीधुती पोरगी रडती–आरडती. तिलाच तरास हुतो. घरात चुलत्या-मालत्या हायत्या. त्यास्नी वाटतंया, ही मरून सुटंल तर बरं हुईल. आईच्या जीवाला वाटतं, माझ्या हाताच्या कष्टाला देव यॅस दिइल.'

' तुम्हाला वाटतं का ती बरी होईल म्हणून ?'

माझ्या या प्रश्नावर त्या बाईनं माझ्याकडं संशयानं पाह्यलं. म्हणाली,

' तिला तुम्ही पाह्यली नाय व्हय ?'

' पाहिली, पण अगदी सुरूवातीला.'

' हां, तरीच ! आवो बाई, त्या पोरीच्या आंगावर चिमटभर मास न्हायलं नाय, हाडं हायती निस्ती लाल–पांढरा रंग फासल्याली.' ते ऐकूण मी नखशिखात शहारले, तिला पुन्हा एकदा पहावं, ही इच्छा पूर्णतः करपून गेली.

अलिकडं तासा दोन तासांनी कमलचा काळीज पिळवटून टाकणारा आक्रोश कानावर येऊ लागला. तिच्या मरणाची आता सर्वांनाच खात्री झाली होती. अचानक केव्हाही तिच्या मरणाची बातमी थडकेल अशी प्रत्येकाची मनोभावना झाली होती. ' अरे देवा ऽऽ ! मेलेऽ रेऽऽ !' ' आता सोसंना गऽऽ! आई ऽऽ! ' देवाऽऽ! आता कशाची वाट बघतोऽऽस ? नेरे देवाऽऽ !' असा करूण आक्रोश कानावर येई. मला कधी कधी वाटे इतक्या लांबूनही तिचा आक्रोश स्पष्ट ऐकू येतोय, म्हणजे ती बरी होण्यासारखी असेल. आपण जाऊन पहावं, पण तो माझा विचार तेवढ्या-पुरताच टिकत असे. तिला प्रत्यक्ष पाहणारांनी तिच्या देहाच्या यातना वेदना सांगितल्या म्हणजे मलाही वाटायचं, तिची यातून सुटका होईल तर बरं होईल. आणि --

एक दिवस त्या खेड्याचं छत आक्रोशानं वादळून उठलं. हातातलं काम टाकून जो तो कमलच्या घराकडं धावत सुटला. कमलच्या अखेरच्या श्वासाबरोबरच इतरांनी जणू निःश्वास सोडले.

' कमा सुटली !'

' यातना संपल्या बिचारीच्या !'

' आखरीला देवाला दया आली !'

प्रत्येकानं आपलं मनोगतच जणू उघड केलं.

आंगण गर्दीनं भरलं होतं. पडवीत माणसं मावत नव्हती. जो तो हळहळत होता, चुकचुकत होता. आंगणात चार–सहा माणसं मुक्यानंच शेवटच्या संस्काराचीं जुळवा जुळव करत होतीं.

कमलचा देह बिछान्यावरच होता. घरी ठेवूनही तिला शेवटची आंघोळ घालता येणार नव्हती. बिछान्याभोवतीच्या खुंटया नुकत्याच उपटल्या होत्या. त्या खोलीचा दर्प पूर्वीपेक्षा अधिकच उग्र वाटत होता. घरातल्या बायकांची, मुलांची रडारड चालू होती. रडत नव्हती ती फक्त कमलची आई! विछिन्न झालेली मूर्तीवरून भ्रमिष्ट भक्तानं हात फिरवत रहावं तशी ती कमलच्या देहावरून हात फिरवत होती. ते दृश्य पाहून इतरांनाच गहिवरून येत होतं मात्र. कमलच्या आईच्या डोळ्यात आसवं नव्हती. मूर्ती हरवलेल्या गाभाऱ्याचा शून्यपणा त्यात होता. कष्टावरचा श्रध्दांवरचा विश्वास उडून गेला होता. तो आघात झेलायला तिचं माणूसपण शिल्लक नव्हतं, जमिनदोस्त झालं होतं. तिचा तो भ्रमिष्ट, मुका शोक, पाहणाराची छाती दडपीत होता. एक वयस्क म्हातारी तिच्या-जवळ जाऊन बसली. तिनं तिच्या पाठीवर सांत्वनासाठी हात ठेवला. वाटलं — आता ही मायमाऊली हंबरडा फोडील. पण नाही, तिनं टाहो फोडला नाही. नुसती रडलीही नाही. तिच्या ओठावर पराजयाचं वेदनाकारी हासू फाकलं – – – रडण्याहूनही भयानक – – – काळीज भोसकणारं! तिच्या हासण्यात सहस्र आक्रोश थिजलं होतं जणू. एक दीर्घ उसासा टाकून ती वात्सल्यमूर्ती म्हणाली,

' सुटली माझी कमा ! मी नाय कटाळली तिला, पण ती कटाळली मला . . . . . या हातानी तिची सेवा केली. रात म्हनले नाय, दिस म्हणले नाय. तहान–भूक इसरून तिचं सारं केलं, . . . . जीव कुडीत हुता तवर आमी बोलत हुतो,. . . • तिच्या यातना तिच्या न्हायल्या नव्हत्या. तिच्या जखमा बघून माझ्या काळजाला आग लागत हुती. कुणाला काय सांगत नव्हते, . . . पण माझं दुख कमा नुसत्या नजरनं बळखीत हुती. • . . . आगदी सोसवंना की वरडत हुती, पण . . . म . . . . . म्हणायची ' आई ! मला सोसंना म्हणून वरडले बग . . , . आई, तुला लई तरास

हुतो नाय का ?. . . . काल सकाळी म्हणली . . . . ' आई ! तू माझी खरी आई ना ? म्हणलं ' व्हय. आसं का इचारतीस ?' तर म्हणली, ' तुला माझी खरी माया आसंल, तर मला इखाची पुडी दे. . . . . मी तुला म्होरल्या जल्मातबी इसरणार नाय.' मी म्हणलं, ' तुला इखाची पुडी देताना मीबी घिइन चालंल का ?' मग तासभर काइच बोलली नाय. भकास बगत ऱ्हायली आढ्याकडं.'

' ह्ये बग, रकमा, आता आसला इषय काढायचा नाय. तू रग्गड सेवा केलीस. खस्ता खाल्ल्यास. त्यात तुला समाधान मिळालं ना ?'

' व्हय. दवाखान्यात नेलं आसतं तर कायबी हाती लागलं नसतं, डोळाभर बगाय मिळालं, बोलाय मिळालं, सेवा कराय मिळाली. कुत्र्यावाणी हाडीकझिडीक करायला हिथं नर्सा नव्हत्या, . . .कमल मला मुकली पण तिचं सोनं झालं. आई-बाच्या हातची सेवा तिला मिळाली. ती सुटली. आमी कर्मदरिद्री, कूस फाटून मागं ऱ्हायलो.'

न रडता बोलणाऱ्या त्या आईचा प्रत्येक शब्द आक्रोशतोय असा भासला, तिच्या प्रत्येक शब्दागणिक ऐकणाऱ्याच्या डोळ्यांना पाझर फोडण्याचं सामर्थ्य होतं. का ? तिचं म्हणणं खरं होतं म्हणून ? की कमल त्या भयानक यातना प्रवासातून सुटली म्हणून ? कमलचा मृत्यू हे एक करूण सत्य होतं. तिच्या आईचं म्हणणं खरं होतंही आणि नव्हतंही.

शहरातील दवाखान्यात खेडुतांना दिल्या जाणाऱ्या वागणुकीला भिऊन फळाला येतं–कमलासारख्यांचं वेदनामय आजारपण-किंवा शेवटही. दवाखान्यातील लोकांची उच्चभ्रू संस्कृती आणि खेडुतांची अज्ञानी भावना व दुबळेपण यातील प्रचंड दरीचा हा परिणाम ! ० ० ०